मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

भारतीय सौर पौष–फाल्गुन १९४०

जानेवारी–मार्च २०१९ / खंड ४२, अंक ४

## महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२–२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२–२४३२ ५९३१ ई–मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना–विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित–संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास–रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला– के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई–बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३९१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।
www.marthpari.org

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452
जाने-फेब्रु-मार्च २०१९/ खंड ४२ / अंक ४

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणा नगर)

**सल्लागार मंडळ**
(२०१८-२१)
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

लेखातील मते लेखकांचीच

## अनुक्रमणिका

१. चारूदत्त श्रीधर गोखले :
सेवा क्षेत्र आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ .... ३०७

२. ज्ञानदेव तळुले :
महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या; २००१-२०१८: मराठवाडा आणि विदर्भातील आत्महत्यांचे जिल्हानिहाय संख्यात्म, स्थल-वास्तव, नियोजन व संकल्पनात्मक परिप्रेक्ष्य विश्लेषण .. ३२७

३. माधव चितळे :
पाण्याचे दर व मूल्य .................................. ३५३

४. एम. एच. शिंदे :
कृषी खर्च आणि मूल्य आयोगाच्या किंमत धोरणाची चिकित्सा .......................................... ३५६

५. विजय मा. कुंभार :
गुड एम्प्लॉईज लिव बॅड मॅनेजर, नॉट कंपनी ............ ३६४

६. सुरेखा तु. रोंगटे :
भारतीय रुपयाचा इतिहास व त्याच्या अवमूल्यनाने बदललेली अर्थव्यवस्था .............................. ३७०

७. नीता सुधाकर वाणी :
ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजुरांचे योगदान व त्यांच्या समस्या- एक अध्ययन ............... ३७७

८. माधुरी ओंकार वर्तले : पुस्तक परिचय
मागोवा-अर्थविचारांचा ................................ ३८७

९. शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे
मराठी अर्थशास्त्र परिभाषेचे आर्त (भाष्य) ................ ३९३

१०. जे. एफ. पाटील: अर्थ शब्दांची वाट पाहे
क्रोनी कॅपिटलिझम = भावकीची भांडवलशाही .......... ३९५

११. डॉ. सुधा मोकाशी उपक्रमांतर्गत विशेष व्याख्यान
अहवाल .............................................. ३९६

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०१७-१८

- **अध्यक्ष**

  **चारुदत्त श्रीधर गोखले (जळगाव)**

- **कार्याध्यक्ष**

  **कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **रामदास बापूराव भांडवलकर (यवतमाळ)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **बालाजी शिंदे (परभणी)**
  **जगन्नाथ पाटील (सातारा)**
  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**

- **सदस्य**

  **दिनकर मोरे (इस्लामपूर)**
  **वामन सावंत (रत्नागिरी)**
  **जीवन सोळुंके (नाशिक)**
  **महादेव पाटील (मिरज-सांगली)**
  **संतोष कदम (सोलापूर)**
  **सुभाष पाटील (पुणे)**
  **विनोद गावंडे (अमरावती)**
  **अशोकगीर गोस्वामी (भुसावळ)**
  **मारोती तेगमपुरे (अंबड)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपुर)**

- **स्वीकृत सदस्य**

  **सुरेश पाटील (जळगाव)**
  **अरूण पिसे (धुळे)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **शरयू पोतनुरवार (चंद्रपूर)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी: ९४२३१३४६८६


**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु.३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु.२०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  व्यावसायिक संस्था : रु.१०००/-(त्रैवार्षिक)
  ग्रंथालये : रु.१५००/-(पंचवार्षिक)
- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.


**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक आर. बी. भांडवलकर (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, गजानन नगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ येथे प्रसिद्ध केले.

# सेवा क्षेत्र आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

**चारुदत्त श्रीधर गोखले** †

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४२ वे राष्ट्रीय अधिवेशन, सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर येथे दि. १७ ते १९ नोव्हेंबर, २०१८ दरम्यान संपन्न झाले. या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणाचा सारांश...

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४२ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाच्या सोहळ्याचे उद्‌घाटक महाराष्ट्र राज्याचे अर्थ, नियोजन व वनमंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.श्री. सुधीरजी मुनगंटीवार, चंद्रपूरचे आमदार मा. नानाभाऊ शामकुळे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू व मराठी अर्थशास्त्र परिषदेचे आजीव सभासद मा. डॉ. नामदेवराव कल्याणकर, सर्वोदय शिक्षण मंडळ चंद्रपूरचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी, ४१ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. रामचंद्र रसाळ, परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. के. के. पाटील, कार्यवाह खजिनदार डॉ. राजेंद्र भांडवलकर, अर्थसंवाद या त्रैमासिकाचे प्रमुख संपादक प्रा. डॉ. राहुल शं. म्हेपरे, स्थानिक कार्याध्यक्ष व या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. इंगोले, स्थानिक कार्यवाह व या महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. शरयू पोतनुरवार (बिडवई), उपस्थित सर्व माजी अध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी मंडळाचे सर्व सदस्य, सर्व आजीव व साधारण सदस्य, या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी, पंचक्रोशीतील सर्व सन्माननीय निमंत्रित, स्वयंसेवक, विद्यार्थी मित्र, मैत्रिणी, पत्रकार बंधू, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि बंधू भगिनींनो.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४२ व्या अधिवेशनाच्या निमित्ताने आपण सर्व सर्वोदय शिक्षण संस्था संचालित नॅकची 'अ' श्रेणी व उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार प्राप्त सरदार पटेल महाविद्यालयात एकत्र आलो आहोत. आदरणीय शांतारामजी पोटदुखे यांनी लावलेल्या या रोपट्याचे आता वटवृक्षात रूपांतर झाले असून महाविद्यालय सुवर्ण महोत्सवाकडे वाटचाल करीत आहे. हे सर्व क्षण अनुभवायला मा. शांतारामजी आज आपल्यात नाहीत हे आपल्या सगळ्यांचे दुर्दैव. त्यांच्या पावन स्मृतीस मी अभिवादन करतो. विदर्भात संपन्न होणारे हे सातवे अधिवेशन; तर परिषदेचा अध्यक्ष होण्याचा मान आतापर्यंत विदर्भातील ५ सभासदांना मिळाला आहे.

फैजपूर जि.जळगाव येथे दि. ५ ते ७ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत संपन्न झालेल्या परिषदेच्या ४१ व्या अधिवेशनात ४२ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून आपण माझी बहुमताने निवड करून परिषदेच्या एका सामान्य कार्यकर्त्याला जो बहुमान दिलात

† अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद

आजीव सभासद क्र. : १८७, भ्रमणध्वनी : ९४२२६१८४१० , ई-मेल : charudattasgokhale@gmail.com

त्याबद्दल मी आपल्या ऋणात राहू इच्छितो.

भारतातील किंवा महाराष्ट्र राज्यातील एखादा ज्वलंत प्रश्न घेऊन अध्यक्षांनी भाषण करावे हा परिषदेचा प्रघात आहे. म्हणून महाराष्ट्रातील सर्व सामान्यांची जीवनवाहिनी असणारी एस.टी. (लालपरी) म्हणजेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) हा विषय मी जाणीवपूर्वक निवडला. प्रवासी वाहतूक ही सेवा क्षेत्राचा भाग असल्यामुळे अध्यक्षीय भाषणाचा विषय तांत्रिक भाषेत **सेवा क्षेत्र आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ** असा निवडला आहे.

आपल्याला जर सहज प्रश्न केला की, मानवाच्या आवश्यक गरजा कोणत्या? तर आपण पटकन उत्तर द्याल अन्न, वस्त्र आणि निवारा. सुरुवातीच्या काळात या तीनही गरजा भागविण्यासाठी मानव स्वयंपूर्ण होता. पण हळूहळू जशी मानवाची प्रगती होत गेली तसतशी मानवी गरजांमध्ये तर वाढ होत गेलीच पण मनुष्य परावलंबीही बनू लागला. आरोग्य, शिक्षण, करमणूक व प्रवास या गरजांची त्यात भर पडली आणि आज प्रवास ही एक अत्यावश्यक गरज होऊन बसलेली आहे.

वाहतूक साधनांचे स्थलवाहतूक, जलवाहतूक व वायुमार्ग असे वर्गीकरण करता येईल. स्थल वाहतुकीची साधने म्हणजे मनुष्य, प्राणी, मोटर व रेल्वे यासाठी मार्ग म्हणजे पाऊलवाटा, रस्ते व रेल्वेमार्ग. जल वाहतुकीची साधने म्हणजे नावा, बोटी, जहाजे व मार्ग म्हणजे नद्या, कालवे, सरोवर आणि समुद्र; तर वायुमार्गाचे साधन म्हणजे विमान. सगळ्यात स्वस्त आणि सुरक्षित वाहतूक म्हणजे रस्ते वाहतूक. स्थलांतरासाठी सगळ्यात अवघड गोष्ट म्हणजे माणूस.

**परिवहन क्षेत्राचे आर्थिक विकासातील महत्त्व**

कोणत्याही देशातील शेती, औद्योगिक आणि आर्थिक विकास हा परिवहन साधनांवरच अवलंबून असतो. उत्पादन, वितरण आणि उपभोग या सर्व क्रिया वाहतूक साधनांशिवाय अशक्य आहेत. खते, बी-बियाणे, अवजारांची ने-आण, पूरक व्यवसायांचा विकास, बाजारपेठांची उपलब्धता, रोजगाराच्या संधीही परिवहनामुळेच उपलब्ध होतात. रोजगार हमी योजनेत प्रामुख्याने रस्त्यांची कामे हाती घेतली जातात. एका मालमोटारीमुळे ८ ते १० लोकांना; तर एका बसमुळे १५ लोकांना रोजगार मिळू शकतो.

कमी वेळेत लांब अंतरावर जाणे सहज शक्य असल्यामुळे शिक्षणाच्या सोयी वाढतात. परदेशात जाता येऊ शकते, निर्यात वाढू शकते व त्यामुळे परकीय चलन प्राप्त होऊ शकते. साक्षरतेचा दर वाढतो. भौगोलिक श्रमविभागणी केवळ वाहतूक साधनांमुळेच शक्य होते. एखाद्या उद्योगाची स्थान निश्चिती करताना वाहतूक साधनांची उपलब्धता हा सर्वात प्रभावी घटक ठरतो. शरीरातील रक्त वाहिन्यांप्रमाणेच वाहतुकीच्या विविध साधनांना मालाची आणि प्रवाशांची ने-आण करण्याची जबाबदारी पार पाडावी लागते.

वाहतूक साधनांचे इतरही फायदे आहेत. पुस्तकांची, नियतकालिकांची व त्यासोबत विचारांची देवाण-घेवाण होऊ शकते. विविध प्रदेशातील लोकांत परस्परसंबंध प्रस्थापित होतात; त्यामुळे गैरसमजुती दूर होण्यास मदत होते. त्यातूनच संगीत, नृत्य, साहित्य आणि सांस्कृतिक ठेव्याचे आदान-प्रदान होते. तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील लोक एकमेकांच्या अधिक जवळ येतात. वाहतुकीच्या विविध साधनांना मानवी संस्कृतीचे मोजमाप करणारे मापयंत्र समजले जाते. भारतासारख्या अफाट पसरलेल्या देशात प्रशासन व्यवस्था प्रभावी करण्यासाठी अंतर्गत शांतता प्रस्थापित करण्यासाठी, परकीय आक्रमणाला तोंड देण्यासाठी व राष्ट्रीय एकात्मता साधण्यासाठी वाहतूक साधनांचा

जलद प्रसार आवश्यक होऊन बसला आहे.

**सेवा क्षेत्र**

एखाद्या देशाच्या आर्थिक विकासात प्राथमिक क्षेत्रा इतकेच महत्त्व द्वितीय व तृतीय (सेवा) क्षेत्रालाही असते. कोलीन क्लर्क, सायमन कुझनेट यांच्या सारख्या अर्थशास्त्रज्ञांनी देशाचा विकास हा सेवाक्षेत्राच्या विकासावर अवलंबून असतो असे म्हटले आहे. सेवा क्षेत्रामध्ये अमूर्त वस्तूंचे उत्पादन होते म्हणजेच वस्तूऐवजी सेवांची निर्मिती होते. सेवा क्षेत्रामध्ये प्रामुख्याने वाहतूक, साठवणूक व दळणवळण, बँकिंग आणि विमा, शिक्षण, आरोग्य, व्यापार, हॉटेल व पर्यटन, प्रसारणाशी संबंधित सेवा, स्थावर मालमत्ता, लोक प्रशासन, संरक्षण इ. चा समावेश होतो.

आधुनिक अर्थव्यवस्थांमध्ये सेवा क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते. खरे तर हे क्षेत्र इतके महत्त्वाचे आहे की अर्थव्यवस्थेची प्रगती ही सेवा क्षेत्राच्या प्रगतीवर अवलंबून असते. आधुनिक अर्थव्यवस्थांमध्ये राष्ट्रीय उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा हळूहळू कमी होत आहे; तर द्वितीय व तृतीय क्षेत्राचा वाटा दिवसेंदिवस वाढत आहे.

१९५०-५१ मध्ये चालू किमतीनुसार भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा हिस्सा ३३.२५ टक्के होता तो २०१३-१४ मध्ये ५७.०३ टक्केपर्यंत वाढला, २०१६-१७ मध्ये सेवा क्षेत्राच्या राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होऊन तो ५३.६६ टक्के इतका झाला आहे.

**सेवा क्षेत्राचे महत्त्व**

सेवाक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नात मोठा वाटा असतो, हे क्षेत्र औद्योगिकीकरणास मदत करते, सेवाक्षेत्र शेती क्षेत्राच्या विकासास चालना देते, विभागीय असमतोल कमी करण्यास मदत करते, बाजाराचा विस्तार होतो, जीवनस्तर सुधारतो, उत्पादकतेत वाढ होते. तसेच विदेशी व्यापारात वाढ होण्यास सेवा क्षेत्राची मदत होते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि सी.आय. ए. वर्ल्ड फेसबुकच्या मते, २०१६ मध्ये खालील देश सेवा क्षेत्राच्या दृष्टीने मोठे आहेत.

१) अमेरिका १४.७६ अब्ज अमेरिकन डॉलर
२) चीन ५.७ अब्ज अमेरिकन डॉलर
३) जपान ३.५ अब्ज अमेरिकन डॉलर
४) जर्मनी २.४ अब्ज अमेरिकन डॉलर
५) इंग्लड २.१ अब्ज अमेरिकन डॉलर
६) फ्रान्स १.९ अब्ज अमेरिकन डॉलर
७) इटली १.४ अब्ज अमेरिकन डॉलर
८) ब्राझील १.३ अब्ज अमेरिकन डॉलर
९) कॅनडा १.१ अब्ज अमेरिकन डॉलर
१०) भारत १.० अब्ज अमेरिकन डॉलर

**भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे क्षेत्रनिहाय योगदान**

चालू किमतीनुसार देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धी व क्षेत्रनिहाय योगदान तक्ता क्र.१ मध्ये दर्शविले आहे. २०११-१२ मध्ये एकूण स्थूल मूल्यवृद्धी ८१.०६ लाख कोटी रु. होती त्यामध्ये कृषी व संलग्न क्षेत्राचा हिस्सा १५.०१ लाख कोटी रु.(१८.५ टक्के), उद्योग क्षेत्राचा हिस्सा २६.३५ लाख कोटी रु. (३५.५ टक्के) तर सेवाक्षेत्राचा हिस्सा ३९.६९ लाख कोटी रु. (४९.० टक्के) होता. सेवाक्षेत्रापैकी व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण व प्रसारणाशी संबंधित सेवा यांचा स्थूल देशांतर्गत मूल्यवृद्धीत १४.१३ लाख कोटी रु. (१७.४ टक्के) हिस्सा होता. २०१३-१४ मध्ये देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धी १०३.६६ लाख कोटी रू. पर्यंत वाढली. एकूण स्थूल मूल्यवृद्धीमध्ये कृषी क्षेत्राचा हिस्सा १८.६ टक्के, उद्योग क्षेत्राचा ३०.८ टक्के तर सेवा क्षेत्राचा हिस्सा ५०.६ टक्के इतका होता. सेवा

क्षेत्रा मध्ये समाविष्ट असलेल्या व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण व प्रसाराशी संबंधित सेवा यांचा स्थूल मूल्यवृद्धी मधील हिस्सा १८.७४ लाख कोटी रु. (१८.१ टक्के) इतका होता. वाहतूक क्षेत्रातील रेल्वेचा हिस्सा ०.७५ टक्के, रस्ते वाहतुकीचा हिस्सा २.८१ टक्के, जलवाहतुकीचा हिस्सा ०.०७ टक्के तर हवाई वाहतुकीचा हिस्सा ०.४ टक्के इतका होता.

**तक्ता क्र.१ : मूळ किमतीनुसार देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धी व क्षेत्रनिहाय योगदाने (चालू किमतीनुसार)**

**(कोटी रुपयात)**

| क्षेत्र/ वर्ष | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|
| कृषी व संलग्न | १५,०१,८१६ (१८.५) | १६,८०,७९८ (१८.३) | १९,३२,६९२ (१८.६) | २०,६७,९३५ (१८.०) | २१,७२,९१० (१७.४) | २३,८२,२८९ (१७.३२) |
| उद्योग | २६,३५,०५२ (३२.५) | २९,३१,२६२ (३१.७) | ३१,८८,२७० (३०.८) | ३४,५५,२२१ (३०.१) | ३६,८३,३५८ (२९.६) | ३९,८९,७९१ (२९.०२) |
| सेवा | ३९,६९,७८९ (४९.०) | ४६,०३,२५५ (५०.०) | ५२,४५,३०५ (५०.६) | ५९,४७,२६० (५१.९) | ६५,९५,६७० (५३.०) | ७३,७८,७०५ (५३.६६) |
| व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण व प्रसारणाशी संबंधित सेवा | १४,१३,११६ (१७.४) | १६,६४,०८३ (१८.१) | १८,७४,४४२ (१८.१) | २०,९५,३३७ (१८.३) | २२,९४,३६७ (१८.४) | २५,३८,१६२ (१८.४६) |
| मूळ किमतीनुसार स्थूल मूल्यवृद्धी | ८१,०६,६५६ | ९२,०५,३१५ | १,०३,६६,२६६ | १,१४,७०,४१५ | १,२४,५१,९३८ | १,३७,५०,७८६ |

**Source :** Ministry of Statistics and Programme Implementation, Planning Commission, Government of India, Sectorwise contribution of GDP of India. (कंसातील आकडे स्थूल मूल्यवृद्धीशी टक्केवारी दर्शवितात.)

२०१६-१७ मध्ये चालू किमतीनुसार एकूण स्थूल मूल्यवृद्धी १३७.५१ लाख कोटी रु. इतकी होती. त्यात सेवा क्षेत्राचा हिस्सा सर्वात मोठा आहे. स्थूल मूल्यवृद्धीमध्ये या वर्षी सेवा क्षेत्राचा हिस्सा ७३.७९ लाख कोटी रु.(५३.६६ टक्के) आहे. उद्योग क्षेत्राचा हिस्सा ३९.९० लाख कोटी रु. (२९.०२ टक्के) तर कृषी व संलग्न क्षेत्राचा हिस्सा २३.८२ लाख कोटी रु. (१७.३२ टक्के) इतका आहे.

२०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीत भारताच्या स्थूल देशांतर्गत मूल्यवृद्धीमधील कृषी व संलग्न क्षेत्र, तसेच उद्योग क्षेत्राचा हिस्सा कमी कमी होत गेला आहे; तर सेवाक्षेत्राचा हिस्सा सातत्याने वाढत गेल्याचे निदर्शनास येते. सेवाक्षेत्रामधील व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण व प्रसारणाशी संबंधित सेवा यांचे स्थूल मूल्यवृद्धीमधील योगदान वाढत गेल्याचे निदर्शनास येते.

**स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचा क्षेत्रनिहाय वृद्धिदर**

स्थूल देशांतर्गत उत्पन्नाचा क्षेत्रनिहाय वृद्धिदर तक्ता क्र.२ मध्ये विशद केला आहे. चालू किमतीनुसार स्थूल मूल्यवृद्धीचा वृद्धिदर २०१२-१३ मध्ये १३.५५ टक्के होता, २०१३-१४ मध्ये १२.६१ टक्के, २०१४-१५ मध्ये १०.६५ टक्के, २०१५-१६ मध्ये ८.५६ टक्के तर २०१६-१७ मध्ये १०.४३ टक्के होता. कृषी व संलग्न क्षेत्राचा स्थूल मूल्यवृद्धीचा वृद्धिदर २०१२-१३ मध्ये ११.९२ टक्के, २०१३-१४ मध्ये १४.९९ टक्के, २०१४-१५ मध्ये ७.० टक्के, २०१५-१६ मध्ये ५.०८ टक्के तर २०१६-१७ मध्ये ९.६४ टक्के इतका होता. उद्योग क्षेत्राचा स्थूल मूल्यवृद्धीचा वृद्धिदर २०१२-१३ मध्ये १०.८६ टक्के, २०१३-१४ मध्ये ९.१४ टक्के, २०१४-१५ मध्ये ८.३७ टक्के, २०१५-१६ मध्ये ६.६० टक्के तर २०१६-१७ मध्ये ८.३२ टक्के इतका होता. सेवाक्षेत्राचा स्थूल मूल्यवृद्धीचा वृद्धिदर २०१२-१३ मध्ये १५.९६ टक्के , २०१३-१४ मध्ये १३.९५ टक्के, २०१४-१५ मध्ये १३.३८ टक्के, २०१५-१६ मध्ये १०.९० टक्के तर २०१६-१७ मध्ये ११.८७ टक्के इतका होता. एकूण स्थूल मूल्यवृद्धीचा तसेच सर्वच क्षेत्रातील स्थूल मूल्यवृद्धीचा वृद्धिदर २०१२-१३ पासून २०१५-१६ पर्यंत सातत्याने कमी झाला तर २०१६-१७ मध्ये मात्र त्यात वाढ झाली आहे. असे असले तरी सेवाक्षेत्राचा वृद्धिदर इतर क्षेत्राच्या तुलनेत जास्त आहे. सेवाक्षेत्रातील व्यापार, हॉटेल, वाहतूक, दळणवळण आणि प्रसारण सेवेशी संबंधित सेवा यांचा स्थूल मूल्यवृद्धीतील वृद्धिदर २०१२-१३ मध्ये १७.७६ टक्के, २०१३-१४ मध्ये १२.६४ टक्के, २०१४-१५ मध्ये ११.७८ टक्के, २०१५-१६ मध्ये ९.५० टक्के तर २०१६-१७ मध्ये १०.६३ टक्के इतका होता.

चालू किमतीनुसार १९५१-५२ पासूनच्या सेवा क्षेत्राच्या स्थूल मूल्यवृद्धीच्या वृद्धिदराचे निरीक्षण केले तर असे लक्षात येईल की, सेवाक्षेत्राचा देशांतर्गत स्थूल उत्पन्नातील वाटा वाढत गेलेला आहे. मात्र त्यात चढ-उतार आहेत. १९५१-५२ मध्ये हा दर ६.६५ टक्के होता तो १९६१-६२ मध्ये ५.८३ टक्के पर्यंत कमी झाला. नंतर १९७१-७२ मध्ये हा वृद्धिदर ९.६८ टक्के झाला, १९८१-८२ मध्ये १८.४६ टक्के म्हणजेच आधीच्या दशकाच्या तुलनेत जवळपास दुप्पट झाला, १९९१-९२ मध्ये १७.४१ टक्के, २००१-०२ मध्ये १०.८९ टक्के, २०११-१२ मध्ये १८.९६ टक्के तर २०१६-१७ मध्ये ११.८७ टक्के झाला आहे. २०१७-१८ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार २०१७-१८ मध्ये सेवाक्षेत्राचा वृद्धिदर ८.३ टक्के होण्याची शक्यता वर्तवली आहे. सेवाक्षेत्राच्या वृद्धिदरास चालना मिळावी म्हणून केंद्र सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत.

**तक्ता क्र.२ : स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा क्षेत्र निहाय वृद्धी दर**

| क्षेत्र/ वर्ष | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ |
|---|---|---|---|---|
| • कृषी व संलग्न | ११.९२ | १४.९९ | ७.०० | ५.०८ |
| • उद्योग | १०.८६ | ९.१४ | ८.३७ | ६.६० |
| • सेवा | १५.९६ | १३.९५ | १३.३८ | १०.९० |
| व्यापार, हॉटेल, वाहतूक,दळणवळण आणि प्रसारणाशी संबंधित सेवा | १७.७६ | १२.६४ | ११.७८ | ९.५० |
| वित्तीय सेवा, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा | १६.०३ | १६.५२ | १४.२० | ११.३९ |
| लोक प्रशासन, संरक्षण आणि इतर | १३.३७ | ११.८९ | १४.३८ | १२.११ |
| • मुळ किंमतीनुसार स्थुल मूल्य सेवा | १३.५५ | १२.६१ | १०.६५ | ८.५६ |

**आधार :** Ministry of Statistics and Programme Implementation, Planning Commission, Government of India, Sectorwise contribution of GDP of India. (कंसातील आकडे स्थूल मूल्यवृद्धीशी टक्केवारी दर्शवितात.)

**महाराष्ट्र राज्याचे सेवा क्षेत्र**

**स्थूल राज्य मूल्यवृद्धीत क्षेत्रनिहाय हिस्सा व वाढ**

तक्ता क्र.३ (अ) व (ब) मध्ये महाराष्ट्र राज्याचे स्थूल मूल्यवृद्धीतील क्षेत्रनिहाय हिस्सा दर्शविला आहे. सन २०११-१२ ते २०१७-१८ या कालावधीत 'कृषी व संलग्न कार्य' क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवृद्धीत सरासरी ११.९ टक्के हिस्सा असून त्यात २ टक्के सरासरी वार्षिक दराने वाढ होत आहे. 'उद्योग' क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवृद्धीत सरासरी ३३.६ टक्के हिस्सा असून त्यात सरासरी ६.१ टक्के दराने वार्षिक वाढ होत आहे. 'सेवा' क्षेत्र ८.८ टक्के वार्षिक दराने वाढत असून त्याचा स्थूल राज्य मूल्यवृद्धीत सरासरी ५४.५ टक्के हिस्सा आहे. सेवा क्षेत्राच्या उपक्षेत्र स्तरावर, 'व्यापार, दुरुस्ती, हॉटेल व उपहार गृहे' क्षेत्राचा सरासरी ९.४ टक्के हिस्सा असून, सरासरी ५.३ टक्के वार्षिक दराने वाढत आहे. 'वाहतूक, साठवण, दळणवळण व प्रसारण संबंधी सेवा या क्षेत्राचा सरासरी हिस्सा ५.७ टक्के असून, सरासरी वार्षिक वाढ ९.९ टक्के आहे. 'वित्तीय सेवा'क्षेत्राची सरासरी ७.७ टक्के वार्षिक दराने वाढत असून या क्षेत्राचा सरासरी हिस्सा १० टक्के आहे. 'स्थावर मालमत्ता, राहत्या घराची मालकी व व्यावसायिक सेवाक्षेत्र सरासरी ११.१ टक्के दराने वाढत असून त्याचा सरासरी हिस्सा १९.४ टक्के आहे.

**तक्ता क्र. ३ (अ) : मूळ किमतीनुसार स्थूल राज्य मूल्यवृद्धी (चालू किमतीनुसार)**

**(कोटी रु.)**

| क्षेत्र/ वर्ष | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|
| कृषी व संलग्न | १,५०,०२७ (१३.१) | १,६२,९१७ (१२.६) | १,९२,३१८ (१३.१) | १,७७,२२५ (११.२) | १,८३,६१२ (१०.६) | २,४०,८७४ (१२.२) |
| उद्योग | ४,०९,८८२ (३५.८) | ४,५४,१६३ (३५.१) | ५,०५,३८२ (३४.४) | ५,३५,९५३ (३३.७) | ५,८४,७८७ (३३.६) | ६,२६,१९५ (३१.५) |
| सेवा क्षेत्र | ५,८४,५०९ (५१.१) | ६,७७,९६२ (५२.४) | ७,७१,३१६ (५२.५) | ८,७५,२९२ (५५.१) | ९,७३,५५१ (५५.९) | ११,०५,१४६ (५६.०) |
| एकूण स्थूल मूल्यवृद्धी | ११,४४,४१८ | १२,९५,०४१ | १४,६९,०१६ | १५,८८,५२० | १७,४१,९५० | १९,७२,२१६ |

**आधार :** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८ (कंसातील आकडे स्थूल मूल्यवृद्धीशी टक्केवारी दर्शवितात)

२०११-१२ ते २०१७-१८ या काळात महाराष्ट्र राज्याच्या स्थूल राज्य मूल्यवृद्धी दरामध्ये सेवा क्षेत्राचा हिस्सा सातत्याने जास्त आहे व त्यातील वाढदेखील इतर क्षेत्रांच्या तुलनेने जास्त आहे. सेवा क्षेत्रातील उपक्षेत्र परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवृद्धीतील हिस्सा २०११-१२ मध्ये ३.९ टक्के होता तो २०१६-१७ मध्ये ३.५ टक्केपर्यंत कमी झाला आहे. राज्याच्या स्थूल राज्य मूल्यवृद्धीत परिवहन क्षेत्राचे महत्त्व यावरून लक्षात येते. तसेच सेवा क्षेत्रातील परिवहन क्षेत्राचे महत्त्वही लक्षात येते.

वरील तक्ता क्र.४ केंद्र व राज्याच्या सेवा क्षेत्राच्या स्थूल मूल्यवृद्धीची वृद्धी दर्शविते.

भारत व महाराष्ट्र राज्याच्या सेवाक्षेत्राच्या स्थूल मूल्यवृद्धी दराची तुलना केली तर राज्याच्या सेवा क्षेत्राचा स्थूल मूल्यवृद्धी दर २०१४-१५ व २०१५-१६ चा अपवाद करता सातत्याने देशाच्या वृद्धी दरापेक्षा जास्त आहे.

**वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न व क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धीचे वार्षिक वृद्धी दर**

तक्ता क्र.५ मध्ये क्षेत्रनिहाय स्थूल राज्य मूल्यवृद्धीचे वृद्धी दर व स्थूल राज्य उत्पन्नाचे वृद्धिदर याचे विवेचन केले आहे.

सन २०१७-१८ च्या पूर्वानुमानानुसार महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था २०१६-१७ च्या (१०.० टक्के) तुलनेत ७.३ टक्के वृद्धिदराने वाढेल असे अपेक्षित आहे. भारताची अर्थव्यवस्था २०१७-१८ मध्ये ६.५ टक्क्यांनी वाढणे अपेक्षित आहे. २०१७-१८ मध्ये कृषी व संलग्न कार्ये क्षेत्राची वाढ ८.३ टक्के अपेक्षित आहे, उद्योग क्षेत्राची ६.५ टक्के तर सेवा क्षेत्राची वाढ ९.७ टक्क्यांनी होईल, अशी अपेक्षा आहे. २०१७-१८ या वर्षात चालू किमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न २४,९६,५०५ कोटी रु. अपेक्षित आहे. 'व्यापार, दुरुस्ती, हॉटेल व उपहारगृहे' या क्षेत्राची वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धीत ६.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वाहतूक, साठवण, दळणवळण व प्रसारणासंबंधी सेवा' या क्षेत्राची वास्तविक स्थूल

## तक्ता क्र. ३ (ब) : महाराष्ट्र राज्याच्या स्थूल मूल्यवृद्धीतील सेवा क्षेत्रातील उपक्षेत्रांचा हिस्सा (चालू किमतीनुसार)

(कोटी रु.)

| सेवा क्षेत्र उपविभाग | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|
| व्यापार, दुरुस्ती, हॉटेल उपहारगृहे | १,०५,६०९ | १,२७,७९२ | १,३६,३३३ | १,४८,७२३ | १,६६,२१४ | १,८४,३५१ |
| रेल्वे | ५,९८७ | ६,४९० | ६,८५५ | ८,३०४ | ९,१४८ | १०,२६८ |
| परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त ) | ४१,६९६ (३.९) | ४९,३३१ (३.८) | ५०,८९१ (३.५) | ५६,२७६ (३.५) | ६१,४८४ (३.५) | ६८,३९८ (३.५) |
| साठवण | ९२५ | १,०१९ | १,१४८ | १,२५८ | १,३७८ | १,५४३ |
| दळणवळण व प्रसारण संबंधित सेवा | १५,८९२ | १८,०१२ | २१,७३२ | २४,७०१ | २८,३६८ | ३३,८०९ |
| वित्तीय सेवा | १,१७,८३६ | १,२९,०९१ | १,४९,७३० | १,६४,०७९ | १,७९,२६२ | १,८५,७७१ |
| स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | १,९०,८७० | २,४५,५३८ | २,६५,८१२ | ३,१२,४०८ | ३,५३,०३५ | ४,१५,४४५ |
| सार्वजनिक प्रशासन | ३०,०७० | ४३,३७१ | ४७,९३३ | ५३,१७५ | ५५,३०७ | ६४,६९५ |
| इतर सेवा | ६६,६२५ | ७८,३१८ | ९०,८८२ | १,०६,३६८ | १,१९,३५४ | १,४०,८६६ |
| एकूण सेवा क्षेत्रातील स्थूल मूल्यवृद्धी | ५,८४,५०९ | ६,७७,९६२ | ७,७१,३१६ | ८,७५,२९२ | ९,७३,५५१ | ११,०५,१४६ |

**आधार :** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८ (कंसातील आकडे स्थूल मूल्यवृद्धीशी टक्केवारी दर्शवितात)

## तक्ता क्र.४ : सेवा क्षेत्राचा स्थूल राज्य मूल्यवृद्धी व देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धीचे वृद्धिदर

| वर्ष | महाराष्ट्र | भारत |
|---|---|---|
| २०१२-१३ | ८.३ | ८.३ |
| २०१३-१४ | ८.१ | ७.७ |
| २०१४-१५ | ९.३ | ९.८ |
| २०१५-१६ | ८.० | ९.६ |
| २०१६-१७ | ९.६ | ७.५ |
| २०१७-१८ | ९.७ | ८.३ |

**आधार :** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८

### तक्ता क्र.५ : वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न व क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धीचे वार्षिक वृद्धिदर

| क्षेत्र | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ पूर्वानुमान |
|---|---|---|---|---|---|---|
| • स्थूल राज्य उत्पन्न | ६.१ | ६.९ | ६.३ | ७.६ | १०.० | ७.३ |
| • स्थूल राज्य मूल्यवृद्धी | ६.० | ६.८ | ६.३ | ६.५ | ९.९ | ६.६ |
| • कृषी व संलग्न कार्ये | (-)०.४ | १२.३ | (-)१०.७ | (-)३.२ | २२.५ | (-)८.३ |
| • उद्योग | ५.१ | ३.१ | ८.० | ७.२ | ६.९ | ६.५ |
| | ८.३ | ८.१ | ९.३ | ८.० | ९.६ | ९.७ |
| • सेवा | ९.६ | १.३ | ६.१ | ९.० | ८.९ | ८.० |
| १. व्यापार, दुरुस्ती, हॉटेल व उपहारगृहे, वाहतूक इ. | ८.३ | १२.२ | १०.८ | ८.५ | ९.० | १०.३ |
| २. वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | ६.३ | ७.३ | ९.५ | ५.१ | १२.९ | १०.० |
| ३. सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतरसेवा | | | | | | |

**आधार :** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८

राज्य मूल्यवृद्धीत १२.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा' या क्षेत्रात ९.० टक्के वाढ अपेक्षित आहे. 'सार्वजनिक प्रशासन व संरक्षण' आणि इतर सेवा या क्षेत्रात अनुक्रमे १२.२ टक्के व १३.२ टक्के वाढ अपेक्षित आहे.

२०१२-१३ मध्ये राज्याच्या सेवा क्षेत्राच्या स्थूल राज्य मूल्यवृद्धीत वाटा ८.३ टक्के होता तो २०१३-१४ मध्ये ८.१ टक्के, २०१४-१५ मध्ये ९.३ टक्के, २०१५-१६ मध्ये ८.० टक्के, २०१६-१७ मध्ये ९.६ टक्के होता तर २०१७-१८ मध्ये ९.७ टक्के अपेक्षित होता. देशाच्या सेवा क्षेत्राचा स्थूल उत्पन्नाच्या वृद्धिदरातील वाढ २०१२-१३ मध्ये ८.३ टक्के, २०१३-१४ मध्ये ७.७ टक्के तर २०१४-१५ मध्ये ९.८ टक्के, २०१५-१६ मध्ये ९.६ टक्के, २०१६-१७ मध्ये ७.५ टक्के तर २०१७-१८ मध्ये ८.३ टक्के अपेक्षित आहे.

**वाहतूक व दळणवळण**

कार्यक्षम वाहतूक व दळणवळण व्यवस्था उत्पादकता वाढविण्याबरोबर सामाजिक व आर्थिक शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे. भूपृष्ठ, जल व हवाई हे वाहतुकीचे व पोस्ट, दूरध्वनी आणि इंटरनेट सेवा हे दळणवळणाची माध्यमे आहेत. या सेवा सुलभतेने उपलब्ध होण्यास वाहतूक व दळणवळण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण व प्रगत तंत्रज्ञान मोठ्या प्रमाणावर उपयुक्त ठरेल.

**तक्ता क्र.६ : महाराष्ट्र राज्यातील परिवहन संबंधित स्थिती**

| सेवा /क्षेत्र | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०११-१२ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| रेल्वेमार्गाची लांबी (कि.मी.) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ | ६,१२५ |
| एकूण रस्त्याची लांबी (कि.मी.) | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ | ३,०३,३५९ |
| त्यापैकी पृष्ठांकित (कि.मी.) | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ | उ.ना. |
| मोटार वाहने (हजारात) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९९० | २९,१८६ |

**आधार :** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८ टीप : उ. ना. - उपलब्ध नाही

तक्ता क्र.६ मध्ये महाराष्ट्र राज्यातील परिवहन संबंधित स्थिती विशद केली आहे. राज्यात १९६०-६१ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभाली खालील रस्त्यांची लांबी ३९ हजार कि.मी. होती, ती मार्च २०१७ अखेर ३.०३ लाख कि.मी.इतकी वाढली आहे.

राज्यातील रस्त्यावरील वाहनांची संख्या १९६०-६१ मध्ये १ लाख एवढी होती. ही संख्या २०१६-१७ मध्ये २९२ लाख एवढी झाली. १ जानेवारी २०१८ रोजी वाहनांची एकूण संख्या ३१४ लाख एवढी झाली आहे. (प्रति एक लाख लोकसंख्येमागे २५,८५९ वाहने आणि प्रति कि.मी.रस्त्यामागे १०४ वाहने आहेत.)

सन २०१५-१६ मध्ये मोठी बंदरे व लहान बंदरे यांच्यामार्फत झालेली एकत्रित माल वाहतूक १५३९.९ लाख मे.टन होती. २०१६-१७ या वर्षी ही मालवाहतूक १,६००.९३ लाख मे.टन होती.

म. रा. मा. प. महामंडळाने २०१६-१७ मध्ये प्रति दिवस सरासरी १६,४४७ बसेसमधून ६६.३१ लाख प्रवाशांना घेऊन ५५.८२ लाख कि.मी. प्रवासी वाहतूक केली आहे.

सन २०१६-१७ मध्ये राज्यातील विमानतळावरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे २.७८ लाख मे.टन व ५.४९ लाख मे.टन होती. सन २०१६-१७ मध्ये देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानतळावरून झालेली प्रवासी वाहतूक अनुक्रमे ४१५.०५ लाख व १२८.९१ लाख होती.

प्रस्तुत विषय हा राज्यमार्ग परिवहनाशी संबंधित असल्याने येथे फक्त भूपृष्ठ वाहतुकीचा विचार केला आहे.

**भूपृष्ठ वाहतूक - रस्त्यांचे जाळे**

तक्ता क्र. ७ मध्ये महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखरेखीखालील रस्त्यांची लांबी नोंदविली आहे. रस्त्याच्या जाळ्यामध्ये महामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश होतो. २००१ ते २०२१ च्या रस्ते विकास आराखड्यात राज्यात ३.३७ लाख कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या विकासाचे उद्दिष्ट ठेवले आहे व त्याची अंमलबजावणी सुरू आहे. मार्च २०१७ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभाली खालील रस्त्यांची एकत्रित लांबी ३.०३ लाख कि.मी.होती.

## तक्ता क्र.७ : सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभाली खालील रस्त्यांची लांबी (३१ मार्च रोजी)

(कि.मी.)

| वर्ष महामार्ग | रस्त्यांचे प्रकार | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य रस्ते | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण | एकूण |
| २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| २०१५-१६ | ७,४३८ | ५,१८० | ३३,३३० | ५०,८४४ | ५८,११६ | १,४५,८८१ | ३,००,७८९ |
| २०१६-१७ | १२,२७५ | ३,८६१ | ३०,५८९ | ५२,६३७ | ५८,११६ | १,४५,८८१ | ३,०३,३५९ |

**आधार :** महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८.

२०१४-१५ ते २०१६-१७ या कालावधीत राष्ट्रीय महामार्ग, प्रमुख जिल्हा रस्ते यांच्या लांबीत वाढ झाली, तर इतर जिल्हा रस्ते व ग्रामीण रस्ते यांच्यात कोणताही बदल झाला नाही. प्रमुख राज्य मार्ग व राज्य महामार्ग यांच्या लांबीत घट झाली म्हणजेच हे मार्ग इतर प्रकारात समाविष्ट केले आहेत. राष्ट्रीय महामार्गाच्या कामामुळे राज्यातील एकूण रस्त्यांची लांबी वाढली आहे.

राज्यातील रस्त्यांच्या लांबीचे काम करण्यासाठी वेगवेगळ्या योजनांमधून कामे केली जातात. त्यात केंद्रीय रस्तेनिधी, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रकल्प, महाराष्ट्र समृद्धी महामार्ग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रकल्प यांचा समावेश होतो.

राज्यात १ जानेवारी २००१ रोजी एकूण ६६.०७ लाख मोटार वाहने वापरात होती. ती संख्या १ जानेवारी २०१८ रोजी ३.१४ कोटी मोटार वाहने (दर लाख लोकसंख्येमागे २५,८५९ वाहने) एवढी झाली. ती मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ७.६ टक्क्यांनी जास्त आहेत. राज्यातील एकूण वाहनांपैकी ३१.७९ लाख (७.७ टक्के) वाहने बृहन्मुंबईत होती. राज्यात सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभाली खालील असलेल्या प्रति कि.मी. रस्त्यावरील वाहनांची सरासरी संख्या १ जानेवारी २००१ मध्ये ३१ होती ती २०१८ मध्ये १०४ झाली आहे. दर लाख लोकसंख्येमागील मोटार वाहनांची संख्या १ जानेवारी २००१ मध्ये ७,१८६ होती ती १ जानेवारी २०१८ रोजी २५८५९ पर्यंत वाढली आहे.

### सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सुविधा

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

महाराष्ट्र राज्याची जीवनवाहिनी म्हणून ओळखली जाणारी 'लालपरी' म्हणजे एस.टी. २०१८ मध्ये ७० वर्षांची झाली आहे. १ जून १९४८ रोजी निळ्या रंगाच्या फोर्ड व शेवरलेट कंपनीच्या फक्त ३६ बसेसद्वारा विविध १५० मार्गांवर एस.टी.ची सेवा सुरू झाली. महाराष्ट्रात एस.टी.ने प्रवास केला नाही असा माणूस सापडणे खरोखरच कठीण आहे. मुंबईकरांची जीवनवाहिनी ज्याप्रमाणे लोकल सेवा आहे त्याप्रमाणे महाराष्ट्रातील सर्व सामान्यांची जीवनवाहिनी म्हणजे एस.टी.ती एक दिवस जरी बंद राहिली तरी प्रवाशांचे व एस.टी.वर पोट भरणाऱ्यांचे

अतोनात हाल होतात.

१६ नोव्हेंबर, १९५९ ला मुंबई राज्य मार्ग परिवहन महामंडळ स्थापन करण्यात आले. १९६० मध्ये महाराष्ट्र स्वतंत्र्य राज्य झाल्यावर १ जुलै, १९६१ रोजी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (MSRTC) स्थापना करण्यात आली. प्रथम पुणे विभाग सुरू करण्यात आला व प्रत्यक्षात ८ डिसेंबर १९६१ ला पुणे-नगर मार्गावर पहिली एस.टी. धावली.

१९७४-७५ मध्ये प्रवासी वाहतुकीचे संपूर्ण राष्ट्रीयीकरण करण्यात आले. १९८८ पर्यंतची वर्षेही एस.टी. च्या उत्कर्षाची होती. पण १९८८ मध्ये मोटार वाहन कायद्यात बदल करण्यात येऊन पर्यटन परवाने मुक्तपणे देण्यास सुरुवात झाली. तोपर्यंत एस.टी. महामंडळाची मक्तेदारी होती. खाजगी वाहतुकीबरोबरच अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणावर सुरू झाली आणि त्यानंतर खऱ्या अर्थाने एस.टी. महामंडळाला उतरती कळा लागली. २००२ मध्ये न्यायालयाने अवैध प्रवासी वाहतूकीवर बंदी आणली. पण या निर्णयाची काटेकोर व कडकपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही.

जोरदार पाऊस असो की उन्हाचा कडाका अथवा कडाक्याची थंडी असो अशा विविध संकटांच्या खड्यातून मार्ग काढत प्रवाशांना अहोरात्र सेवा देणारी **लालपरी** म्हणजे एस.टी. मागील ६ ते ७ वर्षांपासून खडतर मार्गावरून प्रवास करत आहे. या परिस्थितीत सुधारणा झाली नाही तर एस.टी. बंद पडण्याचा मोठा धोका संभवतो.

**महामंडळाची उद्दिष्टे**

१) दुर्गम आणि ग्रामीण भागाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे.

२) सार्वजनिक उपक्रम म्हणून राष्ट्रीयीकरणाच्या माध्यमातून प्रवासी वाहतूक सेवा पुरवणे.

३) प्रवाशांना स्वस्त, सुरक्षित, नियमित, सुनियंत्रित व दर्जेदार वाहतूक सेवा पुरवणे.

४) कामगारांचे जीवनमान उंचावणे, त्यासाठी योग्य वेतन, भविष्य निर्वाहनिधी, विविध भत्ते, नोकरीची शाश्वती, वैद्यकीय मदत व इतर कल्याणकारी योजना राबवणे.

५) प्रवाशांच्या सोयीसाठी योग्य अशा वाहनांची खरेदी व देखभाल.

६) कर्मचाऱ्यांना शिक्षण, प्रशिक्षण व संशोधनाच्या सोयी उपलब्ध करून देणे.

७) गाड्यांच्या देखभालीसाठी सुसज्ज अशा कार्यशाळा उभारणे.

८) बसस्थानके बांधून त्यात विविध सोयी उपलब्ध करून देणे.

९) अपघात विरहित सेवा देण्याचा प्रयत्न करणे.

१०) प्रवासी वाहतुकीसोबतच माल व पार्सल वाहतूक करणे.

११) आंतरराज्य सेवा पुरविणे. आज महामंडळातर्फे आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, गोवा, कर्नाटक, गुजरात, दादर नगरहवेली व सिलवासा येथे सेवा पुरविली जाते.

**महामंडळाची संरचना**

महामंडळाची संरचनेत डिसेंबर २०१६ पासून बदल करण्यात आला असून आता चार स्तरीय रचनेऐवजी त्रिस्तरीय रचना अंमलात आली आहे. त्रिस्तरीय रचनेत मध्यवर्ती कार्यालय (१) व विभागीय कार्यालये (३१) व आगारे (२५०) यांचा समावेश आहे.

**कर्मचारी संख्या**

३१ मार्च २०१७ रोजी महामंडळात एकूण एक लाख तीन हजार त्रेचाळीस कर्मचारी होते. त्यात प्रथम वर्ग अधिकारी ९१, द्वितीय वर्ग अधिकारी ४८४ यांचा समावेश आहे. प्रत्येक मार्गस्थ बसमागे

सरासरी कर्मचाऱ्यांचे प्रमाण ६.१२ होते.

**वाहतुकीसंबंधी माहिती**

महामंडळाने २०१६-१७ या वर्षात १८,६७५ मार्गावर सरासरी १५,५८५ नियते (शेड्यूलस्) चालविली आहेत व त्यातून २०६.६१ कोटी सार्थ (Effective) किलोमीटरची वाहतूक केली आहे. २०१५-१६ च्या तुलनेत यात ३.४५ लाख किलोमीटरची घट झाली आहे. बसेस दररोज ५६.६१ लाख किलोमीटर चालून ६६.९५ लाख प्रवाशांची वाहतूक केली आहे. एकूण वाहतुकीच्या ९१.८% वाहतूक साध्या सेवेद्वारे करण्यात आली. याच वर्षी यात्रा व उत्सवासाठी १.९३ कोटी किलोमीटरची वाहतूक करून ६६.४६ कोटी रु. तर प्रासंगिक करारातून ५८.६० कोटी रु.चे उत्पन्न मिळाले. मार्च २०१७ ला एस.टी.च्या ताफ्यात ११६ वातानुकुलित बसेस होत्या. त्यांनी २०५.५७ लाख कि.मी.ची वाहतूक करून ३०.११ लाख प्रवाशांना सेवा उपलब्ध करून दिली. मंडळाच्या बसेसचे अपघातांचे प्रमाण २०१२-१३ मध्ये ०.१५ होते; ते २०१६-१७ मध्ये ०.१३ पर्यंत खाली आले आहे. अपघात सहाय्यता निधीमध्ये मृत प्रवाशांच्या वारसांना रु.१० लाख; तर जखमी व विकलांग प्रवाशांसाठी रु.५ लाखापर्यंत आर्थिक साहाय्य व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

२०१६-१७ या वर्षी इंद्रधनु आरक्षण योजनेतंर्गत रु. एक कोटी पाच लाख मूल्याची १९६४१ तिकिटे संगणकीय आरक्षण योजनेद्वारा विकली गेली. एकूण २८,७७९ प्रवाशांनी याचा लाभ घेतला. वाहक व चालकांना उद्दिष्टांपेक्षा जास्त उत्पन्न मिळवल्यास मंडळ विशेष प्रोत्साहन भत्ता देते. जून २०१६ रोजी परिवहन दिनाच्या निमित्ताने एकूण ७,७३५ चालक / वाहकांना रु. २७.०३ लाख प्रोत्साहन भत्ता देण्यात आला.

३१ मार्च, २०१७ ला महामंडळाच्या ताफ्यात एकूण १८६३४ चलनीय बसेस होत्या. १६.१७ या वर्षातील कार्यक्षमतेचे मापन केले तर पुढीलप्रमाणे चित्र स्पष्ट होते. प्रति १० लिटर डिझेलमागे बस ४७.७४ कि.मी. धावते, एक लाख कि.मी. मागे ४.५९ नवीन टायर लागतात; तर एक लाख कि.मी. मागे १०.२१ पुन:स्तरीय (Remolded) टायर वापरले जातात. एक बस दररोज सरासरी ३३६ कि.मी. धावते. मंडळाकडे असलेल्या बसेसपैकी ८९.९६% बसेचाच वापर होतो. ५.३३% बसेस नादुरुस्त असतात. प्रति १०,००० कि.मी. मागे बसेसचे बिघाडाचे प्रमाण ०.३० इतके आहे.

**वित्त व्यवस्था**

२०१६-१७ या वर्षात महामंडळाला एकूण ७०५६.३३ कोटी रु. उत्पन्न मिळाले. त्यातील रु. ६७६९.५० को. रु. प्रवासी उत्पन्न तर रु. २१.३५ कोटी इतर वाहतूक उत्पन्न तर २६५.४८ कोटी रु. चलनेतर उत्पन्न मिळाले. २०१६-१७ या वर्षात महामंडळाचा एकूण खर्च ७५९९.९० कोटी रु. इतका झाला. यातील ४२.३९% खर्च कर्मचारी वर्गावर ३२.४६% इंधन व वंगण, ४.७९% भांडार सामुग्री, दुरुस्ती यावर व ११.८३% प्रवासी कर, मोटार वाहन कर व इतर करांवर झाला. ८.५२% खर्च घसारा, व्याज, विमा व इतर अनामत बाबींवर झाला. महामंडळाला २०१६-१७ या वर्षात मिळालेले उत्पन्न व आलेला खर्च यांची तुलना केल्यास एकूण तोटा ५२२.७८ कोटी रु. इतका झाला. ३१ मार्च २०१७ अखेर रु. २३३०.००१ कोटी रु. इतका संचित तोटा महामंडळाला झालेला असून नुकताच तो ३००० को.रु. पर्यंत वाढला आहे.

**केंद्र व राज्य सरकारला महामंडळाकडून मिळणारे उत्पन्न**

केंद्र व राज्य शासनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर

आणि भांडवल व कर्ज यावरील व्याज याद्वारे बरीच मोठी रक्कम महामंडळाकडून मिळते. या रकमा शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या उत्पन्नाचे साधन आहे. महामंडळाने २०१६-१७ या वर्षी शासनाला मोटार वाहन कर, प्रवासी भाड्यावरील कर व टोल टॅक्स या माध्यमातून एकूण १००६.५३ को. रु. एवढी रक्कम मिळवून दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांना जकात कर व इतर स्थानिक करांच्या माध्यमातून १.६० कोटी रु.; तर याच वर्षी महाराष्ट्र शासनास विक्रीकराच्या रुपाने ६६२.८३ को. रु.; तर केंद्र सरकारला उत्पादन शुल्काच्या माध्यमातून ६७९.२२ को.रु. उत्पन्न मिळवून दिले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे ३१ मार्च २०१७ रोजी केंद्र व राज्य शासनाचे भागभांडवल अनुक्रमे रु. ५६.७७ कोटी व रु. १,३४१.२१ कोटी आहे. म.रा.मा.प. महामंडळाने २०१६-१७ वर्षात प्रतिदिन ६६.१५ लाख प्रवासी वाहतूक केली आहे. मार्गस्थ गाड्यांचे सरासरी भारमान (सवलतींच्या रकमेसह) ६८.७५ टक्के होते. जे आधीच्या वर्षाच्या तुलनेत ०.८ बिंदूंनी कमी झाले आहे. ग्रामीण, वातानुकूलित व शहरी वाहतुकीच्या प्रवासी उत्पन्नावर ३१ मार्च, २०१७ रोजी प्रवासी कराचा दर अनुक्रमे १७.५ टक्के, ५.५ टक्के व ३.५ टक्के होता. म.रा.मा.प. महामंडळातर्फे थेट सेवा पुरविण्यात आलेल्या गावांची टक्केवारी २०१५-१६ मध्ये ७४.५ टक्के होती ती २०१६-१७ मध्ये ७५.६ टक्क्यापर्यंत वाढली आहे; तर थेट सेवा पुरविण्यात आलेली लोकसंख्या २०१५-१६ मध्ये ९१.२ टक्के; त्यात २०१६ मध्ये ९१.७ पर्यंत वाढ झाली आहे. म्हणजेच महामंडळाने ७५.६ टक्के गावांना व ९१.७ टक्के ग्रामीण लोकसंख्येला थेट सेवा उपलब्ध करून दिली आहे. बस थांब्यापासून ३ कि.मी.अंतरावर असलेल्या १५.१ टक्के गावे व ५.६ टक्के लोकसंख्येला, ३ ते ५ कि.मी. अंतर असलेली ५.४ टक्के गावे व १.६ टक्के लोकसंख्या तर ५कि.मी. पेक्षा जास्त अंतरावर असलेली ३.९ टक्के गावे व १.१ टक्के लोकसंख्येला महामंडळाने आपली सेवा उपलब्ध करून दिली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ नियमित वाहतुकीशिवाय यात्रा व नैमित्तिक करार तत्त्वावर विशेष सेवा पुरविते. नैमित्तिक करारात सवलती व विना सवलती असे प्रकार आहेत. पंढरपूर आषाढी व कार्तिकी यात्रा व इतर यात्रा मिळून २०१६-१७ मध्ये महामंडळाने १९२.६२ लाख सार्थ कि.मी. वाहतूक करून एकूण रु.६,६४६.०७ लाख उत्पन्न प्राप्त केले आहे. प्रति कि.मी. हे उत्पन्न रु. ३४.५० इतके आहे. २०१६-१७ मध्ये नैमित्तिक कराराच्या माध्यमातून १७२.७६ लाख सार्थ कि.मी.ची वाहतूक करून रु.५,८६०.२० लाख उत्पन्न प्राप्त केले आहे. प्रति कि.मी. रु.३२.९२ उत्पन्न नैमित्तिक कराराच्या माध्यमातून महामंडळाने मिळविले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेले), कर्करुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, अपंग इ. प्रवाशांना बस भाड्यात सवलत देते. सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. सन २०१६-१७ मध्ये सवलतीची रक्कम रु.१,३५२.७० कोटी होती.

तक्ता क्र.८ मध्ये महामंडळाचे प्रति कि.मी.उत्पन्न व खर्च यांचे विवेचन केले आहे.

महामंडळ, वार्षिक अहवाल २०१६-१७

म.रा.मा.प. महामंडळाचे प्रति कि.मी. उत्पन्न व खर्च विचारात घेतला तर ते सातत्याने वाढत गेल्याचे दिसते मात्र २०१२-१३ पासून प्रति कि.मी. खर्चात उत्पन्नाच्या तुलनेत जास्त वाढ झाली आहे. परिणामत: गेल्या पाच-सहा वर्षांपासून महामंडळ तोट्यात येत

**तक्ता क्र. ८ : म.रा.मा. प. महांडळाचे प्रति कि.मी. उत्पन्न आणि प्रति कि.मी. खर्च (रु.)**

| वर्ष | प्रति कि.मी. उत्पन्न (रु.) | प्रति कि.मी. खर्च (रु.) | प्रति कि.मी. नफा-तोटा (पूर्वकालीन समायोजन वगळून) |
|---|---|---|---|
| २००७-०८ | २१.६४ | २०.७० | ०.९४ |
| २००८-०९ | २३.१४ | २०.४९ | ०.६५ |
| २००९-१० | २३.६६ | २३.२७ | ०.३९ |
| २०१०-११ | २६.२५ | २६.०३ | ०.२२ |
| २०११-१२ | २८.२३ | २७.९३ | ०.३० |
| २०१२-१३ | ३०.५८ | ३२.९३ | -१.९५ |
| २०१३-१४ | ३२.९२ | ३५.८२ | -२.९० |
| २०१४-१५ | ३४.८२ | ३७.८९ | -३.०७ |
| २०१५-१६ | ३४.६८ | ३५.५५ | -०.८७ |
| २०१६-१७ | ३४.१५ | ३६.७८ | -२.६३ |

**आधार :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, वार्षिक अहवाल २०१६-१७

आहे. यामागील कारणांमध्ये इंधनाच्या दरात सातत्याने होणारी वाढ, खाजगी प्रवासी वाहतुकीची स्पर्धा, रस्त्यांची दुर्दशा यामुळे बसेसमध्ये होणारे बिघाड व दुरुस्ती वरील खर्चातील वाढ इत्यादींचा समावेश होतो.

२०१६-१७ मध्ये म.रा.मा.प. महामंडळाच्या बसेसचे एकूण २,७७२, अपघात झाले व या अपघातात ४४५ व्यक्ती मृत पावल्या तर ४,७४५ व्यक्ती जखमी झाल्या. प्रति एक लाख कि.मी. मागे अपघात होण्याचे हे प्रमाण ०.१३ आहे. महामंडळाने यावर्षी रु.७,८३१.७७ लाख एवढी रक्कम अंतिम भरपाई दिलेली आहे.

म.रा.मा.प. महामंडळ शहरी प्रवासी वाहतूकही करते. राज्यातील २१ शहरात ही सुविधा उपलब्ध आहे. यापैकी सात शहरात म.रा.मा.प. महामंडळ, बृहन्मुंबईत बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट), पुणे व पिपंरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ (पी.एम.पी.एम.एल.) आणि उर्वरित ११ शहरात संबंधित महानगरपालिका / नगरपरिषद प्रवासी वाहतूक सेवा पुरवितात. म.रा.मा.प.महामंडळाने ज्या सात शहरात शहर वाहतूक सेवा उपलब्ध केली आहे तेथे २०१७ मध्ये मार्गस्थ वाहनांची प्रतिदिन सरासरी संख्या ४६७ असून प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक २.३५ लाख इतकी आहे आणि प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक ०.८४ लाख कि.मी.इतके आहे. म.रा.मा.प. महामंडळाला २०१७ या वर्षी शहर वाहतूक सेवेमुळे ३,०८० लाख रुपये इतका तोटा झाला आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चालवणाऱ्या जाणाऱ्या (बेस्ट) सेवेलाही आता घरघर लागली आहे. रोज सरासरी वाहतूक होणारी ४२ लाख

प्रवाशांची संख्या आता २५ लाखांवर आली असून बेस्ट ७२० कोटी रुपयांच्या तोट्यात आहे.

**एस.टी. महामंडळ तोट्यात असण्याची कारणे**

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही नफा कमावण्यासाठी नसतेच, पण ती निदान ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालायला काहीच हरकत नाही. २०१२-१३ पासून एस.टी. महामंडळाला सातत्याने तोट्याला तोंड द्यावे लागत असून एस.टी.चा कारभार डबघाईला आलेला आहे. तोट्यात प्रत्येक वर्षी भरच पडत आहेत. तोट्याची अनेक कारणे आहेत.

**१) खाजगी वाहनांपासून असणारी स्पर्धा :** आज प्रत्येक शहरातून आरामदायी लक्झरी बस सेवा सुरू झाली आहे. टप्पा वाहतुकीची परवानगी नसतानाही सर्व नियम धाब्यावर बसवून सर्रासपणे वाहतूक केली जाते. कोणत्याही बसस्थानकाच्या ५०० मीटरच्या आत खाजगी वाहनांना उभे राहण्यासाठी बंदी असतानाही स्थानकाच्या दारात खाजगी वाहतूक करणाऱ्या बसेस उभ्या केल्या जातात. वेळप्रसंगी स्थानकाच्या आत येऊन प्रवासी पळवले जातात. यामुळे महामंडळाचे ६०० कोटी रु.चे उत्पन्न बुडते.

**२) चोरटी वाहतूक :** काळ्यापिवळ्या गाड्या, मोठ्या रिक्षा, टेम्पो, जीप्स यांच्या माध्यमातून बेकायदेशीरपणे वाहतूक केली जाते. क्षमतेपेक्षा कितीतरी जास्त प्रवासी बसवले जातात. एरवी या सगळ्या प्रवाशांनी एस.टी.ने प्रवास केला असता. त्यामुळे एस.टी.त उभ्याने प्रवास करावा लागत आहे, असे चित्रच आजकाल दिसत नाही. १० आसनी खाजगी गाड्यांमध्ये १५ ते २० प्रवासी; तर ५० आसनांच्या एस.टी.त २५ ते ३० प्रवासी असे विदारक चित्र पाहायला मिळते.

**३) सवलती :** एस.टी. लोकोपयोगी सेवा असल्यामुळे प्रवाशांना विविध २४ प्रकारच्या सवलती दिल्या जातात. ज्येष्ठ नागरिकांना साध्या गाडीत ५०%, शिवशाहीत ४५%; तर ए.सी. स्लीपर कोचमध्ये ३०% भाडे सवलत दिली जाते. ५ ते १२ वर्षांपर्यंतच्या मुलांना ५०% सवलत आहे. यामुळे महामंडळाचे जे आर्थिक नुकसान होते त्याची भरपाई शासनाकडून लवकर होत नाही. आज महामंडळाला शासनाकडून १९१३ कोटी रु.चे घेणे आहे.

**४) ब्रीद वाक्य :** गाव तेथे एस.टी., बहुजन हिताय बहुजन सुखाय हे एस.टी.चे ब्रीद वाक्य आहे. त्यामुळे दुर्गम डोंगराळ प्रदेशात एस.टी. आपली सेवा देत असते. ग्रामीण भागातले बहुतेक मार्ग हे तोट्यात चालणारे आहेत.

**५) प्रवासी कराचा जास्त दर :** इतर राज्यांच्या तुलनेत एस.टी.ला जो प्रवासी कर भरावा लागतो तो जास्त आहे. महाराष्ट्रात आज या कराचा दर १७.५% आहे.

**६) पथकर व मोटार वाहन कर :** एस.टी.च्या सेवेला सरकारी सेवा समजून या करातून वगळणे आवश्यक आहे. पण तशा फक्त घोषणा होतात. अंमलबजावणी मात्र होताना दिसत नाही. पथकरापोटी महामंडळाला दरवर्षी ११० कोटी रु.चा भुर्दंड पडतो.

**७) इंधन व सुट्या भागांच्या वाढत्या किमती :** डिझेलच्या दरात सातत्याने उच्चांकी वाढ होत आहे. तसेच टायर ट्यूब/सुटे भाग यांच्याही किमती वाढत आहेत. या किमती वाढल्यानंतरही तिकीटांचे दर महिनोन्‌महिने वाढत नाहीत त्यामुळे तोट्यात भर पडते.

**८) नुकसान भरपाई :** अपघात झाल्यास मृत व जखमी प्रवाशाला आवश्यकतेनुसार नुकसान भरपाई द्यावी लागते. शिवाय दुर्गम अशा डोंगराळ भागात जिथे रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे तेथे बसेस लवकर खिळखिळ्या होतात. त्याची वारंवार दुरुस्ती करावी लागते, टायर्सही लवकर झिजतात त्यामुळे खर्चात वाढ होते.

**९) एस.टी. लक्ष्य :** विविध आंदोलने, संप,

मोर्चे, बंद या काळात सर्वात आधी लक्ष्य केल्या जातात. त्या महामंडळाच्या बसेस. गेल्या एक वर्षात ३६१ बस गाड्यांची मोडतोड करण्यात आली. गाड्यांची दुरुस्ती व दुरुस्त होऊन त्या पुन्हा सेवेत येईपर्यंत रद्द कराव्या लागणाऱ्या फेऱ्या यामुळे महामंडळाचे ३५ कोटी रु.चे नुकसान झाले. यामुळे पुन्हा प्रवाशांचा रोष ओढवतो.

**१०) रस्त्यांची दुर्दशा :** वाहनांची संख्या वेगाने वाढत आहे. त्या प्रमाणात रस्त्यांची स्थिती मात्र जैसे थे आहे. देशात आज २१ कोटी नोंदणीकृत वाहने आहेत. त्यापैकी १२.७% वाहने एकट्या महाराष्ट्रात आहेत. आज खड्डे मुक्त रस्ता सापडणे कठीण आहे. सुरक्षा नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे महाराष्ट्रात गेल्या १५ महिन्यात १५,६२५ लोकांना आपला जीव गमावावा लागला. रस्त्यांवर अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर्स उभारले आहेत. अशा स्पीड ब्रेकर्सवरही एस.टी. चालक वेग कमी करत नाहीत. यामुळे बसेसचे आयुष्यमान तर कमी होतेच; शिवाय देखभालीचा खर्चही वाढतो.

**११) उड्डाणपुलांमुळे होणारे नुकसान :** अनेक गावांतून आज चार पदरी रस्ते होऊन उड्डाणपुलांची बांधणी करण्यात आली आहे. त्यामुळे गावे खाली राहिली. अनेक चालक वाहने खालून न नेता उड्डाणपुलांवरून पुढे नेतात त्यामुळे खाली गावात असलेल्या प्रवाशांना एस.टी.चा लाभ मिळत नाही. त्यामुळे प्रवाशांची संख्या घटते.

**तोटा कमी करण्यासाठी उपाययोजना**

ताज्या आकडेवारीनुसार महामंडळाचा संचित तोटा ३००० कोटी रु.च्या वर गेला आहे. तो कमी करण्यासाठी पुढील उपाययोजना करता येऊ शकतील.

**१) स्पर्धेला आळा-** पोलीस प्रशासन, एस.टी.अधिकारी, व आर.टी.ओ. यांनी संयुक्तपणे सातत्याने कारवाई करून जर चोरट्या वाहतुकीला आळा घालण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आणि जर चोरटी वाहतूक कमी झाली तर एस.टी.च्या उत्पन्नात नक्कीच भर पडू शकते.

**२) विविध सवलतींचा पुनर्विचार-** ज्या २४ प्रकारच्या विविध सवलती दिल्या जातात त्यांची खरोखरच आवश्यकता आहे का? याचा अभ्यास करून ज्येष्ठ नागरिकांना प्रवास भाड्यात जी सरसकट सवलत दिली आहे ती आर्थिक निकषांवर दिली जावी.

**३) सक्षम यंत्रणा-** अनेकजण आज एस.टी.त दिल्या जाणाऱ्या सवलतीचा अयोग्य मार्गाने लाभ घेत आहेत. अर्ध्या तिकिटासाठी वयावरून अनेकदा प्रवासी व वाहक यांच्यात वाद होतात. अर्ध्या तिकिटाची सवलत बंद करायला हरकत नाही किंवा वयासाठी आधारकार्ड सक्तीचे करावे. बोगस लाभार्थी शोधून काढण्यासाठी सक्षम यंत्रणेची गरज आहे.

**४) टोल मुक्ती-** नुसती घोषणा न करता तातडीने एस.टी. साठी टोल मुक्तीचा आदेश काढावा यामुळे तोटा तर कमी होईलच; शिवाय गर्दीच्या वेळी टोल नाक्यावर जे इंधन खर्च होते त्यात व प्रवाशांच्या वेळेतही बचत होईल, टोलचे १६० कोटी रु. यामुळे वाचू शकतील.

**५) प्रवासी कराचा दर कमी करणे-** महाराष्ट्रात आज जो प्रवासी कर आकारला जातो तो कमी करणे किंवा शक्य असल्यास माफ करणे गरजेचे आहे. माफ करणे शक्य नसल्यास हा कर निदान १०% पर्यंत कमी करावा.

**६) वेळापत्रकाची योग्य आखणी-** अनेकदा वेळापत्रक योग्यरीतीने आखले जात नाही. काही वेळा एका मागोमाग एक अशा बसेस एकाच मार्गावर धावताना दिसतात; तर काही वेळा दोन ते तीन तास बसच नसते. अशावेळी प्रवासी नाइलाजाने खाजगी वाहनांचा आधार घेतात.

**७) जाहिरातींपासूनच उत्पन्न-** एस.टी.वर किंवा

बसस्थानकात जास्तीत जास्त जाहिराती मिळविण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. एस.टी.वर असणारी जाहीरात हजारो लोक पाहू शकतात. जो कर्मचारी जाहीरात मिळवून देईल त्याला जाहीरात किमतीच्या ५ ते १०% कमिशन दिल्यास जाहिरातींचे उत्पन्न नक्कीच वाढू शकेल.

**८) चालक-वाहकांना प्रोत्साहन-** आज २५ वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त काळ अपघात विरहित सेवा देणाऱ्या चालकांना रु.१४०००/- चे बक्षीस देऊन गौरवले जाते. त्याप्रकारे जो वाहक जास्तीत जास्त प्रवाशांची वाहतूक करेल त्याचाही गौरव करण्यात यावा. दरवर्षी एक महिना प्रवासी वाढवा योजना राबवली जाते. त्यात प्रत्येक आगारातून जास्त उत्पन्न मिळवून देणाऱ्या किमान १० वाहकांचा सत्कार केला जावा म्हणजे ते आणखी जोमाने काम करतील.

**९) इंधन दरात सवलत-** तेल कंपन्यांनी एस.टी.ला इंधन दरात सवलत द्यावी कारण एस.टी. ला दरवर्षी सुमारे अडीच हजार कोटी रु.चे डिझेल लागते. महामंडळास रोज १२ लाख १२ हजार ५०० लिटर डिझेलचा पुरवठा हवा असतो. एस.टी.साठी डिझेलचे दर प्रत्येक जिल्ह्यात १ आणि १५ तारखोला बदलतात. हे दर वाढत चालल्याने तोट्यात रोज एक कोटी रुपयांची भर पडत आहे. सीएनजी किंवा बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या तयार करण्यासाठी संशोधन झाले पाहिजे.

**१०) तिकिटांचे दर कमी जास्त करण्याची परवानगी-** डिझेल दर वाढल्यानंतरही दीर्घ काळापर्यंत एस.टी.चे दर वाढत नाहीत. सणासुदीच्या काळात दर वाढवण्याची परवानगी देण्यात यावी. यंदा १ ते २० नोव्हेंबर २०१८ या कालावधीत शिवशाही वगळता इतर सर्व बसेसच्या भाड्यात १०% वाढ करण्याची घोषणा परिवहन मंत्र्यांनी केली आहे. भारतीय रेल्वेनेही आता या पद्धतीचा अवलंब सुरू केला आहे. हंगामात जास्त भाडे बिगर हंगामात कमी भाडे अशी पद्धत रेल्वे अवलंबत आहे.

**११) अधिक आकर्षक व दर्जेदार सेवा देण्याचा प्रयत्न-** एस.टी.ने ही आता कात टाकायला सुरुवात केली आहे. लालपरी, महाबस, परिवर्तन (२ बाय २) निमआराम, एशियाड, यशवंती, हिरकणी, अश्वमेघ, शिवनेरी व शिवशाही व आता शिवशाही स्लीपर असा टप्पा महामंडळाने गाठला आहे. सहलीसाठी शिवशाही बसेस सवलतीच्या दराने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शिवनेरी व शिवशाही या बसेस वातानुकूलीत, दिसायला आकर्षक असल्यामुळे प्रवासी निश्चितच पुन्हा एकदा एस.टी.कडे वळतील यात कोणतीही शंका नाही. सध्या महामंडळाकडे २००० शिवशाही बसेस असून त्यातल्या फक्त ५०० एस.टी. मालकीच्या व १५०० बसेस खाजगी कंत्राटदारांच्या आहेत. सध्या या बसेस फक्त फायद्याच्या मार्गावरच चालवल्या जात असून त्यांचे योग्य वेळापत्रक आखण्याची गरज आहे.

**१२) वाहक विरहित बसेसची संख्या कमी करणे-** एस.टी. ने शटल सेवा म्हणजे विना वाहक विना थांबा बसेस सुरू केल्या आहेत. यामुळे प्रवाशांचा वेळ वाचतो हे जरी खरे असले तरी यामुळे वाटेतले प्रवासी घेता येत नाहीत. बसस्थानकातून बाहेर पडून मार्गस्थ होईपर्यंत वाटेत अनेक प्रवासी थांबलेले असतात. त्यांना घेणे विना थांबा विना वाहक सेवेमुळे शक्य होत नाही. त्यामुळे बस शहराबाहेर पडेपर्यंत वाहक उपलब्ध करून दिल्यास प्रवाशांची सोय होऊ शकेल.

**१३) सीटी बससारखी सेवा देणे-** बाहेरगावाहून येणारी एस.टी. मुख्यस्थानकात येईपर्यंत अनेक थांबे असतात. या थांब्यावरून मुख्य स्थानकापर्यंत १० रु. तिकीट देऊन प्रवासी घेतल्यास एस.टी.ला फायदा होऊ शकेल.

**१४) एस.टी. स्थानकात छोटी सिनेमागृहे-** एस.टी. स्थानकात ६० आसनी सिनेमागृहे उभारण्याची

घोषणा नुकतेच परिवहन मंत्र्यांनी केली आहे. ज्या प्रवाशांना लवकर गाडी नसते; पण आधीपासून स्थानकात येऊन बसावे लागते अशा प्रवाशांना याचा फायदा घेता येईल. तसेच गावातील लोकही याचा फायदा घेऊ शकतील. नाशिक आगारात अशा सिनेमागृहांचे काम सुरू झाले आहे.

**१५) पार्सल सेवेचे आधुनिकीकरण व संगणकीकरण-** एस.टी. पार्सल सेवेला आज खाजगी कुरिअर कंपन्यांकडून गळेकापू स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे पार्सल सेवेचा जास्तीत जास्त प्रसार झाला पाहिजे. त्यासाठी पार्सल सेवेचा दर्जा सुधारणे व १००% संगणकीकरण करणे गरजेचे आहे. वेळप्रसंगी पार्सल घरपोच देण्याची सोय केल्यास लोक या सेवेचा मोठ्या प्रमाणात फायदा घेतील.

**१६) सेवांचा दर्जा सुधारणे-** एस.टी. स्थानकात लागण्यापूर्वी ती स्वच्छ आहे की नाही याची खात्री करणे, एस.टी. बसेसमध्ये वाय.फाय.सेवा व मोबाईल चार्जिंगची सोय करणे, लांब पल्ल्यांच्या गाड्यांमध्ये करमणुकीची साधने उपलब्ध करून देणे, शक्य असल्यास पिण्याचे बाटली बंद पाणी व रोजची वर्तमानपत्रे उपलब्धे करून देणे, स्लीपर कोचेसमध्ये स्वच्छ अंथरूण-पांघरूण पुरवणे, प्रवाशांशी सौजन्याने वागणे, बसेस वेळेवर चालवणे, अधिकृत थांब्यावरच बसेस थांबवणे व वाहतुकीचे सर्व नियम काटेकोरपणे पाळणे इत्यादी गोष्टींचा अवलंब झाल्यास एस.टी.ला नक्कीच परत सुगीचे दिवस येतील.

**समारोप**

आज व्यवसाय, उद्योग, कोर्ट कचेरी, लग्नसराई, सण व उत्सव, शिक्षण व प्रशिक्षण, नातेवाइकांना भेटणे, तीर्थयात्रा, सहली, वैद्यकीय कारणांसाठी आणि यातले काहीच नसले तर कंटाळा घालवण्यासाठी लोक प्रवास करतात. यासाठी बहुतेकांना एस.टी.चाच आधार असतो. वेतनवाढीसाठी २०१७ च्या दिवाळीत कर्मचाऱ्यांनी अचानक चार दिवसांचा संप पुकारला, त्यानंतर दोन दिवसांचा संप पुकारला कर्मचाऱ्यांचे वेतन कापले गेले. जतनेची गैरसोय झाली पण जनतेची सहानुभूती मात्र कर्मचाऱ्यांच्याच बाजूने होती.

एस.टी. आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हायला हवी असेल तर तिचे आर्थिक गणित, अद्ययावत वाहने व ते वापरण्याची कौशल्य असलेले आवश्यक तेवढे मनुष्यबळ यांचा ताळमेळ साधला गेला पाहिजे. तसेच राजकीय नेतृत्वाची इच्छाशक्तीही तेवढीच महत्त्वाची ठरते. परिवहन मंत्री  ना. दिवाकर रावते व त्यांचे सहकारी यासाठी कसोशीने प्रयत्न करताना दिसत आहेत. बसगाड्यांचा दर्जा आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार असायला हवा. तसेच या गाड्या चालवण्याचे शास्त्र शुद्ध प्रशिक्षणही हवे. केवळ कंत्राटी चालक व प्रशिक्षणाचा अभाव यामुळे नव्यानेच सुरू झालेल्या शिवशाही बसेसचे गेल्या एक वर्षात २३० अपघात झाले, त्यातले १९० गंभीर स्वरूपाचे होते. वेळापत्रक, फेऱ्या, चालक-वाहकांच्या कामाच्या वेळांचे योग्य नियोजन होणे आवश्यक आहे. त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा शक्य असेल तेवढा वापर केला जावा.

१९४८ ते २०१८ या ७० वर्षात एस.टी.ने प्रगतीचा फार मोठा पल्ला गाठला आहे. राज्याच्या आर्थिक, सामाजिक तसेच शैक्षणिक विकासात परिवहन महामंडळाने मोठा हातभार लावलेला आहे. अत्यंत कमी पगार व तुटपुंजे भत्ते मिळत असतानाही एस.टी.चे प्रामाणिक वाहक, चालक व कर्मचाऱ्यांनी एस.टी.ला चांगले दिवस दाखवले आहेत. महामंडळ तोट्यात आहे. हे कर्मचाऱ्यांना वर्षांनुवर्षे सांगितले जात आहे. एस.टी. जगली तर आपण जगू, तिचा विकास म्हणजे आपला विकास असे मानत महामंडळाचे बहुसंख्य कर्मचारी साधे जीवन जगत आहेत. कर्जाच्या ओझ्याखाली आपले कधी ना कधी भले होईल या आशेने रात्रंदिवस आपल्या कुटुंबापासून

दूर राहून ऊन, पाऊस विविध सण यांची पर्वा न करता असतील तशा गाड्या चालवून प्रसंगी आपला जीव धोक्यात घालून एस.टी. पुढे पुढे नेतच आहेत. आपल्या वेतन वाढीच्या मागणीसाठी वारंवार आंदोलने, निवेदने देत आपले प्रश्न सुटण्याची वाट पाहत आहेत. अधिकृत व अनधिकृत अशा २० ते २२ संघटना गेल्या २० वर्षांपासून कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी वाटाघाटी करत एस.टी.चा कारभार सुरू ठेवत आहेत.

एस.टी.वाचलीच पाहिजे, जगलीच पाहिजे याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही; पण रात्रंदिवस घराबाहेर असणाऱ्या चालक वाहकांना आपण काय वागणूक देतो, त्यांचे निवारे कसे आहेत याचा कधी विचारच केलेला नाही. खाजगीवर अंकुश, व्यावसायिक धोरण आणि सरकारने सहानुभूतीने पाहिले तरच कर्मचाऱ्यांना भवितव्य आहे व एस.टी. वाचणार आहे व ती वाचलीच पाहिजे नव्हे जगलीच पाहिजे.

**संदर्भसूची**


1) Arrora S. K., Economixs of Management in Road Transport Industry, Deep & Deep Publications, 1987.
2) Denys Munby (editor),Transport, Pengwin Books, 1968.
3) Dudly F. Pegrum, Transportation Economic and Public Policy, Rechard D. Irwin, Inc. Homewood, Illinais-1963.
4) Jain J. K., Transport Economics, Chaitanya Publishing House, Allahabad, 1979.
5) Madhoo Paraskar, Second India Studies, Tranport, Tata Economics Consultancy Services, Popular Prakashan Bombay, 1978.
6) MahajanV. S. (editor),Transport Planning Policy and Development, Deep and Deep Publication, 1991.
7) Ministry of Statistics and Programme Implementation, Planning Commission, Government of India, 21 March 2017.
8) Nagar and Gautam, Principles and Problem of Indian Transport, Kailash Pustak Sadan, Gwalier, Bhopal, 1969-70.
9) NCAER, Employment Potential of Rail and Road Transport, National Counci of Applied Economic Research, 1980.
10) NCAER, Road Transport Industry, A Review NCAER, New Delhi, 1979.
11) NCAER, Some Aspects of Goods Transport by Road in the Delhi Region,Occasional Paper, No.2, National Council of Applied Economic Research, New Delhi, 1958.
12) Srivastava S. K., Economics of Transport with Special Reference to Transport Development in India, S. Chand & Co. (Pvt.) Ltd., 1971.
१३) भारताची आर्थिक पाहणी २०१७-१८.
१४) डॉ. भांडवलकर राजेंद्र, यवतमाळ जिल्ह्याच्या आर्थिक विकासात राज्य परिवहन महामंडळाचे योगदान (कालावधी : १९९५ ते २००२), अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध.
१५) बोचरे बाळासाहेब, एस.टी. फायद्यात कधी येणार, दैनिक लोकमत, २४ मे २०१८.
१६) श्री. काटे सचिन, लालपरीची सत्तरी, दैनिक दिव्य मराठी, २ जून २०१८.
१७) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१७-१८.
१८) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, प्रशासन अहवाल २०१६-१७.
१९) डॉ. मोडक शंकर, आधुनिक परिवहनाचे अर्थशास्त्र, महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर-पुणे, प्रथमावृत्ती १९८०.
२०) शिंदे संदीप, एस.टी. जगवायलाच हवी, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, १९ जून २०१८.


■

# महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या; २००१-२०१८: मराठवाडा आणि विदर्भातील आत्महत्यांचे जिल्हानिहाय संख्यात्म, स्थलवास्तव, नियोजन व संकल्पनात्मक परिप्रेक्ष्य विश्लेषण

ज्ञानदेव तळुले †

**प्राक्कथन**

प्रस्तुत संशोधन टिपण प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्यांवरील प्रस्तावित विस्तृत परिप्रेक्ष्य अभ्यासाचा पूर्वांगुलीनिर्देश मानावा लागेल. प्रस्तावित संशोधन जानेवारी २००१ ते डिसेंबर २०१७ दरम्यान अनुक्रमे उस्मानाबाद व यवतमाळ जिल्ह्यांत झालेल्या शेतकरी आत्महत्यांवरील जनगणना सर्वेक्षणावर बेतले आहे. प्रस्तुत संशोधन टिपण प्रामुख्याने मराठवाडा व विदर्भातील अठरा वर्षांच्या जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्यांचे संख्यात्म, स्थलवास्तव, नियोजन व संकल्पनात्म परिप्रेक्ष विवेचन करत आहे. आकडेवारीचा कालावधी जानेवारी २००१ ते जुलै २०१८ दरम्यानचा आहे. मराठवाडा व विदर्भातील जिल्हानिहाय एकूण पात्र व अपात्र शेतकरी आत्महत्या मृत्यूदराचे मापन व व्यवच्छेदक विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठवाडा व विदर्भ हे दोन्ही प्रांत केवळ राज्यातच नव्हे; तर देश विदेशपातळीवरील शेतकरी आत्महत्यांची सर्वाधिक प्रभावी क्षेत्रे म्हणून ओळखली जातात नव्हे तशी जागतिक प्रतिमा तयार झाल्याचे दुर्दैवी वास्तव आहे. प्रस्तुत विश्लेषण अनुक्रमे औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्तालयांत आत्महत्यांवरील संकलित माहितीवर निर्भर आहे. प्रत्येक जिल्ह्यातील संबंधित पोलीस आकडेवारी विभागीय आयुक्तालयाकडे जमा होऊन राज्य गुन्हे अन्वेषण विभागातील राज्य अपराध माहिती ब्युरोकडे संकलित होऊन तद्नंतर हीच माहिती राष्ट्रीय अपराध संकलन ब्युरोच्या आकडेवारीचा स्त्रोत म्हणून वापरली जाते. एकूण पात्र व अपात्र शेतकरी आत्महत्यांचे वार्षिक आत्महत्या मृत्यूदर प्रति लक्ष कास्तकारी लोकसंख्येवर आधारित शोधले जातात.

या कामी आवश्यक जिल्हा, विभाग व प्रदेशनिहाय एकूण कास्तकारी लोकसंख्येची आकडेवारी अनुक्रमे सन २००१ व सन २०११ च्या जनगणनेमधून प्राप्त केली आहे. कृषी जनगणनेचा वापर जाणिवपूर्वक टाळला आहे. कृषी जनगणनेद्वारा एकूण परिचलित धारणक्षेत्रांची संख्या दिली जाते. परिणामे यामधून जिल्हानिहाय कास्तकारी लोकसंख्येची माहिती प्राप्त होऊ शकत नाही. कारण एका परिचलित धारणक्षेत्रावर एकापेक्षा अधिक

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

आजीव सभासद क्र. ८१७ भ्रमणध्वनी :९४२३७५०५५५/९९२१८९०८४४, ई-मेल : dnyanshrinit@gmail.com

कास्तकार निर्भर असण्याची शक्यता असते. अथवा एकापेक्षा अधिक परिचालन धारणक्षेत्रे एकाच कास्तकाराकडे असूही शकतात. परिणामे परिचालन धारणक्षेत्राच्या आकडेवारीवरून अचूक कास्तकारी संख्या मिळणे शक्य नाही. तसेच लोकसंख्या जनगणनेत कास्तकार व शेतमजूर या दोन घटकांत भेद करून प्रत्येकाची संख्या वेगळी दिली जाते. कारण भारतीय ग्रामीण रचनेत कास्तकार व शेतमजूर हे दोन प्रवर्ग भिन्न व स्वतंत्र असे प्रबळ घटक मानले जातात. त्यांना एकत्र संबोधणे शक्य नाही. त्यामुळे कास्तकार संख्याविषयक जनगणनेतील माहिती कृषी जनगणना माहितीपेक्षा अधिक वास्तव मानावी लागेल. शेतकरी आत्महत्यांची पात्र व अपात्र अशी श्रेणीबद्धता ही बाब महाराष्ट्रातील प्रशासकीय भूमिकेशी संबंधित आहे. राज्य सरकारकडून आत्महत्याग्रस्त कुटुंबास एक लक्ष रुपये सानुग्रह अनुदान दिले जाते. जर आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या नावे जमिनीचा ७/१२ उतारा नसेल तर अशी आत्महत्या अपात्र आत्महत्या म्हणून नोंदली जाते. ७/१२ उतारा महसूल विभागाचे जमीन मालकी हक्क निश्चित करणारा दस्तऐवज मानला जातो. आणि जर आत्महत्या केलेल्या व्यक्तीच्या नावे जमिनीचा ७/१२ उतारा नसेल तर अशी व्यक्ती शेतकरी नव्हती असा निष्कर्ष काढला जातो. पर्यायाने आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे कुटुंब एक लाख रुपये सानुग्रह अनुदानास अपात्र ठरते. नव्हे तसे ते ठरविले जाते. म्हणजेच प्रस्तुत आत्महत्या ही शेतकरी आत्महत्या संबोधण्यास अपात्र ठरविली जाते. पर्यायाने राज्यातील एकूण शेतकरी आत्महत्यांचा मोठा भाग आपोआपच अपात्र शेतकरी आत्महत्या म्हणून वर्गीकृत केला जातो. सामाजिक शरम, मानमरातब अथवा अन्य कारणांमुळे कुटुंबातील आत्महत्या न नोंदविणे अशी भारतीय समाजमनाची प्रवृत्ती प्रबळ आहेच. पर्यायाने राज्य सरकारच्या पात्र व अपात्र शेतकरी आत्महत्या अशा श्रेणीबद्धतेमुळे शेतकरी आत्महत्यांची संख्या निम्नतम भासण्यात याचे पर्यवसन होते. अनेक कारणांमुळे शेतकरी व बिगर शेतकरी आत्महत्या कल विश्लेषण एकतर पर्याप्त नाही किंवा ते असंबद्ध ठरते. याची मुख्य दोन कारणे संभवतात. एक म्हणजे उपरोल्लेख केल्याप्रमाणे अथवा इतर कारणांमुळे भारतातील आत्महत्यांची माहिती कुटुंबपातळीवरच दडविली जाते. आणि दुसरे कारण म्हणजे अनेक अभ्यासकांचा असा आरोप आहे की जनगणनेद्वारा नमूद कास्तकारांची संख्या अवास्तवपणे अतिवृद्ध आहे. हे मान्य केले तर असे अनुमान निघते की भारतातील आत्महत्या मृत्यूदर निश्चितपणे अवप्राक्कलनीयच असणार (मिश्रा, २०१४).

**प्रास्ताविक**

आर्थिक सुधारोपरांत गेल्या दोन दशकांहून अधिक कालखंडात देशभरात होणाऱ्या शेतकरी आत्महत्या हा एक चिंतेचा विषय बनला आहे. आंध्रप्रदेश (आंध्र व तेलंगणा), कर्नाटक आणि महाराष्ट्र यांसारखी राज्ये अखिल भारतीय स्तरावर शेतकरी आत्महत्यांची दाहक स्थळे बनली आहेत. शेतकरी आत्महत्यांचा विषय देशपातळीवर प्रामुख्याने शैक्षणिक संशोधनकामीच्या विश्लेषणापुरता मर्यादित राहिला असून लोककल्याणकारी नियोजनात मात्र या समस्येकडे फारसे लक्ष दिले गेले नाही असेच निष्पन्न होते. परंतु यथावकाश असे लक्षात येते की, शेतकरी आत्महत्या ही एक दुर्दैवी व गुंतागुंतीची समस्या आहे. आत्महत्यांची मोजदाद जरी सहज शक्य असली तरी त्यामागील कारक घटकांचा मागोवा घेऊन संपूर्ण समस्येचे निराकरण करणे जवळपास दुरापास्त असल्याचे दिसून येते. असे अनुमान लावले जाते की, सन १९९९ ते २०१० दरम्यान आत्महत्येमुळे जीवनमान वर्षे गमाविण्याचे प्रमाण १२ टक्क्यांनी

वाढले असून जागतिक पातळीवर भारताचे स्थान वीस (२०) वरून आठव्या (०८) स्थानापर्यंत वर चढले आहे (मिश्रा, २०१४). ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज २०१० च्या अंदाजानुसार आत्महत्येमुळे जीवनमान वर्षे गमविण्यात जागतिक पातळीवर भारताचे प्रमाण ३५.६० टक्के आहे (कित्ता). जागतिक लोकसंख्येत देशाच्या हिश्याचा विचार केला तर हे प्रमाण अपेक्षित सरासरीच्या दुप्पट आहे. भारतात राष्ट्रीय पातळीवर आत्महत्याविषयक आकडेवारी राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरोमार्फत (NCRB) संकलित करून प्रसारित केली जाते. प्रत्येक पोलीस स्टेशनद्वारा संकलित केलेली आत्महत्याविषयीची माहिती राज्य अपराध रेकॉर्ड ब्युरो (SCRB) कडे जिल्हानिहाय एकत्रित करून राष्ट्रीय पातळीवरील एकत्रित माहितीकरिता राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरोकडे संकलित केली जाते. परंतु भारतातील एकूण आत्महत्याविषयक माहिती ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज (GBD)च्या अंदाजापेक्षा जवळपास पन्नास टक्के कमी असल्याचे अनेक अभ्यासकांचे मत पडते,. याची अनेक कारणे दिली जातात. विशेष म्हणजे भारतातील आत्महत्यांशी निगडित गुन्हे अन्वेषण पद्धती सदोष आहे. कारण इंडियन पिनल कोड (IPC) मधील तरतुदीनुसार, आत्महत्या हा गुन्हा मानला जातो. त्यामुळे आत्महत्येने आलेला मृत्यूही अनेकदा आकस्मित मृत्यू म्हणून कागदोपत्री नोंदविला जातो. तसेच जनलज्जेस्तव व समाजप्रतिष्ठेमुळे कुटुंबातील आत्महत्या न सांगण्याचा लोकांचा कल असेही भारतीय समाजमानस असल्याचे दिसून येते. कास्तकार व शेतमजुरांच्या आत्महत्यांचा एकत्रित विचार होऊच शकत नाही. तसेच या दोन्ही समूहांच्या आत्महत्यांना एकत्रितपणे शेतकरी आत्महत्या असे संबोधणेही शक्य नाही. कारण भारतीय ग्रामीण समाजरचनेत कास्तकार व शेतमजूर हे दोन प्रवर्ग भिन्न व स्वतंत्रपणे प्रबळ समूह मानले जातात. काही देशांत शेतकरी आत्महत्यांमध्ये शेतमजूर आत्महत्यांचा समावेश केलाही जातो. उदाहरणार्थ, युरोप व उत्तर अमेरिकेतील तुलनेने लहान जनसमूहाच्या समस्या विश्लेषण करण्याकामी व आत्महत्या मृत्यूदर काढताना 'कृषी लोकसंख्येच्या' तुलनेत आकडेमोड केली जाते. याकामी जमीन मालक व शेतमजुरांचा एकत्रितपणे विचार केला जातो (कित्ता). परंतु भारतात मात्र कास्तकार व शेतमजूर हे दोन प्रकारचे भिन्न व स्वतंत्र जनसमुदाय असल्यामुळे त्यांचा एकत्रितपणे विचार केला जाऊ शकत नाही. या घटकांस आर्थिक व सामाजिक अशी दोन भिन्न अंगे आहेत. भारतात शेतकरी आत्महत्यांची मोजदाद अधिक क्लिष्ट आहे असे दिसून येते. याचे एक प्रमुख कारण म्हणजे महाराष्ट्रासारख्या शेतकरी आत्महत्याग्रस्त राज्यात एकूण पैकी मोठ्या प्रमाणात आत्महत्यांना अपात्र आत्महत्या म्हणून संबोधले जाते. अशाप्रकारचे वर्गीकरण विशेषत: आत्महत्याग्रस्त कुटुंबाच्या एक लक्ष रुपये सानुग्रह अनुदानाचे प्रकरण निकाली काढताना प्रशासनाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याच्या नावाने जर जमीन मालकी दर्शविणारा ७/१२ उतारा नसेल तर अशी व्यक्ती बिगर शेतकरी घोषित केली जाते. आत्महत्यांच्या आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला तर महाराष्ट्रात अशा प्रकरणांचे प्रमाण एकंदरितच जास्त असल्याचे निदर्शनास येते. मूलत: भारतात शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणच अवप्रक्कलनीय आहे. याची महत्त्वाची कारणे म्हणजे एकतर कास्तकारी लोकसंख्येचे प्रमाण अतिरिक्त दाखविणे व आत्महत्या प्रमाण नोंदणीतील अवप्राक्कलनीयतेचा दृष्टिकोन. या कारणांचे मूळ आपणास माहिती संकलन कार्यप्रणाली व जनमानस या दोन घटकांत सापडते. अशा समस्यांचे स्वरूप महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांच्या पात्र व

अपात्र वर्गीकरणामुळे अधिक गंभीर बनते व शेतकरी आत्महत्यांची संख्या कमी भासण्यात त्याचे पर्यवसन होते.

**माहिती व संकलन**

आत्महत्याविषयक माहिती गावपातळीवरील अथवा पंचक्रोशीतील जवळच्या पोलीस ठाण्यात नोंदविली जाते. हे कार्य प्राथमिक चौकशी अहवालाच्या (FIR) स्वरूपात केले जाते. अशी पोलीस ठाणे पातळीवरील माहिती जिल्हा प्रशासन व विभागीय आयुक्तालयाकडे एकत्रितपणे संकलित केली जाते. विभागीय आयुक्तलयाकडून जिल्हानिहाय माहितीचे हस्तांतरण राज्य अपराध रेकॉर्ड ब्युरोकडे होते (SCRB). याकामी राज्य अपराध अन्वेषण विभाग (CID) जबाबदारी पार पाडतो. महाराष्ट्राच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे मुख्यालय पुणे येथे असून याचा प्रमुख अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाचा भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी असतो. येथून सर्व आकडेवारी राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो (NCRB) कडे एकत्रितपणे संकलित केली जाते. सन १९९५ पासून राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरोमार्फत व्यवसाय व लिंगभेदानुसार राज्यनिहाय व जिल्हनिहाय आत्महत्यांचे वर्गीकरण करण्याचे काम केले जाते. आत्महत्यांचे व्यावसायिक वर्गीकरण करताना जे कास्तकार स्वयंरोजगार तसेच स्वत: भूमिधारक अथवा भाडेपट्ट्याच्या शेतजमिनीवर कास्तकारी करतात, परंतु शेतमजूर नाहीत अशांचा उल्लेख शेतकरी असा केला जातो. आत्महत्या मृत्यूदर शोधण्याकामी अशा वर्गवारीतून प्राप्त होणारी आत्महत्या आकडेवारी व जनगणनेतील कास्तकारी लोकसंख्येचा वापर केला जातो.

जिल्हानिहाय जनगणना गोषवारामध्ये (District Census Abstracts) प्राप्त एकूण कास्तकारी लोकसंख्या घेऊन प्रति लक्ष कास्तकारी लोकसंख्येच्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या मृत्यूदर काढला जातो. अशाच प्रकारची पद्धती आम्ही वापरली आहे. याच आकडेवारीच्या माध्यमातून अनुक्रमे मराठवाडा व विदर्भातील औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागांतील एकूण अठरा (१८) जिल्ह्यांचे शेतकरी आत्महत्या मृत्यूदर शोधले आहेत. याकरिताचा एकूण जानेवारी २००१ ते जुलै २०१८ असा जवळपास अठरा वर्षांचा कालखंड गृहीत धरला आहे. अर्थात, औरंगाबाद विभागाकरिताची शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी जुलै २०१८ पर्यंतची असून अमरावती व नागपूर विभागांची आकडेवारी अनुक्रमे मार्च व जून २०१८ पर्यंतची आहे. विशेष म्हणजे पात्र व अपात्र शेतकरी आत्महत्यांची बेरीज एकूण शेतकरी आत्महत्यांपेक्षा कमी येते. कारण उर्वरित आत्महत्या प्रकरणे चौकशीअंती प्रलंबित आहेत. परंतु शेतकरी आत्महत्या मृत्यूदराची आकडेमोड करताना एकूण शेतकरी आत्महत्यांची आकडेवारी वापरली आहे. म्हणजेच पात्र व अपात्र आत्महत्यांचाच फक्त विचार केलेला नाही तर प्रलंबित प्रकरणेही याकामी विचारात घेतली आहेत. मराठवाडा व विदर्भातील एकूण अठरा (१८) जिल्ह्यांच्या आकडेवारीचे पृथक्करण करून आलेखीकरण केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्यावरील विभागवार जिल्हानिहाय आकडेवारी अनुक्रमे औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्तालय नोंदीवरून प्राप्त केली आहे. इतर उर्वरित जिल्ह्यांची आकडेवारी राज्य अपराध रेकॉर्ड ब्युरो (SCRB) तर राष्ट्रीय व महाराष्ट्राव्यतिरिक्त देशातील इतर प्रमुख शेतकरी आत्महत्याग्रस्त राज्यांची आकडेवारी राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो (NCRB) च्या वार्षिक अहवालांतून प्राप्त केली आहे. म्हणजेच स्थानिक ते राष्ट्रीय पातळीवरील आत्महत्याविषयक माहिती

संकलनाच्या टप्प्यांचा विचार केला तर एकंदरित सर्व पातळीवरील माहितीचा स्त्रोत राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरो (NCRB) आहे, असेच दिसून येते.

**पुनरावलोकन व संदर्भ**

शेतकरी आत्महत्यांमुळे आंध्रप्रदेश (आंध्र व तेलंगणा), महाराष्ट्र आणि कर्नाटक ही राज्ये गेल्या दोन दशकांहून अधिक काळ सातत्याने वर्तमानपत्रांच्या मथळ्यांवर असल्याची दिसून येतात. छत्तीसगड व मध्यप्रदेश ही दोन राज्ये गेल्या काही वर्षांपासून या यादीत समाविष्ट झाली आहेत. खराब हवामान व अनिश्चित पर्जन्यमानामुळे निर्माण होणाऱ्या उत्पादन अनिश्चिततेव्यतिरिक्त अचानक अति उत्पादनामुळे निर्माण होणाऱ्या किंमत घटीच्या अरिष्टाला ही राज्ये पुन्हा-पुन्हा सामोरी गेल्याचे दिसून येतात (मोहन्ती व श्रॉफ २००४). सन २०१६ मध्ये अचानक अतिरिक्त उत्पादनामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना तीव्र किंमत घटीचा सामना करावा लागला होता. उत्पादनांच्या बाजार किमती किमान आधार किमतीच्याही खाली घसरल्या होत्या. देशपातळीवरील स्थितीचा विचार केला तर अंतिम उपभोगत्याने आदा केलेल्या किमतीच्या सरासरी ३२.५० टक्के इतका अत्यल्प मोबदला प्रत्यक्ष कृषी उत्पादकाच्या पदरात पडतो (किमान २०.० तर कमाल ४५.० टक्के). अशा उत्पादन मूल्य परतावा प्रमाणातून देशात शेतकरी कर्जबाजारीपणा व पर्यायाने आत्महत्यांचे संकट निर्माण झाले आहे (ए. नारायणमूर्ती २०१८). उपरोल्लेख केलेल्या राज्यांतील शेतकरी आत्महत्यांवर अनेक अभ्यास झाल्याचे दिसून येतात. वास्तविक पाहता अनपेक्षित पीक उत्पादन अपयशातून येणारे कर्जबाजारीपण जरी शेतकरी आत्महत्यांचे प्रमुख कारण असले (शिवा व जाफरी १९९८; देशपांडे २००२) तरीही ग्रामीण व कृषी सार्वजनिक गुंतवणुकीतील घट, बाजारपेठीय अपूर्णता, कृषी पायाभूत सुविधा व उत्पादन किंमत घटीचा सामना न करू शकणारी सदोष सरकारी यंत्रणा इत्यादी राजकीय अर्थव्यवस्था निर्मित संकटांना अग्रक्रमाने दोष द्यावा लागेल (अस्सादी १९९८; रेवथी १९९८; वसावी १९९९; मोहनकुमार व सरमा २००६). वर उल्लेख केलेल्या राज्यांतील शेतकरी आत्महत्यांवरील बहुतांश अभ्यासकांनी कापूस उत्पादनास दोष दिल्याचे दिसून येते (प्रसाद १९९९). तर उर्वरित अनेक अभ्यासकांनी कापूस उत्पादन कामी लागणाऱ्या अतिरिक्त किटकनाशकांची आवश्यकता आणि बियाणे व खतांच्या सतत वाढत्या किमती अधोरेखित केल्या आहेत.

गुजरातसारख्या इतर राज्यांच्या तुलनेत बियाणांच्या अतिरिक्त किमती व कापूस उत्पादनातील किटकनाशकांची अति आवश्यकता ही महाराष्ट्रातील उत्पादन खर्च वृद्धीची प्रमुख कारणे आहेत (ए. वैद्यनाथन २००६). अधिक उत्पादन शाश्वततेची प्रसिद्धी केलेल्या बीटी कापसाची लागवड करण्याकडे या शेतकऱ्यांचा कल असल्याचे दिसून येते. परंतु या जातींच्या कापसाची उत्पादकता प्रामुख्याने पाणीपुरवठ्याच्या सुविधा व शाश्वततेवर निर्भर असते. गुजरातसारख्या राज्यात बीटी कापसाचे उत्पादन शाश्वत ओलीताखालील शेतावर केले जाते. तसेच बीटी कापसाची बियाणे गुजरातमधील शेतकऱ्यांना भारतीय कंपन्यांकडून विकसित करून पुरविली जातात. महाराष्ट्रातील शेतकरी मात्र बीटी बियाणांकरिता बहुराष्ट्रीय कंपन्यांवर निर्भर असल्यामुळे त्यांना गुजरातपेक्षा बियाणांकरिता अधिक किंमत मोजावी लागते (ए.वैद्यनाथन २००६). आर्थिक उदारीकरणोपरांत कापसाच्या आयातीत सतत वाढ होत गेल्यामुळे बाजारपेठेत किंमत घटीची प्रवृत्ती दिसून आली. तर याउलट आदान खर्च वृद्धी होत गेल्यामुळे उत्पादन

खर्चात सतत वाढ होत गेली. विदर्भ आणि मराठवाड्यातील बहुतांश कापूस उत्पादन क्षेत्र कोरडवाहू असल्याचे दिसून येते. तसेच गुजरातसारख्या शेजारी राज्यापेक्षा बियाणांच्या अधिक किमती या शेतकऱ्यांना आदा कराव्या लागतात. सन २०१६ मध्ये विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे जवळजवळ संपूर्ण कापूस पीक गुलाबी बोंडआळीमुळे उद्ध्वस्त झाले. साठ लक्ष एकरपेक्षा अधिक क्षेत्रावरील कापसाचे पीक सोडून द्यावे लागले. खाजगी बियाणे कंपन्यांनी पुरविलेल्या खोट्या बियाणांमुळे बोंडअळीचा प्रादुर्भाव होऊन संपूर्ण पीक नुकसानीत निघाले. पर्यायाने शेतकऱ्यांना उभी पिके सोडून द्यावी लागली. नुकसान भरपाईकरिता पंचनाम्यासाठी सरकारी अधिकारी पोहोचेपर्यंत शेतातील पिके उपटून टाकली गेली. त्यामुळे आपोआपच अनेक शेतकरी नुकसान भरपाईविना राहिले किंवा अनेकांना शेतावरील कापूस लागवडीची नोंद दाखविण्यासाठी कृषी अधिकाऱ्यांना लाच देऊ करावी लागली. प्रामुख्याने हे सर्व कापूस उत्पादक लघु व सीमांत जमीनधारक आहेत. पर्यायाने या सर्वांना कोरडवाहू शेतीतून निर्माण होणाऱ्या संकटांचा सामना करावा लागतो (मिश्रा २००६). असे नाही की कापूस या एकमेव पिकामुळे शेतकऱ्यांना ऋणात्मक मिळकतीस तोंड द्यावे लागते. सन २०१७ च्या रब्बी हंगामादरम्यान मराठवाडा व विदर्भात हरभरा, तूर व सोयाबीनचे अधिक उत्पादन झाले. पर्यायाने किमती कोसळल्या. परंतु बाजारपेठ अधिप्राप्ती यंत्रणेचे कोठेही आस्तित्व नव्हते. शेतकऱ्यांनी आंदोलन केल्यानंतर दिरंगाईने जेव्हा हमीभाव अधिप्राप्ती यंत्रणा अवतरली तोपर्यंत बहुतांश उत्पादनाची किमान आधार किमतीपेक्षा कमी किमतीस स्थानिक व्यापाऱ्यांनी खरेदी करून टाकली होती. किमान हमीभाव किमतीपेक्षा १०.०० ते १५.०० टक्के कमी किमतीस विक्री झाली. ज्यांचे पीक विक्रीविना पडून होते त्यांना सरकारी यंत्रणेच्या भ्रष्टाचाराचा सामना करावा लागला. एका अर्थाने हे सत्य आहे की; दारिद्र्यामुळे शेतकरी आत्महत्या करत नाहीत. प्रामुख्याने पीक लागवडीतून अपेक्षित व प्रत्यक्ष मिळकतीत पडणाऱ्या ऋणात्मक तफावतीतून निर्माण होणाऱ्या भ्रमनिरासामुळे तो कर्जबाजारी होऊन आत्महत्येस प्रवृत्त होतो. अशा ऋणात्मक तफावतीची कारणे नैसर्गिक आपत्ती तर आहेतच; परंतु राजकीय, आर्थिक उदासिनता, अधिप्राप्ती यंत्रणेतील भ्रष्टाचार इत्यादी मानवनिर्मित कारणांचाही त्यात समावेश आहे. अशा प्रकारच्या परिस्थितीमुळे शेतकरी आत्महत्या ही एक प्रकारे गुंतागुंतीची व विविधांगी पैलू असलेली समस्या बनली आहे. त्यामुळे या समस्येच्या नेमक्या कारणांची उकल करून त्यावर उपाययोजनेचे काम अत्यंत क्लिष्ट झाल्याचे दिसून येते. यापूर्वी शेतकरी आत्महत्याग्रस्त राज्यातील जवळजवळ किमान पन्नास टक्के शेतकरी कर्जबाजारी असल्याचे निष्कर्ष मिळाले आहेत (सुरी २००६; तळुले २०११). विदर्भातील ९६.७२ टक्के आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे कर्जाचा उत्पादक कारणासाठीच वापर करताना दिसून आली (तळुले २०१३). प्रस्तुत निष्कर्ष 'शेतकरी कर्जावू रकमेचा अनुत्पादक वापर करतात' अशा अनाकलनीय युक्तिवादास निश्चित मूठमाती देतो.


**पृथक्करण आणि विश्लेषण**

गेल्या दोन दशकांच्या कालावधीत ०३.२२ लक्ष भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या कोणत्याही विकास व जीवनमान अधिकाराच्या मापदंडावर पडताळून पाहिल्या तर ही सामान्य घटना मानता येणार नाही. आर्थिक सुधारणोपरांत अनपेक्षित सामाजिक व आर्थिक धोक्याच्या घटकांची ओळख पटविणे याकामी अग्रक्रमाचे आहे. मानवी दृष्टिकोनविरहित विकासाचा


युक्तिवाद आणि मूलभूत जीवनमान अधिकारास नकारात्मक प्रतिसादामुळे देशात कधी नव्हे असे कृषी संकट निर्माण होऊन त्याचा अवपात शेतकरी आत्महत्यांत झाल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे राष्ट्रीय अपराध रेकॉर्ड ब्युरोने सन १९९५ पासून व्यवसाय व लिंगभेदान्वये आत्महत्या नोंदविण्यास सुरुवात केली. नेमक्या याच कारणामुळे तत्पूर्वीच्या घटनांचे अवलोकन झाले नाही व आत्महत्यांच्या प्रश्नांचे गांभीर्य समजू शकेल असा अचूक युक्तिवाद करण्याची समस्या निर्माण झाली. सन १९८० च्या दशकापासून आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र व मध्यप्रदेश इत्यादी राज्ये राष्ट्रीय पातळीवर शेतकरी आत्महत्यांबाबत सर्वात वर असल्याची दिसून येतात. सरासरी एकूण देशपातळीवरील शेतकरी आत्महत्यांपैकी ६३.१३ टक्के आत्महत्या या पाच राज्यांत घडून येतात. याव्यतिरिक्त छत्तीसगड आणि ओरिसा ही दोन राज्येही शेतकरी आत्महत्यांबाबत चिंतेचा विषय बनली आहेत. छत्तीसगड महाराष्ट्राच्या विदर्भ प्रांताला लागून असणारे राज्य आहे.

आत्महत्याग्रस्त राज्यांना सांधणारा समान दुवा म्हणजे या सर्व राज्यांत कृषी गुंतवणुकीत झालेली घट. तसेच ही सर्व राज्ये त्यांच्या विकासात्मक प्रयत्नांच्या भूतकाळासाठी प्रसिद्ध आहेत. कर्नाटकातील कृषी क्षेत्रावरील तरतूद पहिल्या पंचवार्षिक योजनेतील ४८.०० टक्क्यांवरून नवव्या पंचवार्षिक योजनेत (१९९७-२००२) ३१.०० टक्क्यांपर्यंत घटली (देशपांडे, २००२).


**आलेख क्र. १ : भारतातील शेतकरी आत्महत्या १९९५-२०१५***





**आलेख क्र.२ : आत्महत्या भारतातील शेतकरी आत्महत्या व आत्महत्या मृत्यूदराचा वार्षिक कल १९९५-२०१५****



### आलेख क्र. ३: प्रमुख आत्महत्याग्रस्त राज्यांतील शेतकरी आत्महत्या २००१-२०१५#




### आलेख क्र. ४ : प्रमुख आत्महत्याग्रस्त राज्यांतील एकूण शेतकरी आत्महत्यांचे वार्षिक कल २००१-२०१५##




टीपा:

१. ✻= वर्षनिहाय राष्ट्रीय अपराध संकलन ब्युरो (NCRB)

२. ✻✻ = राष्ट्रीय अपराध संकलन ब्युरो वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण

३. # = वर्षनिहाय राष्ट्रीय अपराध संकलन ब्युरो (NCRB)


४. ## = राष्ट्रीय अपराध संकलन ब्युरो वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण

५. AP, KA, MH, KL & MP = आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ व मध्यप्रदेश


**महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या समस्येची मीमांसा:**

महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था म्हणजे विस्तृत दुष्काळग्रस्त क्षेत्रांचे एक विशिष्ट सह आस्तित्व असणारी व्यवस्था मानावी लागेल. राज्यातील एकूण वीस २० जिल्ह्यांतील किमान वीस हजार (२०,०००) गावांना सततचे जलदुर्भिक्ष व दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागतो. यापैकी बहुतांश जिल्हे व गावे विदर्भ व मराठवाड्यात येतात. महाराष्ट्रात किमान पाच वर्षांत किमान एकदा तरी दुष्काळ असतोच. राज्याचा विस्तृत लागवडक्षम कृषी जमीन पट्टा अद्यापही कोरडवाहू आहे. पर्यायाने राज्याची कृषी कास्तकारी दुष्काळग्रस्त असल्याचे दिसून येते. अर्थात राष्ट्रीय सरासरीच्या (३८.०० टक्के) अर्ध्याहूनही कमी असलेल्या सिंचन (१८.०० टक्के) सुविधेकडे वेगळा अंगुलीनिर्देश करण्याची आवश्यकता नाही. पश्चिम महाराष्ट्रातील सिंचित कृषीबरोबर उर्वरित महाराष्ट्राच्या दुष्काळी पट्ट्याला आपले सहआस्तित्व सहन करणे भाग पडते. भूतकाळातही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी सततचा दुष्काळ, अवर्षण व टंचाईग्रस्त परिस्थितीचा सामना केलेला आहे. शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण व दुष्काळी परिस्थितीचा परस्पर व्यस्त संबंध सहज लक्षात येईल अशी विपुल आकडेवारी निदर्शनास येते. अशी परिस्थिती मराठवाडा व पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांत प्रकर्षाने दिसून येते.


**आलेख क्र. ५ : प्रमुख आत्महत्याग्रस्त राज्यांच्या वार्षिक एकूण आत्महत्यांत प्रत्येक राज्याचे स्थान २००१-२०१५***





**आलेख क्र. ६ : प्रमुख आत्महत्याग्रस्त राज्यांतील शेतकरी आत्महत्यांचे वार्षिक कल २००१-२०१५****




### आलेख क्र. ७ : प्रमुख आत्महत्याग्रस्त राज्याचे देशातील शेतकरी आत्महत्याशी प्रमाण २००१-२०१५#




### आलेख क्र. ८ : प्रमुख आत्महत्याग्रस्त राज्यांचे देशातील शेतकरी आत्महत्यांशी राज्यनिहाय प्रमाण २००१-२०१५##




### आलेख क्र. ९ : देशातील एकूण शेतकरी आत्महत्यांत महाराष्ट्राचे स्थान व वार्षिक कल २००१-२०१५***




टीपा:

१. *, **, #, ## & *** = राष्ट्रीय अपराध संकलन ब्युरो वर्षनिहाय आकडेवारीसरून लेखकाचे पृथक्करण

२. AP, KA, MH, KL & MP = आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ व मध्यप्रदेश

बहुदा खोटी बियाणे आणि अपर्याप्त सिंचन सुविधांमुळे बीटी कापसाची पिके वाया जातात. खोट्या बियाणांविषयीची जाणीव तेव्हाच होते जेव्हा पूर्ण पीक वाढते. परंतु उत्पादन मात्र आलेले नसते. तोपर्यंत उत्पादन खर्च मात्र पूर्णपणे करून झालेला असतो. अशा पिकाचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी अथवा अजिबात आलेले नसते. सन १९९० च्या दशकात बीटी कापसाच्या जाती पूर्णपणे बोंडआळीरोधक असतील असे आश्वासित केले गेले. परंतु कालौघात बीटी वाणसुद्धा बोंडअळीला बळी पडतात असे सिद्ध झाले आहे. सन २०१६ मध्ये संपूर्ण विदर्भ व मराठवाड्यात याचा प्रत्यय आला. यामुळेच कास्तकारांची उत्पादन व उत्पन्नाविषयीची अपेक्षा लोप पावते व ते वित्तीय संकटात सापडतात (देशपांडे, २००२). देशाच्या एकूण कापूस लागवडीखालील क्षेत्रापैकी ९०.०० टक्के क्षेत्र महाराष्ट्रात आहे. सन २०१६ मध्ये बनावट बीटी बियाणांची बाजारात विक्री झाली. यामुळे कापूस लागवडदारांनी घेतलेले कापसाचे पीक बोंडअळीला बळी पडले. अशा शेतांवरील कापसाचे जवळजवळ प्रत्येक बोंड या रोगाने नष्ट झाले होते. कापूस लागवडीसाठी अग्रेसर असलेल्या मराठवाड्यातील बीड व जालना आणि पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांत याविषयीच्या सर्वाधिक तक्रारी होत्या. सन २०१६ च्या खरीप मोसमात बाजारातील बीटी बियाणे पुरवठ्यासंबंधी खोटी माहिती पुरविल्याबद्दल राज्य शासनाने महिको कंपनीच्या बारा (१२) वाणांच्या विक्रीवर बंदीही आणली होती. परंतु तोपर्यंत शेतकऱ्यांनी बाजारातून बनावट बीटी बियाणांची खरेदी करून लागवड पूर्ण होऊन पिकांचे नुकसान झाले व आर्थिक तोटाही सहन करावा लागला होता. सीमांत जमिनी लागवडीखाली आणल्यामुळे उत्पादकता कमी होऊन आदान वापर व कास्तकारी कष्टांवर दबाव व मर्यादाही आल्या आहेत (रिकार्डो १८१७). सन २०१६ व २०१७ मध्ये चना, तूर व सोयाबीनचे भरघोस पीक आल्याने बाजार किमती एकदम घसरल्या. परंतु किमान आधार किमतीस खरेदी करणारी अधिप्राप्ती यंत्रणा मात्र वेळेवर आपले आस्तित्व दाखवू शकली नाही. तोपर्यंत बाजारातील बहुतांश माल किमान आधार किमतीपेक्षा १०.०० ते १५.०० टक्के कमी किमतीत व्यापाऱ्यांना विकला गेला. कृषी उत्पन्न बाजार समितीकडे किमान आधार किमतीस खरेदी करण्याची पुरेशी यंत्रणाच नसल्यामुळे कित्येक शेतकऱ्यांना काही दिवस अथवा आठवडाभर तेथेच थांबून विक्रीकरीता वाट पाहावी लागली. विशेषकरून असा अनुभव मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्ह्यात अधिक प्रमाणात आला. अशीच अवस्था मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांत अनुभवास आली. अशा परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना बाजार समितीतील अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारास बळी पडावे लागते. सिंचित क्षेत्रावर बीटी कापसाचे अधिक उत्पादन शक्य आहे. परंतु महाराष्ट्राची सिंचन क्षमता (१८.०० टक्के) देशाच्या एकूण सिंचन क्षमतेच्या (३८.०० टक्के) निम्म्याहूनही कमी आहे. यातील अधिकांश सिंचन पाण्याचा वापर पश्चिम महाराष्ट्रातील स्पर्धाभक्षी ऊस लागवडदार करतात. भौगोलिकदृष्ट्या राज्याचे बहुतांश ऊस लागवड क्षेत्र मराठवाड्यात जाणाऱ्या नद्यांच्या ऊर्ध्व खोऱ्यात येते. राजकीयदृष्ट्या प्रबळ असलेले स्पर्धाभक्षी ऊस लागवडदार मराठवाड्यातील धरणांकरिता पाणी सोडण्यास नेहमीच विरोध करतात. दुष्काळी वर्षात हा संघर्ष अधिक तीव्रतेने समोर येतो. राज्याच्या एकूण सिंचन क्षमतेपैकी ६५.०० टक्के सिंचन क्षमता ऊस लागवडीखालील राज्याच्या ०३.०० टक्के स्थूल पीक क्षेत्राकरिता वापरली जाते. विदर्भाची सिंचन क्षमता प्रचंड असूनही एकूण सिंचन धारण व क्षमता यातील तफावत मोठी असल्याचे स्पष्ट आहे. विदर्भाचा एकूण सिंचन अनुषेश १०.३० लाख हेक्टर एवढा आहे. थोडक्यात काय तर मराठवाडा व विदर्भ या


दोन्ही कापूस उत्पादक प्रदेशांतील कापसाचे उत्पादन नफाक्षम असूच शकत नाही. पर्यायाने कापूस लागवडीचे आगार असलेले पश्चिम विदर्भातील अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वाशिम व वर्धा हे जिल्हे गेल्या वीस (२०) वर्षांत शेतकरी आत्महत्यांची केंद्रे बनली आहेत. मराठवाडा व विदर्भाचा मानव विकास निर्देशांकही राज्यात सर्वात किमान पातळीवर असल्याचे दिसून येते. सन १९८४ च्या वास्तव शोधन समितीने (FFC)(दांडेकर समिती) निर्देशिलेला मराठवाडा व विदर्भ विकास अनुशेष सन २०१३ च्या उच्चस्तरीय समिती (HPC / केळकर समिती २०१३) अहवालातही कायम आहे. विशेष म्हणजे मराठवाडा व विदर्भाच्या आदिवासी जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. यात प्रामुख्याने पूर्व विदर्भ व मराठवाड्यातील वाशिम जिल्ह्याचा समावेश होतो. याचा अर्थ असाच निघतो की व्यापारी पीक लागवडीवरील किमान निर्भरत्व असणाऱ्यांना आत्महत्याजन्य स्थिती निर्माण होत नाही. विदर्भानंतर शेतकरी आत्महत्यांत मराठवाडा व त्यानंतर पश्चिम महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. बीड जिल्ह्याची बहुतांश शेती कोरडवाहू असल्यामुळे मराठवाड्यातील सर्वाधिक आत्महत्या या जिल्ह्यात होताना दिसून येतात. जानेवारी २००१ ते जुलै २०१८ दरम्यानच्या आकडेवारीवर दृष्टिक्षेप टाकला तर हेच दिसून येते. सन २०१४ मध्ये मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्यांच्या संख्येत अचानक वाढ झाली. त्यानंतर या विभागातील सर्व जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्या वाढत गेल्या. सन २०१४ हे दुष्काळी वर्ष होते. तर सन २०१६ व २०१७ मध्ये तूर व सोयाबीनच्या किमती कोसळल्या. त्यामुळे दुष्काळापाठोपाठ आलेल्या किंमत अरिष्टामुळे शेतकऱ्यांना सलग तीन वर्षे संघर्षमय गेली. त्यानंतर आता सन २०१८-१९ हे वर्ष विदर्भ व मराठवाड्याला पुन्हा एकदा दुष्काळामुळे कठीण गेले. विदर्भाचा विचार केला तर सन २०१४ हे वर्ष सर्वाधिक शेतकरी आत्महत्यांचे असले तरीही एकंदरितच सन २००१ ते सन २०१८ दरम्यानचा शेतकरी आत्महत्या दर सातत्य टिकवून असल्याचे निदर्शनास येते.

### मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचा कल प्रांत पार्श्विका


मराठवाडा व विदर्भ एकत्रपणे महाराष्ट्राचा ५२.१३ टक्के (२०.९९ व ३१.५० टक्के) भूभाग व्यापतात तर राज्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ४१.७६ टक्के (१८.७४ व २३.०२ टक्के) एवढी लोकसंख्या या दोन प्रातांची आहे. याव्यतिरिक्त राज्याची २७.८४ टक्के (२.४२ व २५.४२ टक्के) आदिवासी तसेच ३३.८७ टक्के (७.२१ व २६.६६ टक्के) अवर्षणप्रवण लोकसंख्या विदर्भ व मराठवाड्यात वास्तव्य करते. पर्यायाने या दोन्ही प्रांतांचा उर्वरित महाराष्ट्राच्या तुलनेत विकासाचा अनुशेष प्रदीर्घकाळ प्रलंबित असून उपरोल्लेखित सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या या दोन्ही भूभागांकरिता अधिक लक्ष पुरवून क्षेत्र विशिष्ट विकास नियोजन करणे आवश्यक आहे. सर्व क्षेत्रांची एकत्रित विकास तूट लक्षात घेतली तर मराठवाडा व विदर्भाचे प्रमाण अनुक्रमे २०.१६ व ४९.३० टक्के एवढे आहे. राज्याच्या स्थूल उत्पादनात मराठवाडा व विदर्भाचा एकत्रित हिस्सा २६.६० टक्के (अनुक्रमे १०.१० व १६.५० टक्के) असून दोन्ही विभागांचे दरडोई उत्पन्न अनुक्रमे ४०९२४.०० व ५२२८२.०० रुपये इतके आहे. मराठवाडा व विदर्भाचे रोजगार व जीवनमानाकरिता शेतीवरील निर्भरत्व अनुक्रमे ७३.८३ व ७५.५१ टक्के असे अधिक प्रमाणात असल्यामुळे शेती व ग्रामीण विकास हा या प्रांताकरिता कळीचा मुद्दा ठरतो. परंतु या दोन्ही प्रांतांतील सिंचनाचे प्रमाण अनुक्रमे १४.०८ व १२.८२ टक्क्यांवर सीमित झाले आहे. देशाच्या एकूण सिंचन क्षमतेच्या (३८.०० टक्के) अर्ध्याहूनही कमी (१८.०० टक्के) असलेल्या राज्याच्या एकूण सिंचन क्षमतेपेक्षा हे खूपच कमी

आहे. आणि कृषी कास्तकारीच्या दृष्टिने हे चित्र विदारक आहे. उर्वरित महाराष्ट्राशी तुलना केल्यास मराठवाडा व विदर्भाचा विकास तफावत/तूट अनुक्रमे ३७.२७ व ३८.८३ टक्के इतकी आहे. (मिश्रा व श्रॉफ २००७; विजय केळकर २०१३). अशा प्रकारच्या बृहत/समग्र आर्थिक परिस्थितीतील मराठवाडा व विदर्भातील बहुतांश शेतकरी बीटी कापूस, तूर व सोयाबीन यांसारख्या व्यापारी पीक लावडीवर निर्भर आहेत. दोन्ही प्रांतातील व्यापारी पिकाखालील अधिकतम क्षेत्र कोरडवाहू व अवर्षणप्रवण आहे. जर बीटी कापसाची उत्पादकता सिंचन निर्भर असेल तर गुजरातप्रमाणे या शेतकऱ्यांना त्यामुळे प्राप्त होणारे लाभ दुरापास्तच असणार. दोन्ही प्रांतात सार्वजनिक व कृषी विस्तार सेवा व संस्थात्मक जाळे जवळजवळ आस्तित्वात नाही अथवा अयशस्वी झाल्याचे दिसून येते. त्यामुळे बीटी कापसासारख्या तंत्रज्ञान निर्भर व्यापारी पिकांची अशा स्थितीत लागवड करणाऱ्या कास्तकारांना अवर्षणप्रवण कोरडवाहू कृषी संकटांची आगावू जाणीव मिळूच शकत नाही (ए.वैद्यनाथन २००६). अशा प्रकारची कृषी वातावरणीय स्थिती जर बहुविध कारणांना कारक ठरून कृषी संकटांची जन्मदात्री ठरून त्याचे रूपांतर शेतकरी आत्महत्यांत झाले नाही तर आश्चर्यच मानावे लागेल.

**आलेख क्र. १० : मराठवाडा व विदर्भातील विभागनिहाय एकूण शेतकरी आत्महत्यांचा वार्षिक कल २००१-२०१८***





**आलेख क्र.११ : मराठवाडा व विदर्भातील विभागनिहाय शेतकरी आत्महत्यांचे वार्षिक प्रमाण २००१-२०१८****





टीप: १. #& ## = औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्त वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण

## आत्महत्यांचा कल

आलेख क्र. १२ : मराठवाडा व विदर्भातील आत्महत्यांचे विभागनिहाय प्रमाण २००१-२०१८*




आलेख क्र.१३ : महाराष्ट्रातील एकूण शेतकरी आत्महत्यांशी मराठवाडा व विदर्भाचे विभागनिहाय प्रमाण २००१-२०१८**





टीप: १. * & **=औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्त वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण

एकूण अठरा वर्षांच्या काळात मराठवाडा व विदर्भातील एकूण २३७०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपले जीवन संपविले. हा कालखंड जानेवारी २००१ ते जुलै २०१८ दरम्यानचा आहे. कृषी प्रौद्योगिकीदृष्ट्या या दोन्ही प्रांतात पाण्याचे दुर्भिक्ष आहे. भौगोलिकदृष्ट्या मराठवाडा नदीप्रवाहाच्या निम्न खोऱ्यात येत असल्यामुळे मराठवाड्यातील धरणांत पाणी सोडण्यासाठी या प्रांतास ऊर्ध्व नदी खोऱ्यातील स्पर्धाभक्षी पश्चिम महाराष्ट्रावर अवलंबून राहावे लागते. तर विदर्भाची प्रचंड सिंचन क्षमता अद्याप उपयोगात आणणे बाकी आहे. विदर्भाची सिंचन क्षमता व सिंचन प्राप्तीतील अंतर महाराष्ट्रातील इतर कोणत्याही प्रांतापेक्षा जास्त आहे. त्यामुळे जेव्हा निम्न पर्जन्यमानामुळे दुष्काळ पडतो तेव्हा आत्महत्या मृत्यूदरात वृद्धी होते.सन २०१४ हे महाराष्ट्रातील दुष्काळी वर्ष होते. आणि त्या वर्षी महाराष्ट्राच्या या दोन्ही प्रांतातील शेतकरी आत्महत्यांची संख्याही वाढली होती. या काळात पाणी आणि रोजगारासाठी


मराठवाडा व विदर्भातील अनेक ग्रामीण कुटुंबे शहरी भागात स्थलांतरित झाली होती. पुणे आणि मुंबईच्या पादचारी मार्गांवर तात्पुरता निवासी आश्रय घेऊन हे लोक पाण्यासाठी सार्वजनिक नळ अथवा हातपंपाचा वापर करताना दिसून आले. चारा व पाणी नसल्यामुळे गावाकडील जवळजवळ सर्व जनावरे विकली गेली होती. सन २००८ च्या कर्जमाफीनंतर कमी झालेल्या शेतकरी आत्महत्यांत वृद्धी होऊन नंतर त्या सतत वाढत गेल्याचे निदर्शनास येते.

कारण सन २०१४ च्या दुष्काळानंतर सन २०१६ व २०१७ मध्ये तूर, सोयाबीन व हरभरा पिकांचे विक्रमी उत्पादन झाल्याने किमती घसरल्या. शेतकऱ्यांचे पुन्हा एकदा प्रचंड नुकसान झाले. अशाप्रकारे राज्याच्या कृषी क्षेत्रावरील हा संकटकाळ मानावा लागेल. सन २०१८ मध्येही अशीच परिस्थिती निर्माण झाली. राज्याच्या जवळजवळ १८० तालुक्यांत खरीप व रब्बीची पिके वाया गेली. या संकटाबरोबरच सन २०१५-१६ मध्ये गुलाबी बोंडअळीच्या प्रादुर्भावाने विदर्भ व मराठवाड्यातील कापसाचे जवळजवळ संपूर्ण पीक नष्ट केले होतेच. तसेच सन २०१६ च्या खरीप मोसमात अनेक शेतकरी बीटीच्या खोट्या बियाणांमुळेही फसले. अशी स्थिती निर्माण झाली होती की बोंडअळीमुळे कापसाचे प्रत्येक बोंड सडले होते. विदर्भ व मराठवाड्याच्या कृषी क्षेत्रावर त्रिवर्षीय संकटाचा सामना करण्याची वेळ आली होती.

**आलेख क्र.१४ : मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे विभागनिहाय प्रमाण २००१-२०१८***





**आलेख क्र. १५: मराठवाडा व विदर्भातील एकूण शेतकरी आत्महत्यांचे विभागनिहाय आत्महत्या मृत्यूदर २००१-२०१८****





**टीप:** १. * & ** = औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्त वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण


आलेख क्र. १६ : मराठवाडा व विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे विभागनिहाय वार्षिक कल २००१-२०१८*





आलेख क्र. १७ : मराठवाडा व विदर्भातील पाक्ष व अपाक्ष शेतकरी आत्महत्या २००१-२०१८**





आलेख क्र. १८ : मराठवाडा व विदर्भातील पात्र शेतकरी आत्महत्यांचे विभागनिहाय प्रमाण २००१-२०१८#



**आलेख क्र. १९: मराठवाडा व विदर्भातील अपात्र शेतकरी आत्महत्यांचे विभागनिहाय आत्महत्या मृत्यूदर २००१-२०१८##**




**आलेख क्र. २० : मराठवाडा व विदर्भातील अपात्र आत्महत्यांच्या आत्महत्या वार्षिक कल २००१-२०१८*****




**टीपा:**

१. *, **, #, ## & *** = औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्त वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण

२. Au-Eli = औरंगाबाद विभाग पात्र शेतकरी आत्महत्या

३. Am-Eli = अमरावती विभाग पात्र शेतकरी आत्महत्या

४. Ng-Eli = नागपूर विभाग पात्र शेतकरी आत्महत्या

५. Au-Ineli= औरंगाबाद विभाग अपात्र शेतकरी आत्महत्या

६. Am-Ineli=अमरावती विभाग अपात्र शेतकरी आत्महत्या

७. Ng-Ineli =नागपूर विभाग अपात्र शेतकरी आत्महत्या


मराठवाडा आणि विदर्भातील कृषी क्षेत्रात शक्यतो कोणत्याही पीक उत्पादनक्षमतेने राष्ट्रीय पातळी पार केलेली नसल्यामुळे जमीन उत्पादकता स्थिरता अथवा घटीची चर्चा निष्फळ ठरते. या दोन्हीही प्रांताकरिता बिगर कृषी रोजगार संधी म्हणजे एक स्वप्नच आहे. दोन्ही प्रांताच्या कृषी परिस्थितीची तुलनाच करावयाची असेल तर ती मध्य भारतातील बुंदेलखंडाशी करावी लागेल. जेथे पाण्याचा प्रत्येक थेंब दिवास्वप्न मानावे लागेल. सन २०१४ ते २०१७ दरम्यानच्या कृषी संकटाच्या दोन बाजू होत्या. एक; दुष्काळ आणि दोन; जेव्हा बाजारपेठेत शेतमालाच्या किमती कोसळल्या तेव्हा किमान आधार किंमत अधिप्राप्ती यंत्रणा वास्तवात आस्तित्वात नसणे. याचा परिणाम असा झाला की, शेतकऱ्यांना किमान आधार किमतीच्या दहा ते पंधरा टक्के कमी किमतीस शेतमाल विकणे भाग पडले. कृषी विकास व जीवनमानाची चिंता या ग्रामीण जीवनाच्या परस्परावलंबी व एकमेकांवर परिणामकारक असणाऱ्या बाबी आहेत. जेव्हा पहिल्या बाबीकडे दुर्लक्ष होते तेव्हा दुसरी बाब आपोआपच ऋणात्म परिणामकारी ठरते. मराठवाडा व विदर्भात या सर्व घटकांचे सहआस्तित्व जाणवले. नव्हे तसे ते सतत जाणवते. त्यामुळे जोपर्यंत या समस्यांवर उपाय अवलंबिले जात

नाहीत तोपर्यंत 'बोगद्याच्या शेवटी प्रकाश नाही' अशाच काहीशा स्थितीला सामोरे जाणे भाग आहे.


**मराठवाडा व विदर्भातील आत्महत्यांची जिल्हानिहाय स्थिती**

काही अपवाद वगळता मराठवाडा व विदर्भातील शक्यतो सर्वच जिल्ह्यांत पाण्याचे प्रचंड दुर्भिक्ष असल्याचे जाणवते. यात मराठवाड्यातील बीड, नांदेड व उस्मानाबाद तर पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम व वर्धा जिल्ह्यांचा समावेश होतो. या जिल्ह्यांतील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही अधिक असल्याचे सिद्ध झाले आहे. मराठवाड्याच्या बीड व नांदेड जिल्ह्याची बहुतांश शेती कोरडवाहू आहे. उर्वरित महाराष्ट्र व कर्नाटकात हंगामी ऊस तोडणीसाठी स्थलांतर करणारे तांडे प्रामुख्याने या दोन जिल्ह्यांतून असतात. बीड जिल्ह्याची जमीन, सिंचन व हवामानविषयक स्थिती मध्य भारतातील बुंदेलखंडसदृश्य आहे. ग्रामीण दळणवळण सुविधा अत्यल्प आहेत. परंतु जिल्ह्याच्या पीक पद्धतीत कापसाचे स्थान अव्वल आहे. ज्यासाठी शाश्वत सिंचन सुविधा आवश्यक असते. परंतु ते मात्र एक स्वप्नच ठरते. नांदेड जिल्ह्यातून वेगळा केलेल्या मराठवाड्याच्या वाशिम या आदिवासी जिल्ह्यात किमान शेतकरी आत्महत्या झाल्याचे दिसून येते. काहीसा असाच कल गडचिरोली, गोंदिया व भंडारा या पूर्व विदर्भातील आदिवासी जिल्ह्यांत अनुभवास येतो. या सर्व जिल्ह्यांत व्यापारी पीक लागवडीवरील निर्भरत्व किमान आहे हे विशेष. पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम व वर्धा जिल्ह्यांत याच्या अगदी विरुद्ध स्थिती असल्याचे निदर्शनास येते. सन १९९० च्या दशकात बीटी कापसाची सुरुवात झाल्यापासून व त्यापूर्वीही हे जिल्हे कापूस पिकाचे आगार म्हणून ओळखले गेले.

**आलेख क्र. २१ : मराठवाड्यातील जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्या २००१-२०१८***




**आलेख क्र.२२ : विदर्भातील जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्या २००१-२०१८****



**टीपा:**

१. * & **=औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्त वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण.


२. AU, JL, PR, HN, ND, BD, LT & UB =औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद.

३. Am, Ak, Ya, Bu, Wa, Na, Wd, Bh, Go, Ch & Gd = अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.


सन २००८ च्या कर्जमाफीनंतर शेतकरी आत्महत्यांच्या प्रमाणात घट झाली होती. परंतु त्यानंतर चार वर्षांत म्हणजे सन २०१२ मध्ये पुन्हा शेतकरी आत्महत्या वाढल्या. सन २०१२ मध्ये महाराष्ट्राच्या पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या नोंदल्या गेल्या.

सन २०१४ हे दुष्काळी वर्ष असल्याने विदर्भ व मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांत शेतकरी आत्महत्या वाढल्या. यानंतरचे सन २०१५ चे बीटी बियाणे संकट, बोंडअळी व सन २०१६ व २०१७ मधील किंमत घसरणीमुळे कृषी संकटाने अधिक कोंडी झाली. मराठवाडा व पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्यांच्या संख्येत सतत वाढ होत गेली. या काळात राज्यांतील शेतकऱ्यांनी सरकारी अधिप्राप्ती व किमान हमीभाव यंत्रणेची अपूर्वोदाहरणीय अनुपस्थिती अनुभवली. प्राप्त विकलांग सिंचन सुविधा व पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या मराठवाड्यातील बीड, नांदेड व उस्मानाबाद आणि पश्चिम विदर्भातील जिल्ह्यांच्या कृषी पीकरचनेत कापसाचे आधिपत्य हा एक विरोधाभास मानावा लागेल. तसेच या जिल्ह्यांच्या कापूस लागवडीत बीटी वाणांचा प्रबळ प्रदर्शन परिणाम जाणवतो. गुजरातसारख्या राज्यात बीटीची एतद्देशीय बियाणे मराठवाडा व विदर्भापेक्षा कमी किमतीला उपलब्ध आहेत. तर कापसाची लागवड सिंचित क्षेत्रावर केली जाते. कापूस कास्तकारीची गुजरातची अशी दुहेरी हित परिस्थिती विदर्भ व मराठवाड्याचा दुहेरी शाप व शेतकरी आत्महत्यांचा फास बनली आहे. मराठवाडा व विदर्भातील कापूस शेती व पर्यायाने शेतकऱ्यांचे नुकसान होण्यास खोटी बीटी बियाणे, बोंडअळी, सिंचन दुर्भिक्ष इत्यादी घटक कारणीभूत आहेत. यामुळे कापूस शेतीचे संकट अधिक तीव्र होऊन निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीमधून कापूस लागवड आर्थिकदृष्ट्या अकिफायतशीर बनली आहे.

**आलेख क्र. २३ : मराठवाड्यातील जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्या मृत्यूदर २००१-२०१८***



**आलेख क्र. २४ : विदर्भातील शेतकरी आत्महत्यांचे जिल्हानिहाय आत्महत्या मृत्यूदर २००१-२०१८****




**टीपा:**

१. * & **=औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्त वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण.

२. AU, JL, PR, HN, ND, BD, LT & UB =औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद.

३. Am, Ak, Ya, Bu, Wa, Na, Wd, Bh, Go, Ch & Gd = अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.

## किटकनाशके व शेतकरी आत्महत्या


पोलीस चौकशी कागदपत्रे व शवविच्छेदन अहवालातील नोंदी तपासता बहुतांश शेतकरी आत्महत्या किटकनाशकांचे सेवन करून केल्याचे निष्पन्न होते. महाराष्ट्रात किमान तीन चतुर्थांश (७४.५० टक्के) शेतकरी आत्महत्या किटकनाशकांचे सेवन करून केल्या जातात (तळुले २०१३). याचे मुख्य कारण म्हणजे कापूस लागवड करणाऱ्या शक्यतो प्रत्येक घरात किटकनाशकांची सहज उपलब्धता असते. कारण कापूस पिकाचे एकात्मिक रोग व्यवस्थापन उत्पादितांचे वापर प्रमाण इतर सर्व पिकांपेक्षा अधिक आहे. भारतात साधारणपणे ६४.०० टक्के किटकनाशकांचा वापर फक्त कापूस पिकाकरिता केला जातो. किटकनाशकांचे सेवन केले की मृत्यू शक्यतो अटळ असतो. कारण गावपातळीवर औषधोपचारांची सुविधा अभावानेच उपलब्ध असते. सन २०१२ मध्ये यवतमाळ जिल्ह्यातील ८८.८८ टक्के आत्महत्याग्रस्त कुटुंबांना स्थानिक पातळीवर औषधोपचार सुविधा उपलब्ध नव्हती. तर ३३.८३ टक्के आत्महत्याग्रस्त कुटुंबांना आठवड्यातून एक किंवा दोनदा गावभेट देऊ शकणारा वैद्य उपलब्ध होता. परंतु असे वैद्यही सामान्य रोगांवर उपचार करणारे असल्यामुळे त्यांच्याकडे विषबाधा झालेल्या इसमावर उपचार करण्याची सुविधा व औषधे उपलब्ध असण्याची अपेक्षा करणे योग्य नाही (तळुले २०१३). जवळच्या आरोग्य केंद्रावर पोहोचण्यासाठीच्या वाहतूक व्यवस्थेचा विचार केला तर विदर्भ व मराठवाड्यात काहीशी अशीच स्थिती असल्याचे अनुभवास येते. वाहतूक व्यवस्थेच्या अनुपलब्धतेमुळे विषबाधेनंतर आरोग्य केंद्रापर्यंत पोहोचण्यास लागणारा विलंब जीवघेणा ठरतो. किंबहुना सार्वजनिक आरोग्य केंद्रावर पोहोचल्यानंतर तेथे वैद्य मिळेलच असे नाही. कारण मराठवाडा व विदर्भातील सार्वजनिक आरोग्य केंद्र अधिकाऱ्यांच्या अनेक जागा शक्यतो रिक्त असतात. आणि समजा वैद्य मिळालाच तर सरकारी दवाखान्यात औषधे उपलब्ध असतीलच याची शाश्वती नाही. पर्यायाने विषबाधा झालेल्या व्यक्तीला येनकेन प्रकारे दवाखान्यापर्यंत पोहोचवला तरी प्राण वाचण्याची शाश्वती देता येत नाही.

**पात्र बनाम अपात्र आत्महत्या**


भारतातील जमीन मालकीचे शीर्षक निर्णायक नसून धारणासदृश्य स्वरूपाचे आहे. (वधवा १९८९). जमिनीचा ७/१२ (व ८-अ) चा उतारा हा महसूल विभागाचे जमीन मालकी शीर्षक निश्चित करणारा एकमेव महत्त्वाचा दस्तऐवज मानला जातो. ग्रामपातळीवर तलाठी (पटवारी) म्हणून संबोधला जाणारा महसूली अधिकारी अशा दस्तऐवजांची व्यवस्था पाहत असतो. ७/१२ च्या उताऱ्यावर जमीन मालकाचे अथवा इतर हक्कात कुळाचे नाव नोंदविलेले असते. त्यामुळे फक्त ज्या व्यक्तीच्या नावावर जमिनीचा ७/१२ उतारा आहे अशीच व्यक्ती संबंधित जमिनीची मालक आहे अशी धारणा नव्हे तर कायद्यानेही मानले जाते. परिणामे अशाच व्यक्तीला शेतकरी म्हणून गणले जाते. किंवा फक्त ७/१२ उतारा धारकालाच शेतकरी असण्याचा अधिकार आहे असे अनुमान यावरून निघते. त्यामुळे पोलीस अथवा महसुली प्रशासन किंवा न्यायव्यवस्थेकरिता ज्यांच्या नावे ७/१२ चा उतारा नाही अशी व्यक्ती शेतकरी असूच शकत नाही. आणि विशेष म्हणजे जेव्हा एखादी व्यक्ती आत्महत्या करते व संबंधित व्यक्तीच्या नावे ७/१२ चा जमीन उतारा असत नाही त्यावेळी अशा आत्महत्याग्रस्ताची नोंद शेतकरी म्हणून सरकार दप्तरी होत नाही. परिणामे अशी आत्महत्या शेतकरी आत्महत्या म्हणून पोलीस व महसूल कागदपत्रावर येत नाही. परंतु प्रत्यक्षात असे अनेक कास्तकार असतात की जे भाडेपट्ट्याच्या जमिनीवर कास्तकारी करतात. तथापि, अशा भाडेपट्ट्याची कागदोपत्री नोंद मात्र असत नाही. तसेच एकत्र कुटुंब पद्धतीत जमीन शक्यतो कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीच्याच नावे असते. विशेष म्हणजे पुरुषप्रधान ग्रामीण समाजव्यवस्थेत स्त्रियांच्या नावे जमिनी असणे हा एक अपवादच मानावा लागेल. किंवा ते अशक्यही आहे. परंतु जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्यांच्या याद्या तपासल्या तर त्यात स्त्रियांनी आत्महत्या केल्याचे अनेक गावांत निष्पन्न होते. तसेच या स्त्रिया शेतकाम करत होत्या; अशीही प्राथमिक माहिती मिळते. पर्यायाने जो कास्तकारी करतो तो शेतकरी असेलच असे नाही. कारण जमीन मालकी ७/१२ उताऱ्यानुसार निश्चित होत असल्याने व ती निर्णायक स्वरूपाची नसून धारणासदृश्य असल्याने असा गुंता निर्माण होतो. त्यामुळे पर्यायाने शेतकरी आत्महत्यांची पात्र व अपात्र आत्महत्या अशी गुंतागुंत निर्माण होते. परंतु हा फक्त प्रशासकीय घोळ मानावा लागेल. संबंधित आत्महत्याग्रस्त कास्तकार शेतकरी होता किंवा नाही याचे कायदेशीर शीर्षक सिद्ध करणे प्रशासकीय बंधन मानले जाते. याकरिता ७/१२ चा उतारा हाच एकमेव महसुली दस्तऐवज महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे अशाच आत्महत्याग्रस्त कास्तकाराचे कुटुंबीय राज्य सरकारच्या एक लाख रुपये सानुग्रह अनुदानास पात्र असतात की ज्या आत्महत्याग्रस्त कास्तकाराच्या नावे ७/१२ चा जमीन उतारा मिळतो. महाराष्ट्रातील हीच प्रशासकीय गुंतागुंत शेतकरी आत्महत्यांचे पात्र व अपात्र आत्महत्या असे वर्गीकरण करण्यास कारणीभूत ठरली आहे. आत्महत्याग्रस्ताच्या नावे ७/१२ उतारा असण्याच्या अटीमुळे महाराष्ट्रातील एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी अपात्र आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनकरित्या जास्त असल्याचे निदर्शनास येते. इतर राज्यांत शेतकरी आत्महत्येचे सानुग्रह अनुदानही महाराष्ट्रापेक्षा अधिक आहे. पंजाबमध्येही ही रक्कम दोन लाख रुपये इतकी आहे. जानेवारी २००१ ते जुलै २०१८ दरम्यानची औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागाची अपात्र शेतकरी आत्महत्यांची सरासरी अनुक्रमे ३२.७६, ५४.७७ आणि ४७.९९

टक्के इतकी असल्याचे दिसून येते. पर्यायाने अशा सर्व आत्महत्याग्रस्त कास्तकारांची कुटुंबे राज्य शासनाच्या एक लाख रुपये सानुग्रह अनुदानाकरिताही अपात्र ठरली. प्रस्तुत चिंतनाच्या प्रारंभी उल्लेख केल्याप्रमाणे भारतात बहुविध कारणांमुळे अनेक आत्महत्या कागदोपत्री येतच नाहीत. यास शेतकरी आत्महत्याही अपवाद नाहीत.

**आलेख क्र.२५ : मराठवाड्यातील जिल्हानिहाय शेतकरी आत्महत्यांत अपात्र शेतकरी आत्महत्या २००१-२०१८***




**आलेख क्र. २६ : विदर्भातील शेतकरी आत्महत्यांत अपात्र शेतकरी आत्महत्या मृत्यूदर ****




**टीपा:**

१. *&**=औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागीय आयुक्त वर्षनिहाय आकडेवारीवरून लेखकाचे पृथक्करण.

२. AU, JL, PR, HN, ND, BD, LT & UB =औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद.

३. Am, Ak, Ya, Bu, Wa, Na, Wd, Bh, Go, Ch & Gd = अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली.

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांविषयीचे पात्र व अपात्रतेचे प्रशासकीय तर्क यात आणखी भर घालते. पर्यायाने शेतकरी आत्महत्यांचा आकडा जाणिवपूर्वक घटविण्यात त्याचे रूपांतर होते. किंबहुना अशा प्रशासकीय तर्कामुळे कास्तकार व बिगर कास्तकार अशी एकाच कुटुंबातील शेती कसणाऱ्या दोन व्यक्तींची भिन्न वर्गवारी केली जाते. याचे मुख्य कारण म्हणजे सानुग्रह अनुदानाची एक लाख रुपये ही रक्कम

व दोन; राज्यातील शेतकरी आत्महत्या कमी भासाव्यात यासाठीचा प्रयत्न. कारण अपात्र आत्महत्यांची गणना वेगळी होत असल्याने त्यास शेतकरी आत्महत्या असे संबोधन प्राप्त होत नाही. जानेवारी २००१ ते जुलै २०१८ दरम्यान अमरावती, नागपूर व औरंगाबाद विभागातील जिल्ह्यांकरिता अपात्र शेतकरी आत्महत्यांचा मृत्यूदर अनुक्रमे (SMR) ६८७.५३, २०३.२८ व ७४.८४ इतका मिळतो.

**निष्कर्ष व अनुमान**

गेल्या दोन दशकाहून अधिक काळ महाराष्ट्राच्या विशिष्ट भागांत शेतकरी आत्महत्यांचे दुर्दैव केंद्रित होताना जाणवते. ही एक गुंतागुंतीची समस्या आहे. शेतकरीच नाहीत परंतु आता तर राज्यातील वैफल्यग्रस्त तरुण पिढी स्वत:च्या प्रलंबित मागण्या सरकारकडून मान्य करून घेण्याकरीता आंदोलनादरम्यान आत्महत्यांकडे वळल्याचे भयावह चित्र समोर आले आहे. अशा आंदोलनादरम्यान सन २०१८ मध्ये मराठवाड्यात अनेक तरुणांनी आत्महत्या केल्या (४२ आत्महत्या). अशा घटनांचे विश्लेषण एमिली डर्खीमच्या विश्लेषणात सापडते. देशातील इतर आत्महत्याग्रस्त राज्यांच्या आकडेवारीचा विचार केला तर महाराष्ट्रातील आत्महत्यांचा दर नेहमीच अधिक राहिल्याचे निष्पन्न होते. सन २००८ च्या कर्जमाफीनंतर शेतकरी आत्महत्या कमी झाल्या होत्या. परंतु लगेचच सन २०१० मध्ये त्यात वाढ होऊन सन २०१२ पर्यंत शेतकरी आत्महत्या शिगेला पोहोचल्या. सन २०१२ मध्ये पश्चिम विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यात सर्वाधिक शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली. त्यानंतरचा सन २०१३ चा दुष्काळ आणि २०१५ व २०१६ मधील खोटी बीटी बियाणे व तूर, सोयाबीन आणि चना - हरभऱ्याच्या जास्त उत्पादनामुळे किमती कोसळून सन २०१६ व २०१७ मध्ये विदर्भ व मराठवाड्यातील शेतकरी कृषी अरिष्टात सापडले. सन २००१ ते २०१५ दरम्यान एकूण पाच आत्महत्याग्रस्त राज्यांत महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण ५७.०० ते ७३.०० टक्क्यांचे दरम्यान राहिले. (किमान ५६.७७ व कमाल ७३.३४ टक्के). देशपातळीवरील शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्राचे हेच प्रमाण किमान १६.५४ व कमाल २७.५३ टक्के इतके होते. अशाप्रकारे सन २००१ ते २०१५ दरम्यान देशात एकूण ०२.३५ लक्ष शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवनमान संपविले (NCRB). आत्महत्यांच्या आकडेवारीतील वार्षिक बदलाचा कल आत्महत्या व दुष्काळ,अवर्षण आणि पर्जन्य तुटीतील परस्पर विरूद्ध संबंध अधोरेखित करतो. अशाच प्रकारचे सहसंबंध शेतकरी आत्महत्या व भरघोस उत्पादनामुळे झालेल्या किंमत घसरणीत दिसून येतात. पश्चिम विदर्भाच्या अमरावती विभागात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या दिसून येतात. यानंतर मराठवाड्यातील बीड, नांदेड व उस्मानाबाद जिल्ह्यांचा क्रमांक येतो. जानेवारी २००१ ते जुलै २०१८ दरम्यान मराठवाडा व विदर्भातील अठरा जिल्ह्यांत एकूण २३७०१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. महाराष्ट्रातील एकूण शेतकरी आत्महत्यांपैकी ८३.७४ टक्के आत्महत्या मराठवाडा व विदर्भात झाल्याची आकडेवारी मिळते. जानेवारी २००१ ते जुलै २०१८ दरम्यानच्या काळात औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागातील शेतकरी आत्महत्या मृत्यूदर अनुक्रमे ००.३८ - ३७.४३, ४.७० - १२४.२४ व ००.३२ - ४१.८५ च्या कक्षेत असल्याचे निष्पन्न होते.

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याविषयकची महत्त्वाची गुंतागुंत म्हणजे पात्र व अपात्र आत्महत्या अशी प्रशासकीय वर्गवारी होय. पर्यायाने अपात्र शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबास सरकारच्या एक लक्ष रुपये सानुग्रह अनुदानास मुकावे लागते. आत्महत्या

केलेली व्यक्ती व्यवसायाने कास्तकार असून व स्वत:च्या कुटुंबाची शेतजमीनही असते. परंतु अनेक घटनांच्या बाबतीत आत्महत्याग्रस्त व्यक्तीच्या नावे जमिन मालकी दर्शविणारा ७/१२ उतारा नसल्यामुळे संबंधित व्यक्तीस बिगर शेतकरी म्हणून संबोधले जाते. पर्यायाने अशी आत्महत्या अपात्र घोषित होते. महाराष्ट्रातील आत्महत्या प्रभावित विभाग प्रामुख्याने अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. तसेच या विभागांत सिंचन सुविधांचे दुर्भिक्ष जाणवते. पर्यायाने गुजरातप्रमाणे या विभागांतील कापसाच्या लागवडीकरिता पाणीपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत. तसेच गुजरातपेक्षा मराठवाडा व विदर्भात बीटी बियाणांच्या किमतीही अधिक आहेत. कारण गुजरातमधील बियाणांचा पुरवठा एतद्देशीय कंपन्या व महाराष्ट्रात मात्र बहुराष्ट्रीय कंपन्यांकरवी होत असतो. राज्याची ३३.८७ टक्के अवर्षणप्रवण लोकसंख्या मराठवाडा व विदर्भात वास्तव्य करत असल्यामुळे या विभागांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक होते. तसे मात्र झाले नाही. राज्याच्या वीस (२०) जिल्ह्यातील साधारणपणे वीस हजार (२०,०००) गावांना सतत पाण्याचे दुर्भिक्ष असते. यातील जास्तीत जास्त गावे मराठवाडा व विदर्भात येतात.

अमेरिकन कृषी अनुदानामुळे गेल्या वीस वर्षांतील जागतिक कृषी उत्पादन किमतीत निर्माण झालेली विकृती, भारताचे किमान आयात शुल्क धोरण व महाराष्ट्रातील अधिप्राप्ती यंत्रणेचे अपयश इत्यादी बाबींमुळे राज्यातील व प्रामुख्याने कापूस कास्तकारी करणाऱ्या मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांची स्थिती दयनीय बनली. अकार्यक्षम कृषी विस्तार सेवा व ग्रामीण वित्तीय बाजारातील असंस्थात्मक ऋण यंत्रणांचा प्रभाव हे दोन घटक ग्रामीण व कृषी व्यवस्थेतून सार्वजनिक क्षेत्राची माघार अधोरेखित करतात. सन २००४, २०१०, २०१३ आणि सन २०१८ ची पर्जन्य तूट व दुष्काळाने यात अधिक भर घातली. सन २०१५ ची खोटी बीटी बियाणे, बोंडअळीचा प्रादुर्भाव आणि सन २०१६ व २०१७ मधील तूर, सोयबीन व हरभरा उत्पादनाच्या घसरलेल्या किमतीनी कृषी संकट अधिक गहिरे केले. याव्यतिरिक्त अनिवार्य सामाजिक व कौटुंबिक खर्च टळू शकत नाहीत ते वेगळे. अशा कृषी संकटातून मार्ग काढण्याकामी बहुपयोगी व्यूहरचनेची आवश्यकता आहे. एकतर सरकार ग्रामीण व कृषी व्यवस्थेतून माघार घेऊ शकत नाही. जगभर औद्योगिक कर्जाच्या पुनर्गठनाची अनेक उदाहरणे आहेत. भारतही त्यास अपवाद नाही. कधी नव्हे ते तब्बल अकरा लक्ष (११ लक्ष) कोटी रुपयांची औद्योगिक कर्जे थकली आहेत. त्याबाबतही कायदेशीर कारवाईऐवजी बँकांना थकीत कर्जातून सावरण्याचेच धोरण सध्या अवलंबले जात आहे. निश्चितच याकामीही कररचनेतून निर्माण होणारी रक्कम वापरली जाणार. सिंचन सुविधा व ग्रामीण विद्युतीकरणाव्यतिरिक्त उत्पादनक्षमता, किंमत यंत्रणा, अधिप्राप्ती व्यवस्था, संस्थात्मक ऋण आणि वातावरणावर आधारित कृषी व पीक तसेच आरोग्य, जीवन आणि जनावरांचा विमा इत्यादी घटकांबाबत पर्याप्त सावधगिरी बाळगली तर कृषी क्षेत्राचे विशाखन सुकर होऊ शकते. किमान आधार किमतीपेक्षा कमी दराने कृषी उत्पादन विक्री ही नवीन बाब नाही. म्हणून अतिरिक्त उत्पादनकाळात किंमत घटीचा सामना करण्यासाठी अधिप्राप्ती यंत्रणेचा वेळेत हस्तक्षेप सरकार व शेतकरी या दोहोंसाठी आवश्यक ठरेल. आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या विषबाधित व्यक्तीवर उपचार करण्याकरिता वैद्यकीय अधिकाऱ्यांसहीत सुसज्ज सार्वजनिक आरोग्य केंद्रे व उपचारांची सुविधा सज्ज करणे याबाबत तात्काळ सावधानता बाळगणे

आवश्यक आहे. अलीकडच्या काळात ग्रामीण भागातही विभक्त कुटुंबपद्धतीच्या प्राबल्यामुळे कुटुंब व्यवस्थेचे विकेंद्रीकरण बळावताना दिसून येते आहे. परिणामे सामाजिक पाठिंबा नाहीसा होताना जाणवतोय. अशा परिस्थितीत सामाजिक व मानसशास्त्रीय समुपदेशनात स्वयंसेवी संस्थांच्या भूमिकेमुळे आत्महत्यांचा दर घटविण्यात यश येऊ शकते. मराठवाडा व विदर्भातील कृषी संकटाने अद्यापपावेतो हजारो शेतकऱ्यांचे जीव घेतले आहेत. अशा परिस्थितीचे आत्महत्यांच्या संकटात रूपांतर होणे आद्यक्रमाने थांबविणे आवश्यक आहे. त्यामुळे उत्पादन व विपणन व्यवस्था भक्कम करून आत्महत्याग्रस्त विभागातील कृषी व्यवस्थेला उभारी देण्याचे नियोजन म्हणजे समस्या सोडविण्याचे नियोजन असेल यात शंका नसावी. अंतिम उपभोगत्याने कृषी उत्पादनासाठी आदा केलेल्या प्रत्येक रुपयात उत्पादकाचा हिस्सा वाढविण्याचे विपणन नियोजन केले तर यामुळे शेतकऱ्यांच्या फक्त वर्तमान समस्या सुटण्यास मदत होणार नाही तर बहुचर्चित कृषी उत्पन्न दुपटीचे उद्दिष्ट साध्य करण्यासही मदत होऊ शकते.

**संदर्भसूची**


1. A Narayanamoorthy (2018), Post Harvesting Requirements for Reducing the Gap Between What Consumers Pay and Farmers Receive, Indian Journal of Agricultural Economics, Vol. 73, No. 03, July-Sep. 2018 (Conference Number) PP. 421-430.
2. A Vaidyanathan (2006), Farmers' Suicides and the Agrarian Crisis, Economic and Political Weekly, Sep. 2006, PP. 4009-4016.
3. Assadi Muzaffar (1998), Farmers' Suicides: Signs of Distress in Rural Economy, Economic and Political Weekly, April 4, 1998.
4. David Ricordo (Originally Published in 1817), On the Principles of Political Economy and Taxation
5. Deepankar Basu, Debarshi Das, Kartik Mishra (2016), Farmers' Suicides in India: Trends across Major States, 1995-2011, Economic and Political Weekly, May 21, 2016, PP. 61-65.
6. Deshpande R S (2002), Suicide by Farmers in Karnataka: Agrarian Distress and Possible Alleviatory Steps, Economic and Political Weekly, June 2002, PP. 2601-2610.
7. Dnyandev C Talule (2018), Farmers Suicides in Maharashtra, 2001-2018: Measurement and Interpretation across Districts of Marathwada and Vidarbha Region of the State, Journal of Shivaji University (Humanities and Social Sciences), Vol. XXXXX, No. II, ISSN: 0368-4199, October 2018.
8. Dnyandev C Talule C (2013), Political Economy of Agricultural Distress and Farmers' Suicides in Maharashtra, International Journal of Social Science and Interdisciplinary Research, Vol. II (2), Feb. 2013, PP. 95-123.
9. Emile Durkheim (2013/Originally Published in 1897), Suicide: A Study in Sociology.
10. GoI (National Crime Records Bureau), For Years.
11. GoM (1984), V M Dandekar (Chairman), Fact Finding Committee, GoM, Planning Department, Mumbai.
12. GoM (2013), Vijay Kelkar (Chairman), High Powered Committee on Balanced Regional Development Issues in Maharashtra, GoM, Planning Department, Mumbai.
13. GoM (State Crime Records Bureau), CID, Pune, For Years.
14. Mohankumar S and R K Sarma (2006), Analysis of Farmer Suicide in Kerala, Economic and Political Weekly, April 22,

2006, PP. 1559-1558.
15. Mohanty B B and Sangeeta Shroff (2004), Farmers Suicides in Maharashtra, Economic and Political Weekly, Dec. 2004, PP. 5599-5606.
16. Prasad C S (1999), Suicide Death and Quality of Indian Cotton: Perspectives from History of Technology and Khadi Movement, Economic and Political Weekly, Jn. 30, 1999, PP. 12-21.
17. Parchure Rajas and Talule Dnyandev (2012), Agricultural Distress and Farmers Sucides in Yavatmal District, GIPE Pune - NABARD - DEAR Study, Mumbai.
18. Revathy E (1998), Farmers' Suicide: Missing Issues, Economic and Political Weekly, June 29, 2002.
19. Shiva, Vandana and A H Jafri (1998), Seeds of Suicide: The Ecological and Human Costs of Globalization of Agriculture, Research Foundation for Science, Technology and Ecology, New Delhi.
20. Shrijit Mishra (2006), Farmers' Suicides in Maharashtra, Economic and Political Weekly, April 2006, PP. 1538-1545.
21. Shrijit Mishra (2014), Farmers Suicides in India, 1995-2012: Measurement and Interpretation, Asia Research Centre Working Paper, London School of Economics and Political Science, London, United Kingdom.
22. Siddhartha Mitra and Sangeeta Shroff (2007), Farmers' Suicides in Maharashtra, Economic and Political Weekly, Dec. 8, 2007, PP. 73-77.
23. Suri K C (2006), Political Economy of Agrarian Distress, Economic and Political Weekly, Vol. XLI, No. 16, PP. 1523-1529.
24. Vasavi, A R (1999), Agrarian Distress in Bihar, Economic and Political Weekly, 34 (32): PP. 2263-2268.
25. Wadhwa D C (1989), Guaranteeing Title to Land in India: A Preliminary Study, Economic and Political Weekly, October 19, 1989, PP. 2323-2334.

■

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवाद मधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

सर्व पैसे विश्वास आहेत.

**- ॲडम स्मिथ**

# पाण्याचे दर व मूल्य

**माधव चितळे**†

'अतिपरिचयाद अवज्ञा' या उक्तीप्रमाणे पाण्याचे समाज जीवनातील स्थान उपेक्षित होत गेले आहे. तसे होऊ नये म्हणून भारतीय परंपरेत पाण्याचे महत्त्व सतत मनावर बिंबवण्यासाठी दैनिक प्रार्थनेत पाण्याची पूजा अंतर्भूत करण्यात आली आहे. 'इमा आपः शिवतयाः। इमा सर्वस्य भेषजीः। इमा राष्ट्रस्य वर्धनीः।' अशा शब्दांमध्ये पाण्याचा गौरव केला जातो. पण तशा पद्धतीने तो अनुभवण्याची स्थिती आता उपभोगवादाच्या नव्या लाटेत दुर्मीळ झाली आहे.

सामान्यत: निसर्गामध्ये पाणी सहजपणे उपलब्ध होत असल्यामुळे त्याची उपेक्षा करण्याकडे मानवाचा कल असतो. त्यातहि विकासवादाच्या एकांगी मांडणीमुळे अधिकच भर पडत रहाते. त्यावर उपाय म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थायी विकासाबाबतच्या जोहान्सबर्ग येथील जागतिक परिषदेत खोलात चर्चा होऊन विकासाचे जे निर्णायक घटक ठरले, त्यात ऊर्जा, निवास, बोली यांच्यापेक्षा अधिक महत्त्वाचे असे प्रथम स्थान 'पाणी' या विकासाच्या साधनाला देण्यात आले.

पण या विकास साधनाचे संयोजन व सनियंत्रण याबाबतचे पूर्ण मार्गदर्शन मात्र त्या परिषदेने जाहिर केलेल्या २१ व्या शतकाच्या विकास कार्यक्रमात होऊ शकले नाही. त्यामुळे ऑक्सफोर्ड विद्यापीठात जागतिक विचारवंतांमधे पुन्हा एकदा खुली चर्चा घडवून आणण्यात आली. त्यावेळी पाणी हा विकासाचा सामाजिक घटक का आर्थिक घटक यावर मंथन झाले. केवळ एका मताच्या अधिक्याने पाणी हा सामाजिक घटक ठरला. पण त्याचबरोबर पाण्याचे आर्थिक व वित्तीय सनियंत्रण हे कौशल्याने हाताळले जायला हवे हे अधोरेखित झाले. त्या दिशेने आता वेगवेगळ्या देशांना व त्यातील भौगोलिक प्रदेशांना आपापली कार्यवाही पद्धत विकसित करायची आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर विचारविनिमय व मार्गदर्शन करण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय पाणीपुरवठा संस्था' International Water Supply Association काम करीत असे. शिवाय स्वतंत्रपणे पाण्याच्या गुणवत्तेचा पाठपुरावा करणारी 'जागतिक जलगुणवत्ता परिषद' कामात होती. योगायोगाने या दोन्ही संस्थांची जागतिक केंद्र कार्यालये लंडनला तेथील संसदेच्या परिसरा-जवळच्या लब्धप्रतिष्ठित परिसरात शेजारीशेजारी होती. त्यांच्या कार्यक्रमांमधील अनेक समान मुद्द्यांकडे जाणकारांचे लक्ष होते. 'पाण्याचा पुरवठा' व 'पाण्याची गुणवत्ता' हे मुद्दे स्वतंत्रपणे वेगवेगळे हाताळण्याजोगे नाहीत. जागतिक विकासाच्या प्रगतीत ते आता एकत्रितपणेच हाताळले जायला हवेत, हा विचार पक्का

† भूतपूर्व अध्यक्ष, केंद्रीय जल आयोग, भारत सरकार, २१६ साकेल नगर, इन्दौर (म. प्र.)-४५२ ०१८
आजीव सभासद क्र. : १६६, भ्रमणध्वनी : ९८२३१६१९०९, ई-मेल : chitalema@gmail.com

झाला. त्यामुळे अखेरी या दोन्ही संघटनांचा एकत्रित विलय करून 'आंतरराष्ट्रीय पाणी संघटना' International Water Association अशी एकच व्यापक संघटना आस्तित्वात आली. ती जगभर प्रभावीपणे अनेक मुद्दे हाताळीत आहे. देशोदेशींच्या पाणीसंस्थांचे तिच्याशी चांगले घनिष्ठ सहकार्य आहे.

दरवर्षी स्टॉकहोमला साजऱ्या होणाऱ्या जागतिक जल परिषदेत या संघटनेचा चांगला प्रभाव असतो. २० वर्षांहून अधिक काळ याबाबत वैचारिक मंथन घडून आल्यानंतर या परिषदेत सहभागी होणाऱ्यांच्या लक्षात आले की, पाण्याबाबतच्या वैज्ञानिक व अभियांत्रिकी पैलूंबरोबरच आता वित्तीय पैलू हे महत्त्वाचे व निर्णायक ठरू लागले आहेत. त्या दिशेने अधिक खोलात विश्लेषण चालू राहण्यासाठी नुकतेच काही वर्षांपूर्वी 'पाणी' या विषयात काम करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांची स्वतंत्र जागतिक संघटना उभी राहिली.

त्या माध्यमातून आता पाण्याच्या व्यवस्थापनासाठी लागणारी भांडवली गुंतवणूक, तिची उपलब्धता वा टंचाई, पाणी प्रकारांवरचा घसारा, पुनर्नवीकरण, पाणीवापराचा आवर्ती खर्च व पाणी महसूल यांची तोंडमिळवणी अशा व्यावहारिक तपशीलांची आता अधिक चिकित्सक छाननी सुरू झाली आहे. पाणी व्यवस्थेच्या स्थायित्वाला हे वित्तीय घटक पायाभूत आहेत. भारतामध्ये पाणी या विषयावर काम करणाऱ्या अनेक सामाजिक, वैज्ञानिक, तांत्रिक संघटना आहेत. व्यवस्थापनाची वित्तीय बाजू महत्त्वाची असल्याने त्या संघटना आपापल्या परीने वित्तीय विश्लेषणही घडवून आणीत असतात. ज्या थोड्या देशांजवळ स्वतःची सुस्पष्ट जलनीती प्रकाशित आहे, त्यात भारत हा आघाडीवरचा देश आहे. त्यामुळे भारतातही पाणी याविषयाची अर्थशास्त्रीय बाजू सुदृढपणे उभी करण्यासाठी अशा प्रकारच्या स्वैच्छिक तज्ञ संघटनेची गरज आहे.

भारताच्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेमध्ये पाण्याच्या साठवणीचा भांडवली खर्च ५० रुपये प्रति घनमीटर ते दोनशे रुपये प्रति घनमीटर असा झाला आहे. येत्या काळात तो आणखी वाढता राहणार आहे. पाण्याचे पर्यावरणीय स्थान नीट टिकवून धरण्यासाठी विशेष तरतुदींची वाढती गरज जाणवणार आहे. त्यासाठी विशेष व्यवस्था लागणार आहेत. त्याची भांडवली बाजू व आवर्ती खर्च अशा दोन्ही गोष्टी नीट हाताळाव्या लागणार आहे. भारताच्या जलनीतीत पाण्याचा चालू खर्च हा वापरदारांकडून पूर्णपणे वसूल व्हावा, असे निर्देशित आहे. भांडवली गुंतवणूक मात्र सरकारी माध्यमातून होत राहील, असे गृहीत धरले गेले आहे.

पण आता पाण्यासाठी करावयाच्या भांडवली गुंतवणुकीत केवळ साठवणीची व उपलब्धतेची व्यवस्था विचारात घेणे पुरेसे नाही. पाण्याच्या गुणवत्तेचा विचार आर्थिक संदर्भात होणे आवश्यक झाले आहे. पाण्याची अपेक्षित गुणवत्ता वृक्षसंवर्धनासाठी, कुरण विस्तारांसाठी, औद्योगिक वापरासाठी व नागरी उपयोगासाठी वेगवेगळ्या प्रकारची असते. तेव्हा त्यात संतुलन कसे राखायचे व वेगवेगळ्या वापरदारांनी याबाबतीतील आपली जबाबदारी कशी पार पाडावयाची याबाबतची व्यावहारिक कार्यपद्धती आता नीटपणे विकसित करावी लागणार आहे. साठवण, शुद्धीकरण, वितरण याबरोबरच वापरलेल्या पाण्याची पुनर्वापरासाठी करायची पार्थिव रचना व उत्सर्जित पाण्याची अंतिम विल्हेवाट पर्यावरणपूरक राहील, यासाठी घ्यावयाची दक्षता व त्यासाठी विशेष भांडवली व चालू खर्चाच्या तरतुदी यावर सामाजिक स्वास्थ्य, परिसरातील प्राणीजीवन, वनस्पतींचा विस्तार अवलंबून राहणार आहे; त्यावर मानवी समाजाचे भविष्य ठरणार आहे.

म्हणून पाण्याच्या किमतीचा विचार करताना केवळ

साठवण, शुद्धीकरण, वितरण येथवरचा आढावा पुरेसा नाही. वापरलेल्या पाण्याचे उत्सर्जन व पर्यावरणाला अनुकूल व पूरक होईल, अशी अंतिम विल्हेवाट या सर्वांचा एकत्रित विचार यापुढे करावा लागणार आहे. पाण्याच्या अर्थशास्त्राची मांडणी अधिक व्यापक संदर्भात करावी लागणार आहे. अर्थशास्त्राचा मूलभूत विचार प्रारंभी खनिज पदार्थांच्या वापराबाबतच्या व्यावहारिक गरजांना नजरेसमोर ठेवून झाला. त्यात फेरवापरात येणाऱ्या पाण्यासारख्या घटकाचा आता वेगळा विचार अंतर्भूत व्हायला हवा. शिवाय अर्थनिहाय, हंगामनिहाय, दिनमानानुसार पाण्यात होणारी उपलब्धतेची दोलायमानता कशी हाताळावयाची याची तरतूद नीट करायला हवी. पाण्याचा सर्वाधिक वापर शेतीत होतो. त्यात वार्षिक दोलायमान उपलब्धता कशी हाताळावयाची याचा काहीसा अनुभव भारतात विकसित झालेल्या पांझरा-गिरवा खोऱ्यांतील फड पद्धतीत आहे.

पण आता पाण्याच्या वापरातले नागरी व औद्योगिक घटक हे अनेक ठिकाणी अधिक प्रभावी व निर्णायक ठरत आहेत. त्यांना पाण्याच्या उपलब्धतेच्या वार्षिक विचलनात कसे सामावून घ्यायचे याची मार्गदर्शक तत्त्वे आता विकसित व्हायला हवीत. पाण्याच्या टंचाईच्या काळात पाण्याचे मूल्य बदललेले, वाढलेले असते. ते व्यावहारिक व्यवस्थेत कसे समाविष्ट करावयाचे याबाबत यापुढे बराच ऊहापोह व्हावा लागेल. दुपारच्या उन्हात शेताला दिलेल्या पाण्याचा बाष्पीभवनातून अधिक नाश होतो. त्याचा विचार करून पाणी वापराच्या वेळेप्रमाणे पाण्याचे दर निर्धारित व्हावे लागतील. स्पेनची राजधानी असलेल्या माद्रिद शहराच्या पाणी व्यवस्थेत हा विचार काही प्रमाणात केला गेला आहे.

पाण्याचे अर्थशास्त्र हा नव्या आधुनिक व्यवस्थांना अनुसरून विकसित होत असलेला नवा विषय आहे. त्याला सक्षमपणे हाताळू शकणारा कुशलवर्ग वेगवेगळ्या पाणीवापर क्षेत्रांमध्ये आता पुढे यायला हवा आहे. 'पाण्याचे विपणन' हा प्रगल्भ विचारही ऑस्ट्रेलियासारख्या प्रगत देशांनी आता समाजात रुळवला आहे. अशा सर्व अनुभवांच्या मागोवा घेऊन भारतालाही पाण्याचे आधुनिक व्यवस्थापन शास्त्र आता नव्या रूपात आकाराला आणता येईल. नव्या आधुनिक रचनांमध्ये पर्यावरणासाठी वापरायच्या पाण्याचाही विचार अंतर्भूत करून पाण्याची वित्तीय व्यवस्था बसवावी लागेल. पाण्याच्या संदर्भात समाज जेवढा अधिक प्रगल्भ राहील, तेवढे ते अधिक सोपे होईल व पाण्याचे दर व मूल्ये यांची नीट सांगड घालता येईल.

**(टीप :** सदर लेखासाठी लेखकाने संदर्भग्रंथाचा वापर केलेला नाही. सदर लेख हा लेखकाने पूर्णतः स्वतःच्या आजपर्यंतच्या जलसिंचन क्षेत्रातील अनुभवावर व व्यासंगावर आधारित लिहिलेला आहे.)

■

## निवेदन : अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# कृषी खर्च आणि मूल्य आयोगाच्या किंमत धोरणाची चिकित्सा

**एम. एच. शिंदे** †

**प्रस्तावना**

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. त्याचे कारण म्हणजे देशातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या आजही प्रत्यक्षरीत्या शेतीवर अवलंबून आहे. कृषी उत्पादनांच्या किमती या लोकसंख्येचे उत्पन्न, उपभोग, बचत, गुंतवणूक यांसारख्या बाबी निर्धारित करतात. तसेच कृषी उत्पादनांच्या किंमतीवर कृषी कामगार आणि इतर समाज घटकांचे उत्पन्न, उपभोग, बचत, गुंतवणूक या बाबी अवलंबून असतात. त्यामुळे कृषी उत्पादनांच्या किमती हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय आहे. एकीकडे, उत्पादित केलेल्या उत्पादनाला आकर्षक किंमत मिळावी, अशी रास्त अपेक्षा प्रत्येक कृषी उत्पादकाची असते. तर या उत्पादनांच्या किमती फार वाढू नयेत, अशी अपेक्षा ठेवणारा उपभोक्तावर्ग दुसरीकडे असतो. त्यामुळे उत्पादकांसाठी आकर्षक आणि उपभोक्त्यांसाठी किफायतशीर अशा किमती ठेवणे ही तारेवरची कसरत असते. भारतात १९६९ साली हरितक्रांती झाली असली तरी, त्यासंबंधीच्या प्रयत्नांना त्याआधीच सुरुवात झालेली होती. देशात अन्नधान्य उत्पादन आवश्यकतेपेक्षा कमी होत असल्याने अन्नधान्याची आयात करावी लागत असे. देशातील अन्नधान्याचे उत्पादन कमी असण्याच्या अनेक कारणांपैकी, उत्पादनाला मिळणारी अल्पकिंमत हेही एक कारण होते. उत्पादनांच्या किमती अल्प असल्याने उत्पादकांचा आवश्यक तेवढेच उत्पादन घेण्याकडे कल राहतो. परिणामी, बाजारात उत्पादनांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण होऊन उत्पादनांची आयात वाढते, देशाचे अवलंबित्व वाढते. कृषी उत्पादनामध्ये वाढ करण्याच्या हेतूने शेतमालाला योग्य किमत मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारने १९६५ साली कृषिमूल्य आयोगाची स्थापना केली. १९८५ साली या आयोगाचे कृषी खर्च आणि मूल्य आयोग असे पुनर्नामकरण करण्यात आले. त्या माध्यमातून शेतमालाच्या किमती उत्पादन खर्च आधारित निश्चित करून शेतमालाला किमान आधारभूत किमत देण्याचे धोरण सरकारने अवलंबले. याबरोबरच सरकारने वेळोवेळी विविध अभ्यासगटांची नियुक्ती करून कृषी उत्पादनांच्या किंमत निश्चितीच्यादृष्टीने पावले उचलल्याचे दिसून येते. याचवेळी कृषी उत्पादनांच्या बाजारातील प्रत्यक्ष किमती कृषी उत्पादकांच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण असतात. सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किमतीनुसारच शेतमालाची खरेदी केली पाहिजे, असे बंधन

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय,अहमदनगर.
आजीव सभासद क्र.: १४३२, भ्रमणध्वनी : ०९४२०४७०५३४, ई-मेल: madhavshinde.@rediffmail.com

बाजारपेठेवर अजून तरी घातले गेलेले नाही. त्यामुळे बाजारातील किमती ह्या काही वेळा किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी राहतात. ज्याचा प्रत्यक्ष फटका शेतकऱ्यांना बसतो. अशा प्रकारे कृषिखर्च आणि मूल्य आयोगाची स्थापना करून देशातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रयत्न केले असले तरी, आजही शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा झालेली दिसून येत नाही, हे दुर्दैव होय.

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये कृषिखर्च आणि मूल्य आयोगाची कार्यपद्धती आणि किमान आधारभूत किमतीचे निर्धारण करून किमान आधारभूत किमती आणि कृषी उत्पादन यांचे विवेचन करण्यात आले आहे. तसेच मंत्रालय भारत सरकार यांचे अहवाल इत्यादीमधून आकडेवारी घेण्यात आली आहे. याबरोबरच कृषी उत्पादनांच्या बाजार किमती आणि किमान आधारभूत किमती यांची तुलना करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत विश्लेषणासाठी २००४-०५ ते २०१७-१८ या कालखंडासाठी आवश्यक असणारी आकडेवारी कृषिखर्च आणि मूल्य आयोगाचे विविध अहवाल, भारतीय रिझर्व्ह बँकेचे अहवाल, केंद्रीय कृषी मंत्रालयाचे विविध अहवाल यातून गोळा करण्यात आले आहे. जमा करण्यात आलेल्या आकडेवारीचे संयुक्त वृद्धिदर, आलेख यांसारख्या सांख्यिकीय कसोट्यांच्याआधारे निष्कर्ष मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## कृषिखर्च आणि मूल्य आयोगाची उद्दिष्टे

देशातील कृषी उत्पादन आणि गुंतवणुकीला चालना देऊन उपभोक्त्यांच्या हक्कांचे संरक्षण करीत त्यांना योग्य किमतीत शेतमाल उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या आयोगाची आहे. त्यादृष्टीने आयोग पुढील उद्दिष्टे पार पाडण्याचा प्रयत्न करते.

१) उत्पादनात वाढ आणि आधुनिक तंत्राचा अवलंब करण्याच्या दृष्टीने शेतमालास आकर्षक किंमत देणे.
२) जमीन आणि इतर स्रोतांच्या विवेकशील उपयोगाची खात्री करणे.
३) राहणीमानाचा खर्च, देशातील वेतनपातळी आणि औद्योगिक खर्च संरचना लक्षात घेऊन कृषी उत्पादनांच्या किमती निश्चित करणे.

उपरोक्त उद्दिष्टे पार पाडण्यासाठी आयोग शेतमालास किमान आधारभूत किंमत जी उत्पादक आणि उपभोक्ते दोन्ही घटकांसाठी फायदेशीर असेल ती निश्चित करण्याचे कार्य करते.

किमान आधारभूत किंमत निश्चित करीत असताना शेतमाल पिकविण्यासाठी येणारा खर्च आणि तो खरेदी करण्याची उपभोक्त्यांची उत्पन्न क्षमता लक्षात घेतले जातात. कृषिखर्च आणि मूल्य आयोगास शेती उत्पादनांच्या किमती निश्चिती करीत असताना खालील घटकांचा विचार करावा लागतो.

## किंमत निश्चितीचे निर्धारक घटक

१) उत्पादन खर्च २) आंतरपीक किंमत समता ३) आंतरराष्ट्रीय किंमत स्थिती ४) देशातील सामान्य किंमत पातळीवरील परिणाम ५) जाहीर किमती (issue prices ) आणि अनुदानावरील परिणाम ६) व्यापारशर्ती ७) आदानांच्या किमतीतील बदल ८) बाजार किमतींची प्रवृत्ती ९) मागणी पुरवठा स्थिती १०) औद्योगिक खर्च संरचनेवर होणारा परिणाम ११) राहणीमानावर होणारा परिणाम

## कृषी उत्पादन खर्च

किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी उत्पादन खर्च महत्वाचा असतो. वास्तविकतः कृषी उत्पादनांच्या किमती निश्चित करताना बदलता आणि स्थिर उत्पादन खर्चदेखील लक्षात घेण्याची आवश्यकता असते. तसेच उत्पादन खर्च मोजला जात

असताना त्यामध्ये इतर घटकांसोबतच संयोजकाचा नफादेखील अंतर्भूत होणे आवश्यक असते. अशा प्रकारच्या खर्चावर आधारित कृषी उत्पादनांच्या किमती उत्पादकांसाठी काही प्रमाणात का होईना लाभदायक राहतील. असे असले तरी, भारतामध्ये कृषी उत्पादनांचा खर्च विविध संकल्पनांद्वारे स्पष्ट केला जातो.

**१) दृश्य वा नोंदणीकृत खर्च**

यामध्ये उत्पादकाने उत्पादन घेण्यासाठी केलेला प्रत्यक्ष खर्च विचारात घेतला जातो. यामध्ये कामावर कामगारांची मजुरी, पशु आणि यंत्रांचे भाडे, स्वतः च्या मालकीची जनावरे आणि यंत्रांच्या देखभालीचा खर्च, आदाने जसे, बी-बियाणे, सेंद्रिय आणि रासायनिक खते, कीटकनाशके, जलसिंचन, घसारा मूल्य, जमीन महसूल, आणि जमिनीचा खंड यांचा समावेश होतो. या बाबींवर केला जाणारा खर्च हा पैशात केला जात असल्याने त्याची नोंद ठेवली जाते.

**२) अदृश्य वा अनोंदणीकृत खर्च**

शेतमालाचे उत्पादन घेत असताना उत्पादक काही अदृश्य खर्चदेखील करीत असतात जो कुठेही नोंदवला जात नाही. यामध्ये कुटुंबातील व्यक्तींच्या श्रमाचे मूल्य, स्वतःच्या यंत्राचे भाडे, कुटुंबाच्या व्यवस्थापनातील सहभागाचे मूल्य, स्वतःच्या जमिनीचा खंड, स्वतःच्या भांडवलावरील व्याज यांचा समावेश होतो. उत्पादन खर्चाची नोंदणी केली जात असताना या बाबींवरील खर्चाची नोंदणी केली जात नाही.

**उत्पादन खर्चाच्या सांख्यिकीय व्याख्या**

उपरोक्त व्याख्यांव्यतिरिक्त कृषिखर्च आणि मूल्य आयोग कृषी खर्चाची विविधशास्त्रीय संकल्पनामध्ये वर्गवारी करते. त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

**-१. यामध्ये खालील बाबींवरील खर्च अंतर्भूत केला जातो.**

मानवी मजुरी, भाड्याने घेतलेल्या आणि स्वतःच्या पशूंची मजुरी, भाड्याने घेतलेल्या वा स्वतःच्या यंत्रांचे भाडे, बियाण्यांचे मूल्य (घराचे वा बाजारातील), कीटकनाशकांचे मूल्य, शेणखत, रासायनिक खतांचे मूल्य, घसारा (यंत्रे, जनावरांचे शेड, साठवणूक शेड, यंत्रांचे शेड इ.), जलसिंचन, जमीन महसूल, भांडवलावरील व्याज, किरकोळ खर्च इ.

A2 = -१+ जमिनीचा खंड

B1 =-१ + स्वतःच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेवरील व्याज

B2 = B1 + स्वतःच्या मालकीच्या जमिनीच्या खंडाचे मूल्य

C1 = B1 + कुटुंबातील व्यक्तींच्या श्रमाचे मूल्य

C2 = B2 + कुटुंबातील व्यक्तींच्या श्रमाचे मूल्य

C2*= C2 + श्रमाच्या मजुरीचे वाढीव मूल्य

C3 = C2* + शेतकऱ्याच्या स्वतःच्या व्यवस्थापनाच्या खर्चाच्या १०% मूल्य.

अशाप्रकारे कृषी उत्पादन खर्च निर्धारित करण्याच्या विविध पद्धती असल्या तरी यापैकी A2+कुटुंबातील सदस्यांच्या श्रमाचे मूल्य (FL) या खर्च पद्धतीनुसार सद्यस्थितीत उत्पादन खर्च निश्चित करून उत्पादनांच्या किमान आधारभूत किमती सुचविल्या जातात.

**किमान आधारभूत किमतींची वैशिष्ट्ये**

१) देशभर समान किमती
२) एका विपणन वर्षात किमती स्थिर
३) विविध प्रकारच्या उत्पादनांच्या किमती बाजारस्थितीवरून नाही तर रचनात्मक पद्धतीने बदलल्या जातात.
४) आधारभूत किमतीत आंतरवर्ष होणारे बदल कृषी उत्पादनांसाठी सकारात्मक असतात.
५) आधारभूत किमतीत आंतरवर्ष होणारे बदल सरकारने वेळोवेळी विविध घटकांना दिलेल्या

महत्त्वानुसार ठरतात.

सद्यस्थितीत कृषिखर्च आणि मूल्य आयोग पुढील पिकांच्या आधारभूत किमती जाहीर करते.

**तृणधान्य :-** धान, गहू, ज्वारी, बाजरी, मका, रागी, बार्ली (७)

**कडधान्य :-** हरभरा, तूर, मूग, उडीद, मसूर (५ )

**तेलबिया:-** भुईमूग, सोयाबीन, मोहरी, तीळ, करडई, Nigerseed, Rapeseed (७)

**व्यावसायिक पिके:** कापूस, तंबाखू, ज्यूट आणि Copra (४)

उपरोक्त पिकांच्या किमती निश्चित करण्याच्या शिफारशी असलेला अहवाल किंमत धोरण अहवाल म्हणून ओळखला जातो तो सरकारला सादर केला जातो. या अहवालात खरीप, रब्बी हंगामातील पिकांबरोबरच ऊस, ज्यूट, आणि Copra या पिकांचे विश्लेषण आणि त्यासंदर्भातील किंमत धोरण सादर केले जाते. सरकारने किमान आधारभूत किमती जाहीर करूनही जर कृषी उत्पादनांच्या बाजार किमती ह्या निर्धारित किमतीपेक्षा कमी असतील तर सरकार स्वत: विविध सहकारी संस्थांच्या माध्यमातून कृषी उत्पादनांची खरेदी करण्याचा निर्णय घेते.

प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत आणि बाजार किमतीत झालेली वाढ

तक्ता क्र. ०१ मध्ये काही प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत किमतीत २००४-०५ ते २०१७-१८ या कालखंडात झालेली वृद्धी दर्शविण्यात आली आहे. संयुक्त वृद्धिदराच्या सूत्रानुसार हे वृद्धिदर काढण्यात आलेले आहेत. त्यानुसार २००४-०५ ते २००९-१० आणि २००९-१० ते २०१३-१४ या दोन्ही कालखंडात बाजरी, तूर, सोयाबीन, धान, गहू आणि कापूस या पिकांच्या किमान आधारभूत किमतीत झालेली वाढ ही २०१३-१४ ते २०१७-१८ या कालखंडात झालेल्या वाढीपेक्षा निश्चितच अधिक असल्याचे दिसून येते. यादरम्यान प्रत्यक्ष बाजारपेठेतील किमतीत झालेली वाढ पाहणेदेखील आवश्यक आहे. उपरोक्त नमूद पिकांच्या बाजार किमतीत २००४-०५ ते २००९-१० आणि २००९-१० ते २०१३-१४ या दोन कालखंडात झालेली वाढ ही २०१३-१४ ते २०१७-१८ या कालखंडात झालेल्या वाढीपेक्षा अधिक राहिली आहे (तक्ता क्र. ०२). याचा परिणाम या पिकांच्या उत्पादन वाढीत झाल्याचे आपणास दिसून येते. २००९-१० ते २०१३-१४ या कालखंडात देशातील बाजरी, तूर, सोयाबीन, धान, गहू, कापूस या पिकांच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाल्याचे तर २०१३-१४ ते २०१७-१८ या कालखंडात या पिकांच्या उत्पादन वृद्धीचा दर घटल्याचे दिसून येते (तक्ता क्र.०३). २०१५-१६ या वर्षात तुरीची बाजार किंमत मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे सन २०१७-१८ या वर्षात तूर पिकाच्या उत्पादनात मोठी वाढ झालेली पाहायला मिळते. याच काळात तूर पिकाच्या उत्पादनात भरीव वाढ झाल्याने सरकारसमोर विशेषत: महाराष्ट्र राज्यामध्ये तूर खरेदीची मोठी समस्या निर्माण झाली होती. ज्यामध्ये अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याची नोंद झाली आहे. एकूणच कृषी उत्पादनांच्या किमान आधारभूत किमती आणि बाजार किमतीत झालेल्या वाढीचे कृषी उत्पादनावर झालेले परिणाम याद्वारे स्पष्ट होतात. कृषी उत्पादनाच्या किमती ह्या उत्पादन वाढीच्यादृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावतात, हे यावरून स्पष्ट होते.

शेतमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट (१५०%) हमीभाव देण्याचे सरकारचे धोरण असून त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात आणि एकूणच त्यांच्या उपभोग, बचत आणि गुंतवणूक यांवर सकारात्मक परिणाम होऊन शेतीविकासाला निश्चितच चालना मिळेल, अशी अपेक्षा आहे. सरकारच्या या धोरणामुळे देशातील शेतकऱ्यांमध्ये

**तक्ता क्र. १ : किमान आधारभूत किमतीत झालेली वृद्धी (%)**

| पीक | २००४-०५ ते २००९-१० | २००९-१० ते २०१३-१४ | २०१३-१४ ते २०१७-१८ |
|---|---|---|---|
| बाजरी | ५.८१ | ८.२७ | २.६५ |
| तूर | ८.३९ | १३.३३ | ४.८५ |
| सोयाबीन | ५.४१ | १२.९९ | ३.५६ |
| धान | ८.८२ | ४.१८ | ३.७७ |
| गहू | ९.०५ | ६.६३ | ३.४२ |
| कापूस | ७.०४ | ५.९२ | १.५५ |

स्रोत: लेखकाचे गणन

**तक्ता क्र. २ : बाजार किमतीत झालेली वृद्धी (%)**

| पीक | २००४-०५ ते २००९-१० | २००९-१० ते २०१३-१४ | २०१३-१४ ते २०१७-१८ |
|---|---|---|---|
| बाजरी | ७.९१ | ४.९१ | ६.५५ |
| तूर | १३.६० | १०.०३ | ६.९८ |
| सोयाबीन | ८.१० | १०.०३ | १.१५ |
| धान | १०.९१ | ९.४४ | ०.०८ |
| गहू | ८.३५ | ५.३२ | ०.९३ |
| कापूस | ९.६६ | ९.९० | -१.१६ |

स्रोत: लेखकाचे गणन

**तक्ता क्र. ३ : कृषी उत्पादनात झालेली वृद्धी (%)**

| पीक | २००४-०५ ते २००९-१० | २००९-१० ते २०१३-१४ | २०१३-१४ ते २०१७-१८ |
|---|---|---|---|
| बाजरी | -३.१० | ७.२७ | १.४५ |
| तूर | ०.७३ | ५.२० | १०.८१ |
| सोयाबीन | ६.०९ | ३.५० | -१.५३ |
| धान | १.११ | ३.६६ | १.१४ |
| गहू | २.६४ | ३.४७ | ०.७९ |
| कापूस | ६.२६ | ८.३६ | -०.५६ |

स्रोत: लेखकाचे गणन

उत्पन्नवाढीच्या अपेक्षा वाढल्या आहेत. तक्ता क्र. ०४ मध्ये किमान आधारभूत किमतीचे उत्पादन खर्चाशी असलेले प्रमाण दर्शविण्यात आले आहे. त्यानुसार निवडलेल्या पिकांच्या किमान आधारभूत किमती ह्या त्यापेक्षा निश्चितच जास्त आहेत. मात्र, आयोगाने उत्पादन खर्चाची निवडलेली सांख्यिकीय व्याख्या कृषी उत्पादनाचे इतर काही महत्त्वपूर्ण खर्च दुर्लक्षित करते. तसेच आयोगाने निर्धारित केलेल्या उत्पादन खर्चाचे(-२+FL) गणन कोणत्या किमती (चालू वर्षे की आधार वर्षे) नुसार केले जाणार याबाबत निश्चितता नाही. त्यामुळे उत्पादन खर्चाबाबतच्या अस्पष्टतेमुळे सरकारच्या दीडपट हमीभावाच्या धोरणाचा सकारात्मक परिणाम होईल, असे म्हणणे घाईचे ठरेल. तसेच, सरकारच्या दीडपट हमीभावापेक्षाही बाजारातील उत्पादनांच्या प्रत्यक्ष किमती शेतकऱ्यांचे उत्पन्न निर्धारित करण्यामध्ये निर्णायक भूमिका बजावतात. गेल्या काही वर्षांची आकडेवारी पाहता (पुढे विविध पिकांच्या बाजार किमतींचे दर्शविण्यात आलेले आलेख) पिकांच्या बाजार किमती ह्या अधिक राहिल्या असल्या तरी, सरकारने निर्धारित केलेल्या हमीभावाची बाजारपेठ स्वीकार करते की नाही हेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे.

**तक्ता क्र. ४ : किमान आधारभूत किमतीचे उत्पादन खर्चाशी (-२+FL) असलेले प्रमाण, (%)**

| पीके | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|
| बाजरी | १५०.० | १९७.० |
| तूर | १६१.२५ | १६५.० |
| सोयाबीन | १४३.० | १५०.० |
| गहू | २०३.८८ | - |
| धान | १३८.० | १५०.० |
| कापूस | - | - |

स्रोत: कृषिखर्च आणि मूल्य आयोग अहवाल, २०१७-१८.


**किमान आधारभूत किमती आणि बाजार किमती यातील फरक :**


कृषिखर्च आणि मूल्य आयोगाव्यतिरिक्त कृषी उत्पादनांच्या किमती बाजारातील मागणी आणि पुरवठा याद्वारेदेखील कमी जास्त होतात. बाजारातील किमती या किमान आधारभूत किंमतींपेक्षा अधिक असण्यात काही गैर नाही मात्र त्या किमान आधारभूत किंमतींपेक्षा कमी नसाव्यात असा सरकारचा आग्रह असतो. मात्र जेव्हा बाजार किमती या किमान आधारभूत किंमतींपेक्षा कमी होतात तेव्हा सरकार बाजारपेठेत हस्तक्षेप करून स्वत: शेतमाल खरेदी करते. मात्र, देशात उत्पादित केला जाणारा सर्वच्या सर्व शेतमाल खरेदी करणे सरकारला शक्य नसते. त्यामुळे शेतमालाची विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना बाजारपेठांची आवश्यकता असते. मात्र बाजारपेठांनीही शेतमाल रास्त किमतीलाच खरेदी करावा यादृष्टीने नियंत्रण ठेवणारी सरकारी वा सहकारी स्वरूपाची यंत्रणा कार्यरत असते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये काही निवडक पिकांच्या बाजार आणि किमान आधारभूत किमतींची २००४-०५ ते २०१७-१८ या कालखंडासाठी तुलना करण्यात आली आहे. बाजरी, तूर, सोयाबीन, गहू, धान आणि कापूस या प्रमुख पिकांच्या किमान आधारभूत आणि बाजार किमती


या कृषी खर्च आणि मूल्य आयोगाचे अहवाल आणि विपणन आणि निरीक्षण संचालनालय भारत सरकार यांच्या अहवालामधून घेण्यात आली आहे. मिळालेल्या आकडेवारीची आलेख स्वरूपात मांडणी करण्यात आली असून त्याद्वारे त्यांच्यातील फरक स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पुढे दिलेल्या आलेखांच्या माध्यमातून किमान आधारभूत आणि बाजार किमतींची तुलना करण्यात आली आहे. त्यावरून बाजरी या पीकाच्या किमान आधारभूत आणि बाजार दोन्ही किमती जवळपास सारख्या असल्याचे दिसते. तसेच, सोयाबीन, तूर, गहू आणि धान या पीकांच्या बाजार किमती या किमान आधारभूत किमतींपेक्षा काहीशा अधिक राहिल्याचे दिसते. तर सुरुवातीच्या कालखंडात (२००४-०५ ते २००९-१०) कापूस या पीकाच्या किमान आधारभूत किंमत ही बाजार किमतींपेक्षा अधिक राहिल्याचे स्पष्ट होते. या पीकाच्या बाजार किमतीतील चढउतार अधिक असल्याचे दिसून येते.

**कृषी उत्पादनांच्या बाजार किमती आणि किमान आधारभूत किमती यातील फरक**






## सारांश

वास्तविकत: कृषी उत्पादनांच्या किमती या अर्थव्यवस्थेच्या कार्यप्रणालीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात. आजही भारतातील ५० टक्क्यांच्या-वर लोकसंख्या शेतीक्षेत्रावर अवलंबून आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात असलेल्या लोकसंख्येचे अर्थकारण कृषी उत्पादनांच्या किमतींवर अवलंबून असते. याबरोबरच कृषी उत्पादनांच्या किमती शेतमालाचे उत्पादन आणि पीकरचना निर्धारित करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. उपरोक्त विश्लेषणावरून २०१३-१४ ते २०१७-१८ या कालखंडात कृषी उत्पादनांच्या किमान आधारभूत किमती आणि बाजार किमती यामध्ये झालेली वाढ त्याआधीच्या कालखंडांच्या तुलनेत कमी राहिल्याने उत्पादनवाढीवर त्याचा परिणाम झाल्याचे स्पष्ट होते. तसेच केंद्र सरकारने उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव देण्याचे जाहीर केले असले तरी उत्पादन खर्चाच्या किमतींबाबत संदिग्धता असल्याने उत्पादन खर्चाचे गणन अस्पष्ट आहे. याबरोबरच शेतमालाच्या बाजार किमती ह्या किमान आधारभूत किमतींपेक्षा अधिक राहिल्या असल्या तरी, त्याचा उत्पादकांच्या उत्पन्नावर फार मोठा सकारात्मक परिणाम झाला असे म्हणता येणार नाही. वास्तवत: कृषी खर्च आणि मूल्य आयोग उत्पादन खर्चाच्या ज्या संख्यकीय व्याख्यांचा (-२ + FL आणि C2) आधार घेऊन आधारभूत किमती सुचविते त्याच्या दीडपट हमीभाव देण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाची अंमलबजावणी झाल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, अशी अपेक्षा आहे. मात्र त्याचवेळी शेतमालाची बाजार किंमतही त्याच प्रमाणात वाढणे गरजेचे आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्यादृष्टीने दीडपट हमीभावाचे धोरण यशस्वी होईल की नाही याबाबत शंका वाटते.

## संदर्भ सूची:


1) Acharya S.S., Agarwal N.L. Agricultural Marketing in India, Oxford and IBH Publishing Co. Pvt. Ltd, New Delhi 2009.
2) Alagh Y.K. Report of the Expert Committee to examine Methodological Issues in Fixing MSP, Ministry of Agriculture, Govt. of India 2005.
3) Datt, Mahajan Indian Economy, S. Chand Publication, New Delhi 2014.
4) Kulkarni K.R. Agriculture Marketing in India, The Corporate Book Depot, Bombay.
5) Annual Report, Department of Agriculture, Cooperation and Farmers Welfare, Govt. of India 1950.
6) Reserve Bank of India, Handbook of Statistics on the Indian Economy, 2017-18.
7) www.agmarknet.gov.in


■

# गुड एम्प्लॉईज् लिव बॅड मॅनेजर, नॉट कंपनी

**विजय मा. कुंभार** †

देशातील विविध खाजगी कंपन्या, शासकीय आस्थापना, सहकारी संस्था, शासकीय कार्यालय, निमशासकीय कार्यालय किंवा संस्थांमधील कर्मचाऱ्यांची आवक -जावक पाहिली तर असे दिसून येते की, एखाद्या विशिष्ट कंपनीमध्ये किंवा कार्यालयामध्ये कर्मचारी नव्याने जॉईन होण्याचे आणि सोडून जाण्याचेही प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. अशा कंपनीमध्ये एम्प्लॉई टर्नओव्हर खूप मोठा असल्याचे दिसून येते. हजारो कर्मचारी नव्याने येत असतात आणि तेवढेच सोडूनही जात असतात; परंतु फरक हा असतो की, अकुशल किंवा अर्धकुशल कर्मचारी जॉईन होतात आणि कुशल कर्मचारी सोडून जातात. नव्याने जॉईन झालेले कर्मचारी अकुशल किंवा अर्धकुशल असतो आणि कंपनी सोडून जाताना पूर्णपणे कुशल कर्मचारी असतो.

कंपनीतून कुशल कर्मचारी सोडून गेल्यास त्याची जागा भरून काढणारा कर्मचारी तात्काळ उपलब्ध असतो परंतु येथे बहुतांश वेळा नगास-नग रिप्लेस होण्याचे प्रमाण अधिक असते. कारण पूर्वीचा कर्मचारी हा केवळ नोकर नसतो तर कंपनीची उद्दिष्ट्ये, मुल्ये, इथिक्स, परंपरा, प्रगतीची दिशा इ. बाबत परिपूर्ण जाण असणारा असा कर्मचारी असतो, असा कर्मचारी गमावणे म्हणजे केवळ एक कर्मचारी कमी होणे इतके त्याचे संकुचित मूल्य नसते. कारण त्याची वस्तुगत प्रतिस्थापना (Physical Replacement) करणे सोपे असते, परंतु त्यांची मानसिक प्रतिस्थापना (Psychological Replacement) करणे कालापव्यय आणि उत्पादन काळाचा अपव्यय करण्याची बाब असते. नवीन कर्मचारी नव्या व्यवस्थेत पूर्णपणे सेट होईपर्यंत, त्याला सर्व प्रशासकीय, तांत्रिक, मानसिक आणि कार्यक्षमता सिद्ध करण्यासाठी काही काल द्यावा लागतो. त्या कालावधीत कंपनीचा होणारा संभाव्य तोटा किंवा उत्पादन घट न भरून निघणारी असते. विशेषतः उत्पादन क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्रामध्ये ही बाब खूप नुकसानदायक ठरते. उदा, हॉटेल, बँकिंग, पर्यटन, शिक्षण, प्रशिक्षण, कायदा इ. क्षेत्रामध्ये कंपनीच्या Brand बरोबरच तिथे काम करणारे व सेवा देणारे उत्तम कर्मचारी ही त्या कंपनीची महत्त्वाची मालमत्ता असते, ते कर्मचारी नवा ग्राहक जोडणारा आणि जुना ग्राहक टिकवून ठेवणारा दुवा असतात.

अनेक वेळा असेही पाहावयास मिळते की, सेवा क्षेत्रातील विविध कंपन्या व संस्था तिथे कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळे आणि त्यांच्या उत्तम सेवेमुळे ओळखले जातात. परंतु याचा कंपनी मालकास अभिमान वाटायला हवा कंपनी मालकास याचे दुःख

† विभागप्रमुख, बँक मॅनेजमेंट विभाग, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य (स्वायत्त) महाविद्यालय, सातारा
आजीव सभासद क्र. : १२८६, भ्रमणध्वनी : ९८६०१७६०५९, ई-मेल : kumbharvmgmail.com

वाटू नये (William et al, 2013). उलट माझ्या उद्योगातील भांडवल महत्त्वाचे आहेच, मी पुरवलेली यंत्रे आणि यंत्रणा तर महत्त्वाचे आहेच; परंतु त्याहीपेक्षा त्याचा उत्तम वापर करून व्यवसायवृद्धी करणारे माझे कर्मचारी त्यापेक्षा महत्त्वाचे आहेत ही भावना मॅनेजर किंवा कंपनी मालकामध्ये असायला हवी. परंतु यांत्रिकी करणाऱ्या युगात ही भावना कुठेतरी कमी होत चाललेली आहे असे दिसत आहे. प्रगत उत्पादन तंत्र हाताशी आल्यामुळे आपला कर्मचारी कमी महत्त्वाचा वाटू लागला आहे. तसेच अलीकडील काळात आत्मवृद्धी केंद्रित व्यवस्थापन (Self Development Focused Management Practices) आणि स्वार्थ भावना असणारे मॅनेजर पाहावयास मिळत आहेत. चांगल्या कंपन्यामध्येही आत्मवृद्धी केंद्रित व्यवस्थापन (Self Development Focused Management Practices) करणारे मॅनेजर पाहावयास मिळत असल्याने चांगल्या कंपन्यांमध्येही चांगले कर्मचारी टिकत नाहीत. कालांतराने ते नोकरी सोडून अन्यत्र जाताना दिसत आहेत; गुड एम्प्लॉईज् लिव बॅड मॅनेजर - नॉट कंपनी चांगले कर्मचारी बॅड मॅनेजरला सोडतात कंपनीस नाही. प्रस्तुत लेखामध्ये याच बाबींचा ऊहापोह करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उत्तम कर्मचारी म्हणजे काय?**

उत्तम कर्मचाऱ्याची (Good Employees) सुस्पष्ट अशी व्याख्या करणे सहज शक्य नसले तरी त्याची काही महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करता येतात. विविध व्यवस्थापन तंत्र व मानसशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्यांचा अभ्यास करता असे म्हणता येते की, जो कर्मचारी कंपनी किंवा संस्थेच्या हिताला प्राधान्य देऊन आपली सर्व क्षमता पणाला लावून उत्तम कार्यक्षमता सिद्ध करतो, कंपनीची प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करतो तो कर्मचारी कंपनीसाठी उत्तम कर्मचारी असतो (Cleverism, 2016). वैशिष्ट्यानुसारच पाहायचे झाले तर तो स्वयंप्रेरित (Self Motivated) असावा. कंपनी किंवा संस्थेसाठी अपेक्षित असलेले काम सांगण्याची वेळ येऊ नये तर ते त्यांनी स्वयंप्रेरणेने (Self Motivation) करावयास हवे, तत्काळ संपादन क्षमता (Quick Learning-Ability) कंपनीच्या कामकाजातील बदल, नवीन तंत्रज्ञान, नवीन पद्धती चटकन आत्मसात करून शिकून घेणारा कर्मचारी असावयास हवा म्हणजे कंपनी भविष्यकाळातील सर्व प्रकारच्या बदलास सहजासहजी सामोरी जाऊ शकते. नवे कर्मचारी असल्यास कंपनीकडेही अशी क्षमता आपोआप येते. आपला कर्मचारी हुशार आणि स्मार्ट वर्कर ( Talented and Smart Worker) असावा. कारण सध्याच्या युगात हार्ड वर्कर कर्मचाऱ्यांची फारशी गरज उरलेली नाही; आणि तशी आवश्यकता भासलीच तर त्यांची फार उणीव नसते. त्याच्याकडे प्रामाणिकपणा (Honesty) आणि नैतिकता (Ethical Values) असायलाच हवी, तो आत्मविश्वासू (Confidence), वक्तशीर (Punctual) सकारात्मक (Positive), धडाडीने काम करणारा (Proactive) असावा, परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो कंपनी आणि संस्थेच्या तात्विक अधिष्ठानास (Philosophycal Values) मानणारा असावा म्हणजेच कल्चरली फिट (Culturaly Fit) असावा.

**उत्तम कर्मचाऱ्याची गुणवैशिष्ट्ये**

- स्वयंप्रेरित (Self Motivated)
- तत्काळ संपादनक्षम (Quick Learner)
- हुशार (Talented)
- स्मार्ट वर्कर (Smart Worker)
- प्रामाणिकपणा (Honesty)
- नैतिकता (Ethical Values)
- आत्मविश्वासू (Confidence)
- वक्तशीर (Punctual)

► सकारात्मक (Positive)
► धडाडीने काम करणारा (Proactive)
► तात्विक अधिष्ठानास मानणारा (Philosophycal Values)
► कल्चरली फिट (Culturaly Fit)

वास्तविक पाहता असे उत्तम कर्मचारी (Good Employee) सर्वच प्रकारच्या कंपन्या किंवा संस्थांमध्ये असतात. मात्र वाईट मॅनेजर (Bad Manager) मुळे असे कर्मचारी त्या कंपनीमध्ये फार काळ टिकत नाहीत ही महत्त्वाची समस्या आहे. जे उत्तम कर्मचारी असतात ते कंपनीसाठी किंवा आपल्या संस्थेसाठी वाटेल तो त्याग करावयास तयार असतात. किंबहुना ते करतही असतात; मात्र केवळ कंपनीतील वाईट मॅनेजरमुळे हे कर्मचारी फार काळ टिकत नाहीत; ते कंपनी सोडून गेल्याचे दिसून येते. तर हे असे का घडते यावर अनेक मानवसंसाधन तज्ज्ञ, संशोधक, आणि संशोधन संस्थांनी अभ्यास केल्याचे दिसून येते. या सर्व तज्ज्ञांचा अभ्यास असे सांगतो की, चांगले कर्मचारी कंपनी सोडत नाहीत तर आपल्या वाईट मॅनेजरला सोडतात (Good Employees Leave Bad Manager......Not Good Company) हा संशोधनाअंती काढलेला निष्कर्ष आहे. आणि तो डॉ. बर्नाड वाकाबी-२०१६, प्रा.सुसान एम. एच - २०१५, प्रा.मिचेल एस.ओ-२००८, प्रा. रॉबर्ट रिगल-२००७, प्रा.ब्राहम एल-२००५ इ. तज्ज्ञांनी मान्य केलेला आहे. तसेच जगप्रसिद्ध हावार्ड बिझनेस स्कूलमधील संशोधकांनीही हे मत मान्य केलेले आहे.

**उत्तम कर्मचारी जॉब का सोडतात?**

वास्तविक पाहता चांगले कर्मचारी हे आपली चांगली कंपनी सोडत नाहीत तर नाइलाजास्तव (Unwillingly) आपल्या वाईट मॅनेजरला सोडतात. ते जॉब सोडून जात असले तरी ते चांगल्या कंपनीस सोडून जाऊ इच्छित नसतात; परंतु त्यांचा नाइलाज असतो की, ज्यामुळे कंपनीस अत्यंत उपयुक्त असणारे कर्मचारी इच्छा नसतानाही मॅनेजर बरोबर आपली वेव्ह लेंन्थ जुळत नसल्याने कंपनी सोडून जातात. येथे हेही समजून घेण्याची आवश्यकता आहे की असे काय घडते? की ज्यामुळे चांगले कर्मचारी बाहेर पडण्याचा निर्णय घेतात. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये अशा काही महत्त्वाच्या बाबींची चर्चा केलेली आहे. पुढील काही मुद्यांवरून हे लक्षात येईल की कंपनी उत्तम असतानाही उत्तम कर्मचारी नोकरी सोडून अन्य कंपनीमध्ये का जातात?

**१. मॅनेजर कर्मचाऱ्यांचा नेता होण्यापेक्षा बॉस होतो :** कंपनीचा मॅनेजर किंवा प्रमुख हा कर्मचाऱ्यांचा नेता होण्यापेक्षा बॉस होण्याचा प्रयत्न करतो तेव्हा चांगले कर्मचारी टिकत नाहीत. प्रा.रसेल इव्हिंग म्हणतात, A leader creates confidence and a boss creates fear among the employee. म्हणजेच मॅनेजर हा आपला नेता नसून आपल्यासाठी रिंगमास्टर होण्याचा प्रयत्न करत असतो तेव्हा चांगले कर्मचारी अशा तथाकथित बॉसला नमस्कार घालून कंपनीचा रामराम घेतात (Rick White, 2005).

**२. मी सर्वात मोठा असा मॅनेजरचा अहंभाव:** कंपनीचा मॅनेजर हा कंपनीतील कर्मचाऱ्यांसमोर मी सर्वात मोठा आहे, माझ्याकडे खूप अधिकार आहेत, मी काहीही करू शकतो असे भासवण्याचा प्रयत्न करू लागतो तेव्हा कंपनीतील उत्तम कर्मचाऱ्यांसाठी गैरसोयीचे वातावरण (Uncomfortable Environment) तयार होते (Branham, L. 2005). मात्र जे सुमार दर्जाचे कर्मचारी असतात ते मांडलिकत्व मान्य करून मुजरा संस्कृती स्वीकारतात; मात्र चांगल्या कर्मचाऱ्यांसाठी व्यक्तिपूजा ही अमान्य असते आणि त्यातून संघर्ष सुरू होतो. आणि या संघर्षाचा शेवट उत्तम कर्मचारी कंपनी सोडून देण्यामध्ये होतो.

**३. कामाबाबत स्वायत्तता नसणे :** उत्तम कर्मचाऱ्यास कंपनीतील कामाची स्वायत्तता (Autonomy) हवी असते (Heidi, 2011) कारण त्यांना स्वतःच्या कामाबाबत खात्री असते; आणि आपण कंपनीचे अहित होईल असे काही करणार नाही याची हमी असते. परंतु जर त्यांना अशी स्वायत्तता मिळाली नाही तर त्यांना कंपनीमध्ये गैरसोयीचे वाटू लागते. कारण इतर सुमार कर्मचाऱ्यांप्रमाणे सतत नियंत्रणाखाली काम करणे त्यांना आवडत नाही. तरीही मॅनेजर नियंत्रण लादण्याचा प्रयत्न करत असेल तर मात्र संघर्ष वाढत जातो.

**४. वर्चस्व-वादावरून होणारा संघर्ष :** अनेक कंपन्यांमध्ये मॅनेजर आणि उत्तम कर्मचारी यांच्यातील संघर्ष हा वचर्स्ववादावरून निर्माण झालेला असतो. कंपनीचे भागधारक किंवा संचालक मंडळ मॅनेजरपेक्षा कंपनीतील एखाद्या चांगल्या कर्मचाऱ्यास सन्मान देत असतील तर अनेक बॅड मॅनेजर अशा कर्मचाऱ्यास व्यक्तिगत पातळीवर शक्य तेवढे अपमानित करण्याचा आणि त्याची मानहानी करण्याचा प्रयत्न करतात, त्यामधून संघर्ष वाढू लागतो (Jimmy, 2009).

**५. कर्मचाऱ्यांचा वैयक्तिक करियरमध्ये कृत्रिम अडसर निर्माण करणे :** बॅड मॅनेजर चांगल्या कर्मचाऱ्यांचा वैयक्तिक किंवा प्रोफेशनल करियरमध्ये कृत्रिम अडसर निर्माण करतात, अथवा असा कर्मचारी किती बेजबाबदार, उर्मट, कामचुकार, लबाड आहे हे भासवण्याचा प्रयत्न करतात; कारण कर्मचारी किती बेजवाबदार, उर्मट, कामचुकार, लबाड आहे हे स्पष्ट करणारी यंत्रणा वाईट मॅनेजरच्याच हातात असते.

**६. चांगल्या कर्मचाऱ्याच्या संधी हिरावून घेणे:** एखादा कर्मचारी हुशार आणि कार्यक्षम आहे असे वाटल्यास वाईट मॅनेजर त्याला अजून संधी देण्यापेक्षा त्याच्या शक्य तेवढ्या संधी हिरावून घेण्याचा प्रयत्न करू लागतो. कारण त्याला त्याची जाणीव झालेली असते की, अशा कर्मचाऱ्यास आपण पुढे जाण्याची संधी दिली तर तो कर्मचारी आपल्याही पुढे जाईल ही भीती त्याला वाटू लागते. मग त्याला चांगल्या संधीपासून दूर ठेवणे, त्याला क्षुल्लक कामामध्ये गुंतवून ठेवणे किंवा तो उपस्थितच राहू शकणार नाही अशी व्यवस्था करण्याचे लबाड प्रयत्न वाईट मॅनेजरकडून सुरू होतात. मात्र, उत्तम कर्मचाऱ्याच्या हे लक्षात यायला लागते की हे जाणीवपूर्वक सुरू आहे आणि मग कर्मचारी कंपनी सोडण्याचा विचार करू लागतो.

**७. निर्णय प्रक्रियेत सहभागी करून न घेणे :** अनेक वाईट मॅनेजर कार्यक्षम कर्मचाऱ्याला टिकवून ठेवण्यापेक्षा त्याला हाकलून देण्यासाठीच अधिक प्रयत्न करताना दिसतात (Riggle, 2007). त्यासाठी त्याचा मानसिक छळ सुरू होतो. उदा. त्याच्यापेक्षा सुमार कर्मचाऱ्याला व्यवस्थापनात आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे.

**८. कर्मचाऱ्याच्या यशाकडे मुद्दाम दुर्लक्ष करणे :** अनेक वाईट मॅनेजर कार्यक्षम कर्मचाऱ्यापेक्षा सुमार कर्मचाऱ्याच्या व हुजरेगीरी करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या छोट्या-छोट्या यशाचे मोठे कौतुक करतात. मात्र मुद्दाम उत्तम कर्मचाऱ्याच्या व स्वाभिमानी अशा कर्मचाऱ्यांच्या मोठ्या यशाकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे अशा कर्मचाऱ्याची काम करण्याची भावना संपुष्टात येते (Heathfield, 2015).

**९. गर्विष्ठ आणि उद्दाम मॅनेजर :** काही मॅनेजर हे अत्यंत गर्विष्ठ (Egoistic) आणि उद्दाम (Arrogant) असे असतात (Rao, 2014). ज्यांना असे वाटत असते की या विश्वातील सर्वात विद्वान मी एकटाच आहे. माझ्यासारखे कोणीच नाही आणि त्यामुळे त्याला इतर कोणताही कर्मचारी कसपटाप्रमाणे वाटू लागतो. अशा मॅनेजरकडे फक्त लबाड, धूर्त, स्वाभिमान नसणारी

आणि अकुशल अशा कर्मचाऱ्यांची टोळीच काम करू शकते. कारण अशा कर्मचाऱ्यांना कोणताही चांगला मॅनेजर स्वीकारण्याची शक्यता नसते. त्यामुळे हे लोक अशा मॅनेजरच्या वाईट सवयीचा आधार घेऊन त्यांना दैवताप्रमाणे पुजायला लागतात की जे चांगल्या कर्मचाऱ्यास हे जमणे शक्य नसते.

**१०. कंपनीच्या हितापेक्षा स्वहितास प्राधान्य देणारा मॅनेजर :** उत्तम कर्मचारी नेहमी कंपनीच्या हितास प्रथम प्राधान्य देतो. मात्र वाईट मॅनेजर सर्वात प्रथम स्वहितास प्राधान्य देतो आणि त्याप्रमाणे कंपनीचे प्रशासन चालवतो की जी बाब उत्तम कर्मचाऱ्यास न पटणारी असते. जेव्हा-जेव्हा कंपनीच्या अ-हिताची बाब पुढे येते तेव्हा असा कर्मचारी विरोधात उभा राहतो आणि इथेच संघर्षाची दुसरी सुरुवात होते (Michael, 2008). वाईट मॅनेजरला असे वाटायला लागते की, मी मॅनेजर आहे मग एवढा फायदा किंवा लाभ मी घेतला तर बिघडलं कुठे, त्यातूनच पुढे त्याचे धाडस वाढत जाते आणि दुसरीकडे कंपनीच्या अहितामुळे उत्तम कर्मचाऱ्याकडून अशा गोष्टीला होणार विरोधही वाढत जातो.

**११. पगार देऊन निष्ठा विकत घेता येत नाही याचा विसर :** पगार देऊन कर्मचारी विकत घेऊ शकतो असे मॅनेजरला वाटते परंतु हे खरे नाही. हि-यंग या व्यवस्थापन शास्त्रज्ञाने म्हटले आहे की 'Manager Can't be Purchase Employee' पैसे देऊन कर्मचाऱ्याचा वेळ विकत घेता येतो, परंतु श्रद्धा आणि प्रामाणिकपणा पैसे देऊन मिळवता येत नाही (Patti Malott, 2011) हे वाईट मॅनेजरच्या लक्षात येत नाही. उत्तम कर्मचारी हे पैशासाठी नाही तर निष्ठेपोटी काम करतात याचा विसर मॅनेजरला पडू लागला की संघर्ष वाढू लागतो.

**१२. यश माझे आणि अपयश मात्र कर्मचाऱ्यांचे :** कंपनीतील काम हे सार्वत्रिक प्रयत्नाचे फलित असते. मात्र वाईट मॅनेजरला अशी सवय असते की यश मिळाले तर ते माझे एकट्याचे आणि अपयश आले की ते कर्मचाऱ्यांचे. अनेक वेळा असे दिसून येते की, एखादे महत्त्वाचे काम करून घेण्यासाठी मॅनेजर अनेक सहकाऱ्यांची मदत घेतो मात्र त्याचे यश मिळाले की मात्र तो फक्त स्वतःच्या नावाने करतो. त्या कामातील आपल्या कर्मचाऱ्यांचे योगदान सांगत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांची काम करण्याची भावना संपुष्टात येते.

अशा अनेक बाबी आहेत की, ज्यामुळे चांगले कर्मचारी कंपनीत टिकत नाहीत याचा अर्थ असा नसतो की कंपनीत दोष आहेत तर वस्तुस्थिती अशी असते की आपल्या कंपनीतील चांगल्या कर्मचाऱ्यांना हाताळणारे मॅनेजर व्यवस्थित नसतात. ते असेही आभास निर्माण करतात की हा गेला तर छपन्न मिळतील; परंतु हे खरे नसते. नगाला-नग भरपूर मिळतात तसे कर्मचाऱ्याला-कर्मचारी रिप्लेस होत नाही. काही नामवंत कंपन्या व त्यामधील व्यवस्थापन पाहिले तर लक्षात येते की, ते कर्मचाऱ्यास-कर्मचारी न मानता व्यावसाईक पार्टनर मानतात म्हणून त्या संस्था मोठ्या आहेत अजून मोठ्या होत आहेत. आपली कंपनी ही याप्रमाणेच मोठी व्हायची असेल तर वाईट मॅनेजरवर इलाज करण्याची आवश्यकता आहे. अन्यथा कंपनीतील ब्रेन ड्रेन सुरू आहे, सुरूच राहणार याची गांभीर्याने दखल प्रत्येक कंपनीने घेणे आवश्यक आहे असे वाटते.

**संदर्भसूची**

1. Branham, L. (2005). The 7 hidden reasons employees leave - How to Recognize the Subtle signs and act before it's too late, Saranac Lake, NY, US-: -M-COM.
2. Buckingham, M., Coffman, C. (1999).

First, Break -ll the Rules : What the World's Greatest Managers Do Differently. New York, NY. :Simon  Schuster, 1999.
3. Cleverism (2016). 20 Qualities of - Great Employee, https://www.cleverism.com/20-top-qualities-determine-great-employee/ retrieved 10/11/2016.
4. Emily Smykal (2016). 7 Qualities of - Good Employee and Candidate, https://www.jibe.com/ddr/7-qualities-of-a-good-employee-and-candidate-according-to-research/   retrieved 10/11/2016.
5. Heidi Grant Halvorson (2011). How To Give Employees - Sense of -Autonomy (When You -re Really Calling The Shots), FORBES, http://www.forbes.com/.
6. Jimmy L. Smith (2009), 12 Reasons Employees Leave Organizations, Inter Business Issues, December 2009, http://www.peoriamagazines.com/ibi/2009/dec/12-reasons-employees-leave-organizations.
7. Rao M. S. (2014). Why you should avoid massaging your boss's ego, Business Review,http://www.businessreviewusa.com/leadership/3622/Why-you-should-avoid-massaging-your-bosss-ego.
8. Michael, S.O (2008). Using Motivational Strategy as Panacea for Employee Retention and Turnover in Selected Public and Private Sector Organisations in the Eastern Cape Province of South -frica, Master of Commerce Thesis, University of Fort Hare. 2008.
9. Patti Malott (2011). People Leave Managers Not Their Organization, Houston N-CB- Chapter, http://www.nacba.net/DC2011/Documents/D07%2 0Malott, %20Patti.pdf.
10. Rick Tate  Dr. Julie White (2005). People Leave Managers...Not Organizations!: -ction Based Leadership 10th Edition, iUniverse, Inc. (February 14, 2005) ISBN-10: 0595-331-688.
11. Riggle Robert J. (2007). The Impact of Organizational Climate Variables of Perceived Organizational Support, Workplace Isolation, and Ethical Climate on Salesperson Psychological and Behavioral Work Outcomes, University of South Florida, ISBN-0549-355-979.
12. Rooster Cogburn and True Grit (2007). People Leave Managers... Not Organizations, http://www.impactachievement.com/ChapterOnePreview.pdf.
13. Heathfield Susan M. (2015). Top 10 Reasons Why Employees Quit Their Job, http://humanresources.about.com/od/resigningfromyourjob/a/top10reasonsemployees quittheir job.htm.
14. William -. Gentry, Ph.D., Kristin L. Cullen, Jennifer J. Deal,  Sarah -. Stawiski (2013). -bsence of Support Makes the Heart Wander, Center for Creative Leadership, http://www.ccl.org/wp-content/uploads/2015/02/-bsenceOfSupport.pdf.

■

चरखा ही हिंदुस्थानची कामधेनू आहे.

**- महात्मा गांधी**

# भारतीय रुपयाचा इतिहास व त्याच्या अवमूल्यनाने बदललेली अर्थव्यवस्था

**सुरेखा तु. रोंगटे †**

**प्रास्ताविक**

जगातील विविध क्षेत्रांत असलेल्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, कला, क्रीडा इ. सर्व क्षेत्रांतील कार्याचा संबंध पैशाशी येतो. पैशाच्या स्वरूपात व आकारात दिवसेंदिवस बदल होत आले आहेत. विविध प्रकारच्या धातूंच्या वापराआधी वस्तूंचा, सेवांचा वापर देखील पैसारुपाने केला जात होता. सर्व जगरहाटी पैशाभोवती फिरत असल्याचे पूर्वीपासून चालत आलेली स्थिती कालपरत्वे स्वरूपातील बदलाने बदलत आली आहे. मानव आपल्या कल्याणासाठी करीत असलेल्या आर्थिक मूल्यांची निर्मिती ही पैशात मोजतो. मानवाच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत सर्व घटनांशी पैसा निगडित आहे.

इतिहासाचा अभ्यास करताना महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या साधनांमध्ये त्या-त्या काळातील नाण्यांचा समावेश होतो. आर्थिक विनिमय सुबत्ता, अवनती, राजकीय यंत्रणा, कलाकुसर इ. कितीतरी पैलूंविषयी ऐतिहासिक नाणी बोलू शकतात. नाण्यांवरील मजकूर, चित्रे, चिन्हे, त्याचे दर्शनीमूल्य या साऱ्या गोष्टी महत्त्वाच्या असतात. आदिमानवाच्या काळात चलन नव्हते. पण काही प्रमाणात वस्तुविनिमय होता. त्यानंतर हळूहळू बदलत गेलेली अर्थव्यवस्था आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थेपर्यंत स्थित्यंतरित होत गेली. विनिमयाचे माध्यम म्हणून पैशाचा प्रामुख्याने उपयोग वाढला. आजपर्यंत यातील होणाऱ्या बदलत्या अर्थव्यवस्थेत चलनाचे अवमूल्यनही भारतात अनेक वेळा केले गेले. चलनाचे अंतर्गत मूल्य कमी झालेले असताना विनिमय दर पूर्वीचाच राहिला तर त्या चलनाचे अवमूल्यन झाले असे म्हणतात. आपल्या देशाचे चलन अवमूल्यनाच्या दृष्टीने अभ्यासण्याआधी रुपयाचा इतिहास अभ्यासणे गरजेचे आहे.

**स्वातंत्र्यपूर्व इतिहास**

भारतीय रुपया ह्या चलनाचा इतिहास बघता प्राचीन काळात 'रुपया' ह्या शब्दाशी साधर्म्य असलेला शब्द कौटिल्याने म्हणजेच चाणक्याने अर्थशास्त्रात 'रूप्यरूप' नावाने वापरला आहे. अर्थात, हे नाणे चांदी व सोन्याचे असे इतिहासातील अगदी ठामपणे नोंदला गेलेला काळ म्हणजे पहिला भारतीय मुस्लीम सम्राट शेरशहा सूरीने त्याच्या काळात जनतेसाठी ज्या ज्या सोयी-सुविधा आणि बदल केले होते, त्यापैकी 'रुपया' या नावाने चलनात नाणे आणणे हा एक मोठा बदल होता. रुपया १७८ ग्रेन म्हणजे ११ ग्रॅम

† सहयोगी प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग, चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगली
आजीव सभासद क्र. : ५२९, भ्रमणध्वनी : ९६५७९७८५०४, ई-मेल : surekhat.rongate@gmail.com

चांदीचा होता व या रुपयाचा एक्सेंज रेट होता ४० तांब्याचे पैसे म्हणजे १ चांदीचा रुपया. याच शेरशहाने तांब्याची, सोन्याची नाणी ज्याला मोहर म्हटले जाई. तीदेखील चलनात आणली. तेव्हापासून व्यवहारात पैसा आला. प्रामुख्याने रुपया मोघल साम्राज्यातच होता. हा रुपया पुढे भारतात सर्वत्र यायला बस्करची लढाई कारणीभूत ठरली. बस्करच्या 'सर जेम्स प्रिन्सेस' या ब्रिटीश व्यक्तीने भारतातील चलनाचा अभ्यास करून लॉर्ड विल्यम बेंडिंग यांच्याकडे एक अहवाल आणि नाण्याचे प्रारूप करून पाठविले. त्यांचा हा अहवाल व एक डिझाईन मंजूर होऊन इंग्लंडमधून भारतात नाणी पाडण्याचे मशीन आले व त्यानंतर पुढे भारतीय रुपयाला खऱ्या अर्थाने चलनात सुरुवात झाली. पुढे १८३३-३४ पासून विल्यम राजाच्या छापाची नाणी तयार होण्यास सुरुवात झाली. नंतर व्हिक्टोरिया राणी, आठवे एडवर्ड, पाचवे जॉर्ज व सहावे जॉर्ज इ. राजांच्या मुद्रा असलेली नाणी स्वातंत्र्यानंतरही काही काळ होती. १९०६ मध्ये ब्रिटिशांनी त्यावेळेस भारतात इंडियन प्रोमिसरी नोट अर्थात कागदी नोटा व्यवहारात आणल्या होत्या. त्या सर्व चलन व्यवहाराचा इतिहास अभ्यासणे महत्त्वाचे आहे.

### स्वातंत्र्योत्तर कालखंड

भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर काळात नाण्यांमध्ये बदल केले परंतु सहावा जॉर्ज यांची भावमुद्रा नाण्याच्या एका बाजूला ठेवून दुसऱ्या बाजूला भारताचे प्रतीक म्हणून सिंहाचे चित्र ठेवले होते. १९५० पर्यंत ही नाणी चलनात होती. परंतु त्यानंतर म्हणजेच १९५० साली पूर्णपणे भारतीय नाणी तयार करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर काही काळापर्यंत भारतीय रुपया हा जागतिक अर्थव्यवस्थेत भक्कम होता. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश पौंड आणि अमेरिकन डॉलरला जे भाव मिळत होते तेच भाव भारतीय रुपयाला मिळत असत. परंतु त्यानंतर मात्र भारतीय रुपया बाजारात पत गमावून बसला. याआधी म्हणजे १८ सप्टेंबर १९४० रोजी इंग्लंडने आंतरराष्ट्रीय चलनाच्या परवानगीने पौंडचे ३०.५% अवमूल्यन केले. त्याचा परिणाम डॉलरची किंमत ४.३० वरून २.८० इतकी खाली आली. तेव्हा भारताची आयात-निर्यात बहुतांशी इंग्लंड व भारताच्या निर्यातीत फार मोठी घट होणार होती. परिणामी भारताने पौंडच्या अवमूल्यनानंतर लगेचच रूपयाचे तितक्याच प्रमाणात अवमूल्यन केले. त्यामुळे रुपया व पौंड विनिमय दर पूर्वीइतकाच १ शिलिंग ६ पेन्स राहिला.

### स्वातंत्र्योत्तर कालखंडातील रुपयाचे अवमूल्यन

भारताला १९४९ ला देखील अवमूल्यन करावे लागले. २० सप्टेंबर १९४९ रोजी रुपयाचे अवमूल्यन केले. हे अवमूल्यन फक्त अमेरिकन डॉलरच्या संदर्भात होते. पौंड-स्टर्लिंगच्या किमतीत मात्र बदल झाला नव्हता. आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलाच्या बाबतीत अधिक प्रतिकात्मकता निर्माण झाल्याने भारतीय शासनाने अवमूल्यनाचा निर्णय घेतला. या काळात डॉलरमधील किंमत ३० सेंटवरून २१ सेंटपर्यंत कमी केली होती. त्यावेळचे अर्थमंत्री डॉ.जॉन मथाई यांच्या म्हणण्यानुसार, भारताला १९४९ च्या अवमूल्यनाने फारसा फायदा झाला नाही. पण तो एक केवळ संरक्षणात्मक पवित्रा असल्याचे मत मथाई यांनी मांडले. त्यांनतर आंतरराष्ट्रीय चलननिधीच्या सल्ल्यानुसार, भारताने ६ जून १९६६ रोजी रुपयाचे ३३.५% अवमूल्यन केले. डॉलरची किंमत ४.४६ रुपयांवरून ७.५० रुपयांपर्यंत वाढली व पौंडची किंमत १३.३३ रुपयांवरून २१ रुपये झाली. कारण किमतीचा विचार करता १९५२-५३ मूळ काळ असलेला भावनिर्देशांक मे १९६६ च्या अखेरीस १८० वर गेला आणि ही प्रवृत्ती आटोक्यात येण्याची काही

चिन्हे दिसेनात. भारत सरकारने विविध वस्तूंच्या बाबतीत भावनियंत्रण लागू केले. परंतु ते अयशस्वी होऊन काळ्याबाजारात वाढ झाली. या वाढत्या किमतीचा व देशात घसरत जाणाऱ्या रुपयाच्या मूल्याचा प्रतिकूल त्याच्या परदेशी किमतीवर होणे अपरिहार्य होते. पौंड किंवा डॉलर खरेदी करण्यासाठी अधिकृत दरापेक्षा अधिक रुपये देणे आवश्यक झाले. त्यामुळे ५ जून, १९६६ पर्यंत रुपयाचा अधिकृत हुंडणावळीचा दर १ शिलिंग ६ पेन्स किंवा २१ सेंटस् असला तरी प्रत्यक्षात मात्र वास्तविक अवमूल्यन व्हावे. अशा काही उपाययोजना करण्यात आल्या असल्या तरी त्याला अवमूल्यन म्हटले जात नव्हते. उदा. कित्येक वस्तूंवरील आयात करांत सारखी वाढ केली जात होती. त्यानंतर वास्तविक अवमूल्यन झाले. ते अवमूल्यन आंतरराष्ट्रीय चलननिधीच्या सल्ल्यानुसार भारताने ६ जून १९६६ला केले. या अवमूल्यनाचे कारण म्हणजे वाढत्या किमतीच्या कारणात पाकिस्तानशी असलेला संघर्ष आणि १९६५चा दुष्काळ असे सांगितले जाते. या काळात ३३.५% अवमूल्यन केले. डॉलरच्या किमतीत रुपया ४.४६वरून ७.५० पर्यंत वाढला व पौंडची किंमत १३.३३ रुपयांवरून २१ पर्यंत वाढली. ह्या अवमूल्यनामागील उद्देश म्हणजे भारताच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेस अधिक मदत मिळावी हा होता. हे अवमूल्यन अनपेक्षित होते पण परकीय दडपणामुळे ते केले असावे, असे काही तज्ज्ञांनी आरोप केला. अवमूल्यनानंतर भाववाढ होऊ नये म्हणून जी काळजी घ्यावी लागते, ती न घेतली गेल्याने व भारताच्या निर्यात मालाला परकीय मागणी लवचिक नसल्याने अवमूल्यनाचा निर्यातीवर व अंतर्गत उत्पादनावर अपेक्षेसारखा परिणाम झाला नाही. परंतु आंतरराष्ट्रीय देवघेवीच्या ताळेबंदातील मूलभूत असमतोल नाहीसा करण्यासाठी निर्यातीत वाढ व आयातीत घट करणे आवश्यक ठरते. त्यासाठी योजण्यात येणाऱ्या अनेक उपायांपैकी अवमूल्यन हा दीर्घ परिणाम उपाय मानला जातो.

**रुपयाच्या घसरणीचे परिणाम**

अवमूल्यनात रुपयाची घसरण म्हणजे इतर विदेशी चलनाच्या तुलनेत रुपयाचे मूल्य कमी होते व परिणामी अमेरिकन डॉलर किंवा युरो तसेच ब्रिटिश पौंड ही चलने आपल्याला जास्त किमतीला मिळतात. थोडक्यात, विदेशी चलनासाठी आपल्याला जास्त पैसा मोजावा लागतो. विनिमय दरातील चढ-उताराचे परिणाम आपल्या अर्थरचनेवर व पर्यायाने आपल्या दैनंदिन जीवनावर होतो. रुपयाचे मूल्य वाढल्यास आयात स्वस्त होते. भारताने घेतलेल्या परदेशी कर्जाची परतफेड व त्यावरील व्याज विदेशी चलनात दिले जाते. विदेशी चलन महाग होते. त्यामुळे घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी आपल्याला अधिक रक्कम मोजावी लागते. मात्र रुपयाचे मूल्य कमी झाल्याने निर्यात स्वस्त होते. या रुपयाच्या घसरणीचा परिणाम देशाच्या परकीय चलनाच्या गंगाजळीवरही होतो. विनिमय दर नियंत्रित करण्यासाठी ही गंगाजळी वापरली जाते. म्हणजे परदेशी चलनाचा साठा कमी होतो.

रुपयाच्या घसरणीच्या या विविध परिणामांमुळे रुपयाचे मूल्य स्थिर राखण्याची गरज असते. हे काम मध्यवर्ती बँक विनिमय दर नियंत्रित ठेवून करत असते. हे दर नियंत्रणाचे कार्य आपल्या देशात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियामार्फत केले जाते. या बँकेकडून परकीय चलनाच्या मागणी-पुरवठ्याचे व्यवस्थापन केले जाते. मागणी वाढल्यास विनिमय दर वाढत असेल तर रिझर्व्ह बँक विदेशी चलन मुख्यत्वे डॉलर बाजारात विकून त्याचा पुरवठा वाढवते व दर स्थिर राखते. याउलट पुरवठा वाढल्यास विदेशी चलनाची खरेदी करून त्याची बाजारातील मागणी वाढवली जाते व चलन दर स्थिर ठेवला जातो. मार्च १९९३ पर्यंत विनिमय दर रिझर्व्ह बँक निश्चित करत असे. पण

त्यानंतर भारताने Liberalized exchange rate mechanism (LERM) अमलात आणले व रुपयाचा विनिमय दर बाजारातील मागणी पुरवठ्याप्रमाणे ठरवला जाऊ लागला. असे असले तरी रिझर्व्ह बँकेचे या दरावर सतत लक्ष असते.

**अवमूल्यन ही एक महत्त्वाची निर्णायक घटना**

अवमूल्यनाचे परिणाम केवळ आयात निर्यातीपुरते मर्यादित नसून उत्पादन आणि विषमतेपर्यंत पोहचतात. समाजातील अनेक वर्गांचे परस्पर असलेले संबंध अवमूल्यनाने बदलू शकतात. त्याचबरोबर देशाच्या आर्थिक नियोजनाशी त्याचा निकटचा संबंध आहे. म्हणून नियोजनाच्या खालोखाल अवमूल्यनाला महत्त्व आहे. देशाची स्थिती खूपच खालावली गेली असेल तर त्यावर अवमूल्यनाचा उपाय केला जातो. देशाची निर्यात याद्वारे वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. देशातील मालाची किंमत परकीयांना कमी झाल्यास मागणी किंवा निर्यात किती वाढेल ते मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असते. किंमतघटीच्या प्रमाणापेक्षा मागणीतील वाढ अधिक झाली तर लवचिकता १ पेक्षा अधिक समजावी. मागणी लवचिकता मोठी असली तरच पूर्वीपेक्षा अधिक चलन मिळून परकीय गंगाजळीत वाढ होईल. परंतु निर्यात वाढूनही परदेशी चलन किती मिळेल, ते मात्र मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असते. १९५८ ते १९६६ चा निर्यातीचा विचार केल्यास तूट मात्र वाढतच गेल्याचे दिसते.

**तक्ता क्र. १ : आयात, निर्यात व तूट**

| वर्ष | १९५८-५९ | १९६०-६१ | १९६५-६६ |
|---|---|---|---|
| आयात (रक्कम कोटींमध्ये) | ९०६ | ११२२ | १३५० |
| निर्यात (रक्कम कोटींमध्ये) | ५८० | ६२४ | ८०५ |
| तूट (रक्कम कोटींमध्ये) | ३२६ | ४८० | ५४५ |

(**स्रोत** - www.ceicdata.com / indiastatistics)

तक्ता क्र. १ मधील परिस्थिती बघता १९६६ साली रुपयाचे अवमूल्यन करणे हाच एक उपाय होता. वास्तविक अवमूल्यन २६ ऑक्टोबर, १९६४ रोजी सुरू झालेल्या 'नॅशनल डिफेन्स रेमिटन्स' योजनेत स्पष्ट दिसून येत होते. ही योजना ३१ मे, १९६६ पर्यंत चालू होती. पाकिस्तान संघर्षाचा परिणाम म्हणून परदेशी मदत थांबली. परकीय चलन न मिळाल्याने उद्योगधंदे चालू ठेवण्यासाठी आयात करता यावी, म्हणूनही ५ जून, १९६६ रोजी भारताने अवमूल्यन जाहीर केले व रुपयाची परदेशी किंमत ३६.५ % नी कमी केली.

**१२ वस्तूंच्या निर्यातीवर कर व १९९१ चा बदल**

वरील परिस्थिती म्हणजे वाढत जाणाऱ्या तुटीतून मार्ग काढण्यासाठी या काळात निर्यातीतून फायदा होण्यासाठी १२ वस्तूंच्या निर्यातीवर कर आकारले. त्या वस्तूंमध्ये चहा, कॉफी, काळीमिरी, तागाच्या पक्क्या मालाची निर्यात, कच्ची लोकर, तेलाची पेंड, कापूस, कातडी, दोरखंड व अभ्रक, दोरखंडापासूनच्या वस्तू.

भारतीय अर्थव्यवस्थेत १९९१ला प्रचंड प्रमाणात बदल घडून आले. भारताच्या आर्थिक इतिहासात १९९१ हे वर्ष जास्त आव्हानात्मक राहिले. त्यामागे प्रामुख्याने दोन कारणे सांगता येतील. ती म्हणजे देशातील राजकीय अस्थिरता आणि जागतिक घडामोडी. या काळात भारताला १९९१ चे तिसरे अवमूल्यन करावे लागले. हे अवमूल्यन तीन टप्प्यांमध्ये

झाले. मनमोहन सिंग अर्थमंत्री असताना १ जुलै १९९१ ला ९%, ३ जुलै, १९९१ ला १०% तर १५ जुलै १९९१ रोजी १२% अवमूल्यन केले गेले. या काळात सरासरी ५% अवमूल्यनाचे प्रमाण होते. राजकीय व आर्थिक अस्थिरतेच्या बाबतीत असे म्हणता येईल की, पाकिस्तानबरोबर झालेल्या युद्धानंतर राष्ट्रीय सुरक्षिततेला धोका, दुष्काळ, १९७३ चे जागतिक तेल संकट यांमुळेही भारताची आर्थिक स्थिती खालावली होती. २५ जून, १९७५ला आणिबाणी लागू झाली. मार्च १९७७ ला जनता शासन येऊन मोरारजी देसाईंच्या नेतृत्वाखाली शासन स्थापले गेले. २८ जुलै, १९७९ ला चरणसिंग नंतर १४ जानेवारी, १९८० ला इंदिरा गांधी पंतप्रधान पदावर आल्या. ३१ ऑक्टोबर, १९८४ ला त्यांची हत्या झाल्यानंतर राजीव गांधी, १९८९ ला विश्वनाथ प्रतापसिंह, त्यानंतर ७ नोव्हेंबर, १९९० विश्वनाथ प्रतापसिंह तर १० नोव्हेंबर, १९९० ला चंद्रशेखर, २१ जून, १९९१ला नरसिंह राव सत्तेवर आले. थोडक्यात १९७७ ते १९९१ या चौदा वर्षात ७ पंतप्रधान झाले.

देशातील राजकीय अस्थिरतेबरोबरच जगातील काही घटना भारताच्या आर्थिक संकटाला निमंत्रण देणाऱ्या ठरल्या. रशियाचे विघटन झाल्याने देशात येणारी रूपी ट्रेड क्रेडिट प्रवाह कमी झाला. पुढील आकडेवारी बघता तर भारताच्या आर्थिक संकटाची कल्पना सहज येईल. केंद्र आणि राज्य सरकार यांच्या एकत्रित वित्तीय तुटीचे जीडीपीशी प्रमाण १९८०-८१मध्ये ९% होते. ते १९८५-८६ मध्ये १०.४% आणि १९९०-९१ मध्ये १२.७% इतके प्रचंड वाढले. फक्त केंद्राच्या तुटीचे हे प्रमाण अनुक्रमे ६.१%, ८.३% आणि ८.४% असे धोकादायक झाले. सरकारची ही प्रचंड तूट भरून काढण्यासाठी सरकारला कर्ज घेणे भाग पडू लागले. सन १९८०-८१ मध्ये शासनाने देशांतर्गत कर्जाचे जीडीपी प्रमाण ३५% होते. ते १९९०-९१मध्ये ५३% झाले. आणि २९० अब्ज डॉलर्स जीडीपी असणाऱ्या भारतावर ७० अब्ज डॉलर्सचे कर्ज हा एक मोठा बोजा ठरला होता. परिणामी भारताजवळ जानेवारी १९९१ ला विदेशी चलन गंगाजळी केवळ १.२ अब्ज डॉलर्स इतक्या निम्न पातळीवर होती. विदेशी व्यापारातील तूट १९८९-९० मध्ये १२,४०० कोटींची होती ती १९९०-९१ ला १६,९०० कोटींपर्यंत वाढली. परिणामी, १९९१ मध्ये १ जुलै, ३ जुलै व १५ जुलै अशा तीन टप्प्यांत ९, १० आणि १२% इतके अवमूल्यन करण्यात आले. १९८८ मध्ये ९.४% भाववाढीचा दर १९९१ला १३.९% वर गेला. त्याचप्रमाणे या काळात देशाचा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ६.५ वरून ५.५% झाला. १९९० या काळातील चालू खात्यावर वाढती तूट, विदेशी कर्जावरील वाढ आणि विदेशी चलन गंगाजळीतील घट इ. ची परिणाम म्हणून विदेशी गुंतवणूक-दारांचा विश्वास कमी होऊन गुंतवणूक घटली.

अर्थात, रुपयाचा विनिमय दर बाजारातील मागणी पुरवठ्यावर रिझर्व्ह बँकेचे लक्ष असल्याने १९९५-९६ पर्यंत रुपया बऱ्यापैकी स्थिर होता. पण १९९७ चे आशियाई वित्त संकट आणि १९९९ चे कारगील युद्ध यामुळे रुपयावर दडपण आले. तेव्हा आरबीआयच्या तत्पर नियंत्रणामुळे भारताला विनिमय संकट टाळता आले. मात्र डॉलरचा भाव ३०-३२ वरून २००६-०७ ला ४३-४५पर्यंत पोहचला. त्यानंतर नियंत्रण काहीसे शिथिल करूनही रुपया डॉलर दर ४५ वर स्थिरावला. तो २०११ जुलैपर्यंत. पण त्यानंतर रुपयाची घसरण सतत चालू राहून डॉलर ५३ पर्यंत महागला. भाववाढीचा दर २ आकड्यांनी वाढल्याने मार्च २०१० पासून आरबीआयने १३ वेळा रेपोरेट वाढवला. महागाई आटोक्यात आणण्यासाठी

व्याजदरात वाढ केली गेली. याचा परिणाम कर्जे महाग झाली. त्यामुळे गुंतवणूक कमी होऊन २०११ मध्ये उत्पादन घट झालेली दिसून येते.

भारताची आयात निर्यातीपेक्षा नेहमीच जास्त दिसून येते. व्यापारशेषात सातत्याने तूट दिसून येते. देशाच्या क्रुड तेलाच्या मागणीपैकी जवळजवळ ८०% तेल भारताला आयात करावे लागते. २०११ मध्ये गुंतवणुकीचे प्रमाण अधिक घटल्याने उत्पादन वृद्धिदरातही घट झाली.

जुलै-ऑगस्ट २०१८ मध्ये देश ७२ वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्याच्या तयारीत असताना परकीय चलन बाजारात ऐतिहासिक घटना घटली. ती म्हणजे १४ ऑगस्टला अमेरिकी डॉलरच्या तुलनेत विनिमय दराने ७०.०९ हा आकडा गाठला. तर ४ डिसेंबर २०१८ रोजी ८८ पैशांचे अवमूल्यन होऊन तो डॉलर रुपया विनिमय दर एका डॉलर = ७०.४६ असा झाला. जागतिक बाजारात खनिज तेलाचा भाव वधारल्यामुळे व तेल आयातदाराकडून डॉलरची मागणी वाढल्याने रुपयाला झळ बसली. खनिज तेलाच्या घसरत्या किमतींना आळा घालण्यासाठी रशिया आणि सौदी अरेबियात तेलाचे उत्पादन मर्यादित करण्यावर एकमत झाले. परिणामी तेलाच्या किमती ३.८५ डॉलरने वधारल्या. परिणामी डॉलरची मागणी वाढली. बँका आणि आयातदारांनी डॉलरची मोठ्या प्रमाणात खरेदी केली. परिणामी रुपयाचे मूल्य ८८ पैशांनी घसरले. २०१८ मधील ऑक्टोबर ते डिसेंबर या महिन्यांमध्येही एक रुपयाच्या बाबतीत निराशाजनक कामगिरी समजली जात आहे.

कोणत्याही देशात गुंतवणूक करताना परकीय गुंतवणूकदार त्या देशातील व्याजाचे दर आणि चलनाचे विनिमय दर विचारात घेऊन एकूण परतावा किती मिळेल याचा अंदाज बांधतात. ऑगस्ट २०१३ मध्ये फेडरल रिझर्व्ह अमेरिकेतील व्याजदर वाढल्याने त्यावेळी अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपयाने ६९ ची पातळी गाठली होती. त्यानंतर आरबीआयने डॉलरची विक्री करून रुपयाला स्थिरता प्राप्त करून दिली होती. स्वातंत्र्योत्तर काळातील रुपयाची घसरण पुढीलप्रमाणे दिसून येते.

**तक्ता क्र. २ : स्वातंत्र्योत्तर काळातील रुपयाची घसरण**

| वर्ष | १ डॉलरचे रुपयातील मूल्य |
|---|---|
| १९५० | ४.७६ |
| १९६० | ४.७६ |
| १९६६ | ६.३६ |
| १९७० | ७.५० |
| १९८० | ७.८६ |
| १९९० | १७.५० |
| १९९१ | २२.७४ |
| २००० | ४४.९४ |
| २०१० | ४५.७३ |
| २०११ | ४६.६७ |
| २०१२ | ५३.४४ |
| २०१३ | ५६.५७ |
| २०१४ | ६२.३३ |
| २०१५ | ६२.९७ |
| २०१६ | ६६.४६ |
| २०१७ | ६७.७९ |
| १४/८/२०१८ | ७०.०९ |
| ४/१२/२०१८ | ७०.४६ |

**स्त्रोत** - www.bookmyforex.com & news paper

वरील आकडेवारी बघता २०१८ मध्ये रुपयाची घसरण सत्तरी ओलांडून गेल्याचे दिसून येते. अमेरिकेच्या डॉलरच्या तुलनेत रुपयाची सातत्याने घसरण झाली आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत अमेरिकी डॉलरचा वाढता दबदबा आहे. जागतिक बाजारपेठेत जवळजवळ ६५-६६% व्यवहार अमेरिकन डॉलरमध्ये होतात. तसेच

आपल्या देशातील गरज ८०% इंधनाच्या आयातीवर भागवली जाते. आर्थिक आणि सामाजिक विकासावर सातत्याने वेळ प्रसंगी परकीय कर्ज काढून खर्च करावा लागतो. देशाच्या आयातीत निर्यातीपेक्षा अधिक वाढ होताना दिसते. जुलै २०१८ मध्ये देशाची निर्यात १४% तर आयात २८ % म्हणजे निर्यातीपेक्षा आयात दुप्पट असल्याने देशातील पैसा बाहेर अधिक प्रमाणात गेला. गेल्या ५ वर्षांतील व्यापार तूट १८ अब्ज डॉलरची उच्चांकी पातळी दिसून येते, हे सुद्धा रुपयाच्या घसरणीचे कारण असू शकते.

समाजात आज चैन करणारा मोठा वर्ग निर्माण झाला आहे. त्यापैकी काहींकडे अतोनात पैसा झाला, ते खऱ्या अर्थाने चैन करतात. इतरांचे तसे नाही. त्यांच्याकडे थोडासा पैसा आहे. मध्यवर्गदेखील यात काही प्रमाणात सहभागी असतो. त्यातल्या त्यात अलीकडे शासणाने आयात वस्तूचा वापर कमी करण्यावर भर देण्याचे धोरण आखले आहे. स्वदेशी वस्तूंच्या वापरावर भर देणे गरजेचे असले तरी स्वदेशी म्हणजे केवळ खादी ग्रामोद्योग उत्पादन असा गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. शेवटी असे म्हणता येईल की, चाणक्याच्या काळात ज्या भारतीय रुपयाने घोडदौड सुरू केली. शेरशहा रुपयाला सर्वसामान्यांच्या खिशापर्यंत पोहचविले. व जेम्स प्रिन्सेसने त्याला रूप दिले. तो रुपया येणाऱ्या काळात प्रभावशाली होवो, ही आशा.

**संदर्भसूची**


१. Ganguli B. N., Devaluation of rupee, B.N.Ganguli, Ranjit Printers & Publishers, Delhi-6, 1966.

२. Malhotra A. N., Indian Currency, A History of Indian Currency, Published by Malhotra Brothers in New Delhi.

३. Vakil C. N., The Devaluation of the rupee (A challenge & Opportunity), Ladvani Publishing House, New Delhi, Bombay, 30 July 1966.

४. Shrivastava G. L., Devaluation & The Indian Economy, Calcatta.

५. बापट आसावरी, 'रुपया सशक्त कसा होईल', महाराष्ट्र टाइम्स, १२ जानेवारी २०१२.

६. भणगे भालचंद्र शंकर, 'रुपयाचे अवमूल्यन', प्रकाशन महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९६६.

७. डॉ. गोविलकर विनायक, 'भारतावरील १९९१चे आर्थिक संकट', महाराष्ट्र टाइम्स, १२ जून २०१७.


■

**Announcement for Call of Articles**
**Dr. Ravindra Sabnis Memorial Prize**

Marathi Arthshatra Parishad has considered an Endowment Fund for the award, on an annual basis of Dr. Ravindra Sabnis Memorial Prize of Rupees Four Thousand Only for outstanding contribution in form of an article published during the calendar year 2018 in standard accredited journals an themes belonging to the areas of Banking, Industrial Finance and General Industrial Economics.

Last date for Submission of the articles (Four Copies) for this year contest is 31st August 2019. For further details, contact the undersigned at this address.


**Prof. Dr. Kailas K. Patil**
'Saptashrungi', Near Parvati Mangal Karyalaya,
Trimurti Nagar, Parbhani 431 401
Mob. 9423102863, 9921568252

**Dr. R. B. Bhandwalkar**
Secretary and Treasurer
Marathi Arthashastra Parishad
Mob. 9423134686

# ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजुरांचे योगदान व त्यांच्या समस्या- एक अध्ययन

**नीता सुधाकर वाणी** †

**प्रस्तावना**

भारतात जवळ जवळ ७० टक्के भाग ग्रामीण असल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल प्रामुख्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीप्रधान आहे. अपवादात्मक भाग सोडला तर ग्रामीण भागात उद्योग पोहोचले नाहीत. ग्रामीण भागात उद्योग स्थापन करण्यात अनेक अडचणी येत असल्यामुळे उद्योग शहरी भागात केंद्रित झाले आहेत. ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असतो. भारतात ग्रामीण भागाचे प्रमाण जास्त असल्यामुळे व वाढत्या लोकसंख्येचा देश असल्यामुळे शेतीप्रधान आहे. आजही जवळ जवळ ६७ टक्के लोकांचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून आहे. शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे शेती हे एकमेव असे क्षेत्र आहे की, जेथे श्रमदलात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया काम करीत आहे. एवढेच नाही; तर शेतीची कामे पुरुषांच्या तुलनेने स्त्रिया मोठ्या संख्येने करतात, तरीही एकाच कामासाठी स्त्री-पुरुषांच्या वेतनात फरक केला जातो. ज्या स्त्रीने शेतीचा शोध लावून भटक्या अवस्थेत जगणाऱ्या मानवाला स्थिर केले तीच स्त्री या क्षेत्रात उपेक्षित आहे, तिला गौण स्थान दिले जाते.

**विषय निवड**

नुकताच केंद्रीय श्रम मंत्रालयाने १५ ऑक्टोबर हा दिवस महिला किसान दिन म्हणून दरवर्षी साजरा करण्याचे घोषित केले. शेतकरी व शेतमजूर महिलांचा सन्मान म्हणून १५ ऑक्टोबर या दिवशी महिला किसान दिन साजरा केला जाईल हे समजल्यावर आनंद झाला. त्या अनुषंगाने ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महिला शेतमजुरांचे योगदान काय आहेत, त्यांच्या समस्या कोणत्या आहेत यांचे अध्ययन करून काही उपाय सुचविता येतील का या भावनेतून प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली.

**स्पष्टीकरण**

शहरी भागात जेवढ्या सोयीसुविधा असतात तेवढ्या ग्रामीण भागात नसतात. ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा विकास मंदगतीने होतो. आजही भारतातील बराचसा ग्रामीण भाग रस्त्याने जोडलेला नाही. गावाच्या फाट्यापासून ५ ते ७ कि.मी. लोकांना गावापर्यंत पायी जावे लागते, अनेक सोयीसुविधांपासून ग्रामीण भाग वंचित आहे. ग्रामीण भागातील उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत शेती आहे. शेतीच्या विकासावर ग्रामीण भागाचा विकास अवलंबून असल्याने शेतीचा विकास होणे गरजेचे आहे. शेती विकासात शेतकरी व शेतमजूर यांचे स्थान महत्त्वाचे

† अर्थशास्त्र विभाग प्रमुख, स.व.प.कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर
आजीव सभासद क्र. : १५३३, भ्रमणध्वनी : ८००७६९८५७०, ई-मेल : neetawani@hotmail.com

आहे. शेती हा व्यवसाय सर्वांच्या सहकार्यातून होणारा व्यवसाय आहे. शेती क्षेत्रात विविध प्रकारची कामे शेतमजुरांच्या मदतीने करावी लागतात. उदा. नांगरणी, वखरणी, कोळपणी, पेरणी, निंदणे, कापणी, वेचणे, मळणी, जमिनीची मशागत करणे, खते देणे, किटकनाशके फवारणे, चरी खोदणे, तण काढणे, माल तयार करणे, वाहतूक करणे, मालाची बाजारात किंवा गोडावूनपर्यंत वाहतूक करणे, विक्री करणे इ. शेतीची कामे निसर्गावर आधारित असल्यामुळे शेती क्षेत्रात व्यवस्थापन व नियोजन महत्त्वाचे असते.

जी व्यक्ती दुसऱ्याच्या शेतावर रोजंदारीच्या अपेक्षेने काम करते तिला शेतमजूर म्हणतात.

शेतमजुरांचे तीन प्रकार पडतात : १) भूमिहीन शेतमजूर २) सीमांत शेतमजूर ३)अल्पभूधारक शेतमजूर. लिंगानुसार शेतमजुरांचे : १) स्त्री शेतमजूर २) पुरुष शेतमजूर असे दोन प्रकार पडतात.

आर्थिक विकास प्रक्रियेत औद्योगिक क्षेत्राला जास्त महत्त्व दिले जात असले तरीही शेतीचे स्थान महत्त्वाचे आहे. अर्थव्यवस्था विकसित असो, अविकसित असो किंवा विकसनशील असो, सर्वच प्रकारच्या अर्थव्यवस्थेत शेतीच्या विकासाला महत्त्व दिले जाते. भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर भारताने पहिल्या पंचवार्षिक योजनेत शेतीला महत्त्वाचे स्थान दिले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेतीचे उत्पन्न अनिश्‍चित असल्यामुळे औद्योगिक क्षेत्राला महत्त्व देण्यात आले पण याचा परिणाम असा झाला की, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आणि पुन्हा शेतीकडे लक्ष द्यावे लागले. शेतीद्वारे अन्नधान्य निर्मिती, कच्च्या मालाची उपलब्धता, रोजगार निर्मिती शक्य असते, शेतीवर आधारित उद्योगांना कच्चा माल पुरविण्याचे कार्य शेती करते तसेच शेतीशी संबंधीत अनेक उद्योग चालत असतात. या उद्योगांच्या विकासातून रोजगारनिर्मिती होते. तसेच शेती क्षेत्रात अनेक लोकांना रोजगार प्राप्त होतो. विशेष म्हणजे शेती क्षेत्रातील कामे करण्यासाठी विशेष शिक्षण-प्रशिक्षणाची गरज नसते. अनुभवाने शेतीची कामे शिकता येतात. असे असले तरी शेतीची कामे सोपी नाहीत ती कष्टप्रद मेहनतीची असतात. उन्हा, पावसात ती कामे करावी लागतात त्यासाठी सहनशक्ती, जिद्द, कष्टाळूपणा आवश्यक असतो. शेती क्षेत्राचे महत्त्व लक्षात घेता शेती क्षेत्रातील उत्पादन कार्यात सहभागी असणाऱ्या घटकाला महत्त्वाचे स्थान द्यावे लागते.

स्त्रियांमध्ये मुळातच निर्मितीक्षमतेचा गुण आहे, सहनशीलता, काटकसरीपणा आहे. अन्नधान्य निर्मितीत पुरुषांच्या तुलनेने स्त्रिया जास्त कष्ट घेतात. वर्तमानकालीन शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे शेतीची कामे कमी झाली असली तरी काही प्रकारची कामे यंत्र करू शकत नाही तिथे मानवी श्रमच वापरावे लागतात. उदा. निंदणी, सर्वा करणे, कापूस वेचणे, भाजीपाला, फळफळावळ काढणे, माल तयार करणे, ऊन, वादळ यापासून पिकांचे संरक्षण व्हावे म्हणून संरक्षक यंत्रणा निर्माण करणे, पिकाची देखभाल करणे इ. यातील बरीचशी कामे स्त्रियाच करतात. म्हणून शेतीच्या कामात पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचे योगदान मोठे आहे. स्त्रियांमधे असलेले वेगळे गुण, अपत्य प्रेम यामुळे त्या पिकांची योग्य निगा राखू शकतात, काळजी घेऊ शकतात कारण पिकांची काळजी लहान मुलाप्रमाणे घ्यावी लागते.

**श्रमदलातील लोकसंख्येची वर्गवारी**

महिला शेतमजुरांचे शेती विकासातील योगदान पाहण्यासाठी एकूण लोकसंख्येत महिला शेतमजुरांची संख्या किती आहे हे पाहणे आवश्यक ठरते. खालील तक्त्यात Census २०११ ची आकडेवारी देण्यात आली आहे.

**तक्ता क्र.१.१ : सन २०११ च्या जनगणनेनुसार श्रमदलाची आकडेवारी**

| तपशील | व्यक्ती | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | १,०२८,६१० | ५३२,१५७ | ४९६,४५३ |
| एकूण श्रमदल | ४०२,२३५ | २७५,०१५ | १२७,२२० |
| एकूण रोजगार | ३१३,००५ | २४०,१४८ | ७२,८५७ |
| सीमांत कर्मचारी | ८९,२३० | ३४,८६७ | ५४,३६३ |
| बिगर कर्मचारी | ६२६,३७६ | २५७,१४२ | ३६९,२३४ |
| शेतकरी | १२७,३१३ | ८५,४१७ | ४१,८९६ |
| शेतमजूर | १०६,७७५ | ५७,३२९ | ४९,४४६ |
| घरगुती उद्योगातील मजूर | १०६,९५७ | ८,७५४ | ८,२१३ |
| इतर कामगार | १५१,१९० | १२३,५२५ | २७,६६५ |

(Source : www.censusindia.gov.in)

वरील तक्त्यावरून असे लक्षात येते की, सन २०११ च्या आकडेवारीनुसार एकूण शेतकऱ्यांची संख्या १२७३१३ एवढी होती; त्यात पुरुष शेतकरी ८५,४१४ होते तर स्त्री शेतकऱ्यांची संख्या ४१,८९६ होती. पुरुष शेतकरी आणि स्त्री शेतकरी यात बरेच अंतर असल्याचे यावरून दिसते. वर्तमानकाळातही स्त्रियांच्या नावाने शेती असल्याचे फारच कमी प्रमाण आहे किंवा महिला शेतकऱ्यांची संख्या शेतमजूर महिलांपेक्षाही कमी दिसते. तसेच एकूण शेतमजुरांची संख्या सन २०११ मध्ये १,०६,७७५ होती, त्यात पुरुष शेतमजुरांची संख्या ५७,३२९ होती, तर स्त्री शेतमजुरांची संख्या ४९,४४६ होती. पुरुष शेतमजूर आणि स्त्री शेतमजूर यांच्यात फारसे अंतर नसल्याचे यावरून दिसते.

**भारताच्या एकूण लोकसंख्येतील व श्रमदलातील स्त्रियांची टक्केवारी**

अर्थार्जनाचे कार्य पुरुषांचे आणि घरातील काम स्त्रियांचे अशी कामाची वाटणी पूर्वापार करण्यात आली आहे. परंतु आता स्त्रिया शिकू लागल्या, त्या त्यांच अस्तित्व निर्माण करू लागल्या किंवा घरातील उत्पन्न कमी म्हणून त्या उत्पन्ने मिळविण्यासाठी बाहेर पडू लागल्या. देशातील कार्य करणारी लोकसंख्या जेवढी जास्त तेवढा देशाचा विकास वेगाने होतो म्हणून जास्तीत जास्त स्त्रियांनी कार्य करणाऱ्या लोकसंख्येत आले पाहिजे. यासाठी भारताच्या एकूण लोकसंख्येतील व श्रमदलातील स्त्रियांची टक्केवारी किती आहे हे पाहणे आवश्यक ठरते.

**तक्ता क्र.१.२ : भारताच्या एकूण लोकसंख्येतील व श्रमदलातील स्त्रियांची टक्केवारी**

| तपशील | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०२१ (अंदाजित) |
|---|---|---|---|---|---|
| शेती क्षेत्र | ८६.२ | ७५.७ | ४८.६ | ४३.७ | ४०.० |
| बिगर शेती क्षेत्र | ६९.२ | ७५.७ | ४८.६ | ४३.७ | ४५.० |

Source-https//mpraubuni-muenchen.deMPR dt.2.2.2019

वरील तक्त्यावरून शेती क्षेत्र व बिगर शेती क्षेत्रातील स्त्रियांचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसते. १९८१ मध्ये एकूण लोकसंख्येत शेती क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण ८६.२ टक्के होते ते २०११ मध्ये ४३.७ टक्के झाले. ते २०२१ मध्ये आणखी कमी होईल ४० टक्केवर येईल, असा अंदाज आहे. तसेच बिगर शेती क्षेत्रातील प्रमाण वाढून ४५ टक्केवर येईल असा अंदाज आहे. मात्र शेती जिवंत असेल तरच सृष्टी जिवंत राहणार आहे हे लक्षात घेऊन शेतमजुरांचा तुटवडा तर भासणार नाही, याचा विचार करणेत यावा. कारण शेतीक्षेत्रात द्विधा परिस्थिती असते. हंगामाच्या काळात शेतमजूर मिळत नाही तर हंगामेतर काळात शेतमजुराला काम नसते.

**भारतातील श्रमदलाचा व्यवसायानुसार वाढीचा दर (%)**

खालील तक्त्यात मुख्य स्त्री-पुरुष श्रमिक आणि सीमांत स्त्री-पुरुष श्रमिक यांचा वाढीचा दर दिलेला आहे. मुख्य श्रमिक म्हणजे ज्यांना शेतीत वर्षातून १८३ दिवस किंवा त्यापेक्षा जास्त दिवस काम मिळते त्यांना मुख्य श्रमिक म्हणतात. तर सीमांत श्रमिक म्हणजे ज्यांना वर्षातून १८३ दिवसांपेक्षा कमी काम मिळते त्यांना सीमांत श्रमिक म्हणतात. हंगामेतर काळात शेतमजुरांना काम मिळत नाही. बरेच दिवस ते बेरोजगार असतात आणि हे दिवस १८३ दिवसांपेक्षा कमी असतील तर त्यांना सीमांत शेतमजूर म्हणतात. त्यांची स्थिती बरीच दयनीय असते. त्यात मुख्य स्त्री-पुरुष श्रमिक, स्त्री-पुरुष सीमांत श्रमिक यांचा १९८१ ते २०११ पर्यंतचा वाढीचा दर आणि एकूण वाढीचा दर दाखविण्यात आला आहे. आणि २०११ ते २०२१ ची शोधनिबंधकाची अंदाजित आकडेवारी देण्यात आली आहे.

**तक्ता क्र.१.३ : भारतातील श्रमदलाचा व्यवसायानुसार वाढीचा दर (%)**

| वर्ष | एकूण कामगार | | | | मुख्य कामगार | | | | सीमांत कामगार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शेत करी | शेत मजूर | गृहो द्योग | इतर | शेत करी | शेत मजूर | गृहो द्योग | इतर | शेत करी | शेत मजूर | गृहो द्योग | इतर |
| पुरुष | | | | | | | | | | | | |
| १९८१-१९९१ | १.३ | २.७ | -२.१ | ३.२ | १.३ | २.९ | -२.१ | ३.३ | -२.४ | -३.१ | -२.९ | -२.४ |
| १९९१-२००१ | -०.४ | २.० | ६.० | ४.० | -१.३ | -१.२ | ५.१ | ३.२ | २१.८ | ३४.१ | २६.७ | ३२.८ |
| २००१-२०११ | -०.४ | ३.७ | १.६ | २.४ | -०.७ | ३.० | ०.१ | २.० | १.५ | ५.४ | १०.७ | ६.४ |
| २०११-२०२१ अंदाजित | -०.३ | ३.९ | १.९ | २.८ | -०.५ | ३.२ | ०.५ | २.५ | २.० | ५.७ | ११.५ | ७.८ |
| स्त्रिया | | | | | | | | | | | | |
| १९८१-१९९१ | ४.० | ३.२ | ०.४ | ४.३ | ४.१ | ३.२ | ०.९ | ४.७ | ३.८ | ३.२ | -१.१ | १.८ |
| १९९१.२००१ | १.७ | २.५ | १०.७ | ७.९ | १.३ | -२.४ | ७.६ | ६.० | २.३ | १०.२ | १७.५ | १७.३ |
| २००१-२०११ | -१.४ | २.१ | ०.६ | ४.७ | -१.० | ३.३ | ०.२ | ४.२ | -२.० | १.० | १.१ | ६.० |
| २०११-२०२१ अंदाजित | १.८ | २.६ | १०.० | ५.५ | १.२ | ३.७ | ०.९ | ५.३ | -१.७ | ०.९ | १.३ | ६.३ |

Source-https//mpraubuni-muenchen.de MPR dt.2.2.2019.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, १९९१ पासून सीमांत श्रमिक व मुख्य श्रमिक यांच्या दरात वाढ होत आहे. महिला शेतमजुरांचा विषय निवडल्यामुळे कृषी श्रमिकांकडे लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. त्यात सीमांत कृषी श्रमिकांचा वाढीचा दर जास्त आहे. १९९१ -२००१ या काळात सीमांत कृषी श्रमिकांचा वाढीचा दर खूपच जास्त होता. शेतीच्या यांत्रिकीकरणाचा हा परिणाम आहे तसेच नैसर्गिक आपत्ती, औद्योगिकरण, शहरीकरण इ. कारणांमुळे लागवडीखालील क्षेत्र कमी होत आहे. दिवसेंदिवस शेती क्षेत्रातील अर्ध बेरोजगारी, हंगामी बेरोजगारीत वाढ होत आहे. त्यामुळे शेतमजूर गृहोद्योगाकडे किंवा इतर क्षेत्राकडे कामासाठी वळत आहे. आज काही लोक शेतमजुरी सोडून औद्योगिक शहरात काम मिळविण्यासाठी जात आहेत. शिवाय शेतीपेक्षा तिथे त्यांना जास्त मजुरी मिळत आहे. सीमांत शेतमजुरांचा विचार केल्यास स्त्रियांच्या तुलनेने पुरुषांचा वाढीचा दर जास्त आहे.

**वेतनातील तौलनिक विषमता**

समान वेतन कायद्यानुसार, एकाच कामासाठी स्त्री-पुरुषांना समान वेतन देण्यात यावे असा नियम आहे. परंतु शेती क्षेत्र असे आहे की, तेथे एकाच कामासाठी स्त्री-पुरुषांना वेगवेगळे वेतन दिले जाते. खालील तक्त्यावरून हे स्पष्ट होते

**तक्ता क्र. १.४ : वेतनातील तौलनिक विषमता** (रुपये)

| वर्ष | पुरु ष | स्त्रिया | वर्ष | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | ८२ | ६२ | २०१२-१३ | १८३ | १३४ |
| २००७-०८ | ९१ | ७० | २०१४-१५ | २२९ | १७८ |
| २००८-०९ | १०८ | ८२ | २०१५-१६ | २६८ | २०० |
| २०१०-११ | १२४ | ९५ | २०१६-१७ | २८१ | २१८ |

Source-https://www.downtoearth.org.in dt.3.2.2019.

वरील तक्त्यावरून असे दिसते की, २००६-०७ मध्ये पुरुषांचे दैनिक वेतन ८२ रु. तर स्त्रियांचे ६२ रु. आहे. सन २०१०-११ मधील हा दर पुरुषांचा १२४ रु. तर स्त्रियांचा ९५ रु. होता. २०१६-१७ मध्ये पुरुषांचा २८१रु. तर स्त्रियांचा २१८ रु. होता. देशातील सर्वच भागात एकाच दराने वेतन दिले जात नाही. वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या दराने वेतन दिले जाते. २०१५-१६ च्या आकडेवारीनुसार भारतातील पुरुष शेतमजुरांचा सरासरी दैनिक वेतन दर २८१.३२रु. आहे तर स्त्री शेतमजुरांचा दैनिक वेतन दर त्यापेक्षा कमी २१७.७६रु. हा आहे. भारतात सर्वच राज्यात पुरुष शेतमजुरांच्या तुलनेने स्त्री शेतमजुरांना कमी वेतन दिले जाते. याची किमान वेतन आयोगाने दखल घेऊन समान वेतन देण्याची कडक अंमलबजावणी करावी. केंद्रीय श्रम मंत्रालयाने असंघटित क्षेत्रातील श्रमिकांचा दर ३५०रु. दैनिक निश्चित केला आहे. एकाच कामासाठी स्त्री, पुरुष कोणत्याही वयोगटातील व्यक्ती यांना समान वेतन देण्यात यावे असे समान वेतन कायद्यानुसार म्हटले आहे तरीही असंघटित क्षेत्रात वेतनात विषमता दिसून येते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या कामांसाठी वेगवेगळा वेतनाचा दर, हंगामाच्या काळात वेतन जास्त तर हंगामेतर काळात वेतन कमी असते. त्यात स्त्रिया आणि बालकांवरच अन्याय होतो.

**नवीन किमान वेतन विधेयक**

किमान वेतन अधिनियम १९४८, वेतन निश्चिती कायदा १९३६, बोनस निश्चिती कायदा १९६५, समान परिश्रमिक कायदा १९७६ हे चारही कायदे एकत्रित करून त्याऐवजी नवीन किमान वेतन विधेयक केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केले आहे. या विधेयकास पंतप्रधानांनी मंजुरी दिली आहे. या नवीन विधेयकानुसार प्रत्येक क्षेत्रात किमान वेतन निश्चित करण्याचा अधिकार केंद्र सरकारला प्राप्त होणार आहे. तसेच केंद्राच्या निर्णयाची राज्य सरकारला अंमलबजावणी करावी लागणार आहे. राज्य सरकार आपल्या अधिकारात किमान वेतनापेक्षा जास्त वेतन निश्चित करू शकते. सध्या या कायद्यानुसार सर्व क्षेत्रात किमान वेतन दरमहा १८,००० रु.निश्चित केले आहे. हे विधेयक स्त्री, पुरुष सर्वांना लागू आहे. मानवाच्या राहणीमानाचा दर्जा विचारात घेऊन हे विधेयक २०१७ मध्ये मंजूर करण्यात आले.

**महिला शेतमजूर होण्याची कारणे**

ग्रामीण भागात शेतीसारख्या असंघटित क्षेत्रात महिला मोठ्या संख्येने शेतमजूर म्हणून काम करीत आहेत. वास्तविक शेतीची कामे जास्त मेहनतीची, उन्हा-पावसात करावी लागणारी कष्टप्रद आहेत. शिवाय बरेच लांबवर त्यांना पायी जावे लागते तरीही महिला मोठ्या संख्येने शेतमजूर होतात यास पुढील महत्त्वाची कारणे जबाबदार आहेत.

**१) सहजासहजी मिळणारा रोजगार**

शेती क्षेत्रात काम करण्यासाठी अर्ज करावा लागत नाही, कुणाची शिफारस द्यावी लागत नाही, शिक्षण व प्रशिक्षणाची गरज नसते, तोंडी कुणीतरी सांगते आणि कामावर हजर व्हायचे, काम संपले की लगेच रोज मिळतो. अशारीतीने सहजासहजी रोजगार मिळत असल्यामुळे स्त्रिया शेतमजूर होतात.

**२) कुटुंबाला हातभार**

सध्याच्या किंमतवाढीच्या काळात व स्पर्धेच्या युगात कौटुंबिक खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. त्यामुळे काही स्त्रियांना असे वाटते की, शेजारच्या बाया शेतात कामाला जाऊन चार पैसे आणत आहेत तर आपणही घरी बसण्यापेक्षा त्यांच्यासोबत शेतात कामाला जावे तेवढाच पैसा कामी येऊन कुटुंबाला हातभार लागेल.

**३) पतीचे व्यसन**

अनेक शेतमजूर स्त्रियांचे पती व्यसनी असतात. त्यांचे घरात लक्ष नसते अशावेळेस त्या स्त्रिला उत्पन्न खर्चाचा मेळ कसा घालावा हा प्रश्न निर्माण होतो. घरखर्च चालविण्यासाठी, कुटुंबाच्या गरजा भागविण्यासाठी त्या स्त्रिया शेतात कामाला जाऊ लागतात.

**४) घटस्फोटीत किंवा विधवा स्त्री**

घटस्फोट झालेल्या किंवा विधवा स्त्रीला आपला व आपल्या मुलाबाळांचा खर्च भागविण्याची चिंता असते. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी तिच्यावर आलेली असते. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी शेती हे क्षेत्र केव्हाही रोजगार मिळणारे असल्यामुळे ते ती निवडते. शिवाय सोबतीला इतर स्त्रिया असल्यामुळे ते तिला सुरक्षित वाटते.

**५) एकत्र कुटुंब**

स्त्रियांना घराबाहेर पडताना महत्त्वाचा प्रश्न मुलांचे संगोपन व सांभाळ कसा होईल हा असतो. एकत्र कुटुंबात ती राहात असेल तर मुलांचा सांभाळ घरातील इतर सदस्य करू शकतात आणि ती शेतात कामाला जाऊन कुटुंबाला हातभार लावू शकते.

**शेतमजूर स्त्रियांच्या समस्या**

शेतमजूर स्त्रिया घरातील सर्व कामे करून, कुटुंबातील सदस्यांची काळजी घेऊन, पाहुण्यांचा आदर सत्कार करून, समाजातील रीतीरिवाज सांभाळून

शेतातील कष्टप्रद कामे करीत असतात. भारतीय कायद्यानुसार, जे जे कायदे श्रमिकांना लागू करण्यात आले ते स्त्रियांनाही लागू करण्यात आले आहेत. तरीही ते कायदे कागदोपत्रीच आहेत. त्याची अंमलबजावणी योग्य रीतीने होत नाही ही खेदाची बाब आहे. जास्त काम करूनही शेतमजूर स्त्रियांना वेतन कमी मिळते. शेतमजूर स्त्रियांना पुढील प्रमुख समस्यांमधून जावे लागते.

**१. वेतन/रोजगार कमी**

वर्तमानकालीन किंमतवाढ लक्षात घेता स्त्रियांना मिळणारे वेतन अतिशय कमी आहे. प्रत्यक्षात त्यांना मिळणारे वेतन आणि केंद्रीय श्रम मंत्रालयाने निश्चित केलेला वेतनदर यात बरीच तफावत आहे. साधारणपणे कामाचे स्वरूप पाहून दिवसाला त्यांना ७० रु. ते १०० रु. मिळतात आणि पुरुषांना स्त्रियांच्या दुप्पट १५० रु. ते २०० रु. रोज मिळतो. कामाचे स्वरूप एकच असले तरी स्त्री-पुरुषांच्या वेतनात फरक असतो.

**२. अपुरा रोजगार/कामाचे हंगामी स्वरूप**

शेतमजूर महिलांना वर्षातून फक्त काही महिने काम मिळते. रोज काम मिळेल ही त्यांना शाश्वती नसते. हंगामाच्या दिवसात काम मिळते तर हंगामेत्तर काळात काम मिळत नाही. तसेच काम चालू असताना पाऊस आला किंवा इतर यांत्रिक, तांत्रिक कारणामुळे त्यांची कामावरून सुटी केली जाते आाणि त्यांना फक्त अर्धा रोज दिला जातो. ७ व्या शेतमजूर चौकशी समितीच्या मते, शेतमजुरांना केवळ वर्षातून २२२ दिवस काम मिळते जिथे कोरडवाहू जमीन जास्त आहे तिथे वर्षातून ६ ते ७ महिने काम मिळते.

**३. कामाच्या ठिकाणचे असुरक्षित वातावरण**

शेतमजूर स्त्रियांना असुरक्षित वातावरणात काम करावे लागते. घरखर्च भागविण्यासाठी तिला कामाची गरज असते. तिच्या असाहाय्यतेचा फायदा अनेकवेळा मालकवर्ग आणि शेतात काम करणारे पुरुष शेतमजूर घेत असतात. एकटी दुकटी शेतात गाठून शेतमजूर महिलेवर किंवा मुलीवर बलात्कार झाल्याच्या अनेक घटना ऐकीवात आहे.

**४. कष्टप्रद काम**

शेतातील काम कष्टाचे असते. प्रचंड उन्हात आणि पावसात तासन्तास थांबून काम करावे लागते. दारिद्र्यामुळे शेतमजूर महिला अनेकवेळा आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष करून काम करीत असते. रोज जाईल म्हणून ती मासिक धर्मात, दिवस असताना किंवा बाळंतीण झाल्यावरही लगेच हे कष्टाचे काम करते. पण याचा तिच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो, अनेक आजारांना ती लवकर बळी पडते.

**५. असंघटितपणा व अज्ञान**

घटनेच्या बळावर श्रमिक वर्ग आपल्या मागण्या मान्य करून घेतात. पण स्त्री शेतमजूर या विखुरलेल्या असतात. त्यांच्या संघटना नसल्यामुळे त्या पुरेसे वेतन मिळावे, पुरुषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता मिळावी म्हणून चळवळी करीत नाहीत. त्यांची सौदाशक्ती कमी असल्यामुळे त्यांना वेतन कमी मिळते. तसेच त्यांच्या अशिक्षितपणामुळे, अज्ञानामुळे त्यांना कायद्यांबाबत आणि त्यांच्या अधिकारांबाबत जाण नसते.

**६. काम मिळण्यात स्पर्धा**

शेतीची कामे वर्षभर मिळत नाहीत. ज्यावेळेला शेतीची कामे कमी प्रमाणावर असतात त्यावेळेला काम मिळविण्यात शेतमजूर महिलांना चढाओढ करावी लागते आणि या परिस्थितीचा फायदा मालकवर्ग घेतो आणि शेतमजूर महिलांना कमी रोज स्वीकारावा लागतो.

**७. भविष्यकाळाची तरतूद नाही**

शेतमजूर महिलांना भविष्याची चिंता असते कारण त्या कामाला गेल्या तरच त्यांना रोज मिळतो आणि शेतीची कामे साधारणपणे त्या जास्तीत जास्त वयाच्या

पन्नाशीपर्यंत करू शकतात. नंतर शेतीच्या कामामुळे त्यांना अनेक दुखणी लागतात शिवाय वेतन कमी असल्यामुळे बचत करणे शक्य नसते.

**८. कौटुंबिक स्वास्थ्य**

कनिष्ठ उत्पन्न गटातील अनेक महिला पतीच्या व्यसनामुळे शेतात कामाला जात असतात. दिवसभर शेतातील कष्टाची कामे करून त्या घरी येतात आणि पती महाशय दारूसाठी टपलेले असतात, तिला मारझोड करून तिच्या मिळालेल्या रोजातील हिस्सा ते बळकावतात. अशारीतीने दिवसभर कष्ट करूनही तिला घरी स्वास्थ्य, विश्रांती मिळत नाही.

**९. अपत्य संगोपनाचा प्रश्न**

शेतमजूर महिलेला घरापासून बरेच लांबवर शेतात कामाला जावे लागते, मुलांचा सांभाळ करायला कुणी नाही पण दारिद्र्यामुळे कामाला जावे लागते. मुले दिवसभर कुठेतरी फिरत असतात आणि यातून काही कारणास्तव मुले दगावण्याची किंवा त्यांच्यावर योग्य संस्कार न होण्याची शक्यता असते.

**१०. भविष्य निर्वाहनिधी, विमा योजना, अपघात प्रसंगी मदत नाही**

शेतमजूर महिलांसाठी भविष्य निर्वाहनिधीच्या योजना, विम्याच्या योजना पुरविल्या जात नाही किंवा अपघात झाला तर मदत पुरविली जात नाही. एवढेच नाही तर शेतात कामाच्या वेळेला काही इजा झाली किंवा ॲलर्जी आली तर स्वतःच्या खर्चाने वैद्यकीय सेवा घ्यावी लागते.

**११. हीन दर्जा**

शेतमजूर महिलेला समाजात हीन दर्जा मिळतो. आर्थिक दर्जावर सामाजिक दर्जा अवलंबून असतो. शेतमजूर महिलेला मिळणारे वेतन कमी असल्यामुळे तिची दारिद्र्यातून सुटका नसते. ज्या शेतमजूर महिलेच्या कष्टावर सर्व जग जीवन जगत असते, सर्वांना अन्नधान्य मिळत असते त्या स्त्रीची समाजाकडून उपेक्षा केली जाते.

**१२. राहणीमानाचा निम्नदर्जा**

शेतमजूर महिलांना पुरेसे व निश्चित उत्पन्न मिळत नसल्यामुळे तिचा राहणीमानाचा दर्जा निम्न असतो. कष्टाची कामे करूनही सकस आहार तिला मिळत नाही, निवारा राहण्यायोग्य असतोच असे नाही, मातृप्रेमामुळे ती स्वतःकडे दुर्लक्ष करीत असते. स्वतःधान्य उत्पादित करून तिच्या घरात धान्याचा दाणा नसतो.

शेतमजूर महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी उपाय-शासनामार्फत संघटित व असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या वेतन निश्चितीसाठी, कामाच्या सुरक्षिततेसाठी अनेक कायदे करण्यात आले आहेत. समान वेतन कायद्यानुसार, एकाच कामासाठी स्त्री-पुरुषांना समान वेतन दिले जाईल, असे निश्चित करण्यात आले आहे; पण हे कायदे कागदावरच आहेत त्यांची अंमलबजावणी योग्य रीतीने होत नाही. स्त्री शेतमजुरांच्या समस्यांचे अध्ययन केले असता पुढील महत्त्वाचे उपाय अंमलात आणावे अशी अपेक्षा आहे.

**१. वेतन/मजुरीत वाढ करणेत यावी**

महिला शेतमजुरांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देण्यावे यावे तसेच समान वेतन कायद्यानुसार पुरुषांइतके वेतन त्यांना देण्यात यावे. कारण त्याही अंगमेहनतीची कामे करतात. नैसर्गिकदृष्ट्या पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांची प्रकृती नाजूक असते तरीही त्या कष्टाचा भार उचलत असतात हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी स्त्रियांच्या वेतनात वाढ करावी.

**२. किमान वेतन कायदा आणि समान वेतन कायद्याची कडक अंमलबजावणी-**

श्रमिकांना योग्य वेतन मिळावे. वेतनाच्या बाबतीत मालकाकडून त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून किमान वेतन कायदा, समान वेतन कायदा शासनाने केला. हा

कायदा शेतमजुरांनाही लागू करण्यात आला; पण या कायद्याची अंमलबजावणी योग्य रीतीने केली जात नाही. महिला शेतमजूर आणि पुरुष शेतमजुरांना कायद्यानुसार निश्‍चित केलेले वेतन मिळते की नाही, त्यांच्याकडून किती तास काम करून घेतले जाते याची तपासणी होणे आवश्यक आहे. महिला शेतमजुरांवर अन्याय करणाऱ्या मालकांवर किंवा संबंधित व्यक्तीवर कायदेशीररित्या कारवाई होणे आवश्यक आहे.

**३. महिला शेतमजुरांसाठी विशेष कायद्यांची अंमलबजावणी**

पुरुष शेतमजुरांच्या तुलनेने महिला शेतमजूर शेतीच्या विकासात महत्त्वाचे योगदान देत आहे, त्यामुळे सर्व जगाला अन्नधान्य मिळत आहे, शेती उत्पादनाची निर्यात होत आहे पण या महिला शेतमजुरांसाठी स्वतंत्र विशेष असा कोणताच कायदा करण्यात आला नाही. त्यांच्यासाठी विशेष कायदा करून त्यांच्या समस्या सोडविणे आवश्यक आहे.

**४.लघु उदयोग, कुटिरोद्योगाला चालना**

शेतीची कामे वर्षभर नसतात. बराच काळ महिला शेतमजूर घरी बसून असतात. त्या घरी असल्या की उत्पन्न नसते त्यामुळे घरखर्च कसा भागवावा हा प्रश्‍न त्यांच्या समोर असतो म्हणून शासनाकडून महिला शेतमजुरांना लघुउद्योग सुरू करण्यास मार्गदर्शन करण्यात यावे; तसेच कमी व्याजदराने कर्ज पुरवठा अनुदान पुरविण्यात यावे. घरच्या घरी त्या अनेक उद्योग शेतीशी संबंधित व इतर करू शकतात.

**५. मोफत आरोग्याच्या सोयी**

सरकारी दवाखान्यांमधून किंवा ग्रामीण रुग्णालयातून निम्न उत्पन्न असणाऱ्या लोकांना माफक दराने वैद्यकीय सेवा पुरविल्या जातात. पण सर्वच आजारांचे निदान या दवाखान्यातून होत नाही विशिष्ट आजारांसाठी खाजगी हॉस्पिटलमध्ये जावे लागते. खाजगी हॉस्पिटलमधून शेतमजूर महिलांना मोफत वैद्यकीय सेवा मिळाव्यात त्यासाठी शासनाने विशेष वैद्यकीय योजना शेतमजूर महिलांसाठी सुरू कराव्यात. शेतीच्या कामांचा परिणाम शेतमजूर महिलांच्या आरोग्यावर होत असतो म्हणून मोफत आरोग्याच्या सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

**६. कामाच्या ठिकाणच्या अपघाताचा, आजाराचा खर्च शेतमालकाने करावा**

कारखान्यात यंत्रावर काम करताना औद्योगिक कामगाराला काही इजा झाली तर सर्व वैद्यकीय खर्च व्यवस्थापक मंडळाला कायद्यानुसार करावा लागतो. त्याचप्रमाणे शेतमजूर महिलेला कामाच्या ठिकाणी काही इजा झाली किंवा खते, किटकनाशके, काही वनस्पती यांची ॲलर्जी आली तर सर्व वैद्यकीय खर्च आजार पूर्ण बरा होईपर्यंत शेतमालकाने करावा, अशी कायद्यात तरतूद करण्यात यावी.

**७. कामाचे ठिकाण लांब असल्यास भाडे मिळावे किंवा कामाच्या ठिकाणी पोहोचविण्याची व्यवस्था करणेत यावी**

कामाचे ठिकाण अनेकवेळा भरपूर लांब असल्यामुळे शेतमजूर महिलांना लांबपर्यंत पायी चालत जाऊन कष्टाचे काम करणे बरेच त्रासदायक असते. रोज मिळावा म्हणून त्या सहन करत असतात पण त्यांचे जास्तीचे चालण्याचे कष्ट वाचविले तर त्या जोमाने काम करू शकतात म्हणून कामाचे ठिकाण लांब असेल तर शेतमालकाकडून त्यांना येण्याजाण्याचे भाडे मिळावे किंवा त्यांना येण्याजाण्यासाठी वाहन व्यवस्था करण्यात यावी.

**८. कामाच्या ठिकाणची सुरक्षितता**

शेतमजूर महिलांवर शेतात वाईट प्रसंग होण्याची शक्यता असते. हे लक्षात घेऊन त्यांना सुरक्षित रीतीने शेतात काम करता यावे, त्यांच्यावर लैंगिक अत्याचार

होऊ नये अशी व्यवस्था करण्यात यावी. महिलांसाठी तसे कायदे करण्यात आले आहेत पण शेतमजूर महिला आपली बदनामी होऊ नये, आपल्याला घरात व समाजात त्रास होऊ नये म्हणून तक्रार करत नाही. महिला कायद्यामध्ये शेतमजूर महिलेचा स्वतंत्र उल्लेख करण्यात यावा.

**९. सामाजिक सुरक्षिततेच्या योजना**

सरकारकडून शासकीय-निमशासकीय कर्मचाऱ्यांना पेन्शन, भविष्य निर्वाहनिधी योजना, विमा योजना, अपघात झाल्यास नुकसान भरपाई अशा सामाजिक सुरक्षिततेच्या योजना पुरविल्या जातात. शेतमजूर महिलांसाठी अशा योजना नाहीत त्यामुळे त्यांच्यासमोर भविष्याची चिंता फार मोठी असते. शासनाकडून या योजना त्यांना पुरवून त्यांचा भविष्यकाळ सुरक्षित करण्यात यावा.

**१०. कमी दराने अन्नधान्य व उपभोग्य वस्तूंचा पुरवठा**

शेतमजुरांना शासकीय ग्राहक भांडारातून अत्यल्प दराने अन्नधान्य व उपभोग्य वस्तू पुरविण्यात याव्यात. जो शेतमजूर शेतात शारीरिक कष्ट करून अन्नधान्याची निर्मिती करतो त्याला पुरेसे अन्नधान्य मिळाले पाहिजे एवढेच नाही तर तो त्याचा हक्क असतो. म्हणून शेतमजुरांना अन्नधान्य कमी दराने पुरविण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती आहे. शेतीचा विकास झाला तरच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास होतो. शेतीचा विकास शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. त्याचप्रमाणे शेतीच्या विकासात शेतमजुरांचे योगदान फार मोठे आहे. शेतकरी आर्थिक भार उचलत असतो, शेतमजूर अंग मेहनत करतो. शेतमजुरांमध्ये पुरुष शेतमजुरांपेक्षा स्त्री शेतमजुरांचे योगदान जास्त महत्त्वाचे आहे. कारण शेतीची कामे पुरुषांच्या तुलनेने स्त्रिया मोठ्या प्रमाणावर करतात. स्त्रियांच्या समस्यांचा विचार करून वरील उपायांचा अवलंब केल्यास शेतमजूर महिला जोमाने काम करतील व त्यामुळे शेतीच्या उत्पादकतेत वाढ होण्यास मदत होईल.

**संदर्भसूची**


१. देसाई डॉ. स. श्री. मु., भालेराव डॉ. सौ. निर्मल, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे (२०११).

२. दै.जनशक्ती, २७ जुलै २०१७.

३. कविमंडन डॉ.विजय, कृषी अर्थशास्त्र, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर (२००२).

४. Agricultural Census 2017-18.

५. https//mpraubuni-muenchen.deMPR dt.2.2.2019.

६. https://www.downtoearth.org.in dt.3.2.2019.

७. www.censusindia.gov.in


▪

आर्थिक समता याचा अर्थ सर्वांना धनाची काटेकोरपणे सारखी वाटणी करणे
असा मी करत नाही. प्रत्येकाला त्याच्या किंवा तिच्या गरजेप्रमाणे मिळावे
इतकाच आर्थिक समतेचा साधा अर्थ होऊ शकेल.

**- महात्मा गांधी**

पुस्तक परिचय

# मागोवा-अर्थविचारांचा


## माधुरी ओंकार वर्तले †


**लेखिका : डॉ. मंजुषा मुसमाडे**
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख, नौरोसजी वाडिया, महाविद्यालय, पुणे)

ISBN : ९७८-८१-९२४९९७-३-४
प्रकाशन : शब्दश्री प्रकाशन
पृष्ट्ये : १८२


अर्थशास्त्राच्या चिकित्सक अभ्यासिका, विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका आणि अर्थशास्त्राचा वारसा असणाऱ्या डॉ.मंजुषा मुसमाडे यांनी 'मागोवा-अर्थविचारांचा' हे पुस्तक लिहिले आहे. यामध्ये अर्थविचारांच्या विषयमांडणीची सुसूत्रता येण्यासाठी प्राचीन काळ, स्वातंत्र्यपूर्वकाळातील राष्ट्रवादी विचार, स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय आर्थिक विचार, समकालीन पाश्चिमात्य आणि काही अमेरिकन विचारवंत अशा प्रकारे वर्गवारी दिसते. या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांना, संशोधकांना पडणारे नेहमीचे प्रश्न जसे की, भारतीय आर्थिक विचारवंत कोणकोणते होते? त्यांचे योगदान काय? भारतीय अर्थव्यवस्थेच्या जडणघडणीत त्यांची काय भूमिका होती? इ. प्रश्नांची सविस्तर माहिती या पुस्तकाच्या आधारे आपल्याला जाणून घेता येते.

विचारांच्या उत्क्रांतीवरच राष्ट्रोन्नती ठरत असते, अशा विचारांचे मंथन करून नवविचार निर्मिती राष्ट्रविकासासाठी फायदेशीर असते, या विचारधारेने प्रेरित होऊन डॉ. मुसमाडे यांनी 'मागोवा-अर्थविचारांचा' या पुस्तकाची निर्मिती केली आहे. अर्थशास्त्र हा विषय पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये लोकप्रिय मानला जातो. आपल्या देशात या विषयात विशेषीकरण आढळत नाही. मात्र विविध ग्रंथांमध्ये याचा उल्लेख वेगवेगळ्या स्वरूपात आला आहे. डॉ. मुसमाडे यांनी प्रस्तुत पुस्तकात अनेक प्राचीन ग्रंथांचा उदाहरणदाखल परिचय करून देत रसपूर्ण विचारमंथन केले आहे. विशेष म्हणजे या पुस्तकाला महाराष्ट्रातील ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. संतोष दास्ताने यांची प्रस्तावना लाभली आहे. त्यामुळे या पुस्तकाचे महत्त्व आणखी वाढले आहे.

**प्रस्तावना**

एकविसाव्या शतकात संगणकीकरण आणि जागतिकीकरण याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर नव्हे तर सर्वच क्षेत्रांत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष घडून आला आहे. या सर्व गोष्टीमागे कारणे अनेक असली तरी आर्थिक प्रश्नांना बगल देता येत नाही. यासाठी तज्ज्ञांनी मांडलेली मते, त्यांचे विचार आणि अंदाज महत्त्वाचे असतात. या सर्वांचा फायदा अनुचित घडणाऱ्या घटनांवर मात


† संशोधिका, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र.: १२०३ , भ्रमणध्वनी: ९४०५४३३७४४, ई-मेल: madhurivartale11@gmail.com

करू शकतात. अशाप्रकारच्या आर्थिक प्रश्नांची उकल करण्याची क्षमता विचारवंतांमध्ये असते; म्हणून आर्थिक विचारांच्या इतिहासाला अर्थशास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व आहे. विचारवंतांची निवड करणे हे एक आव्हानात्मक कार्य डॉ. मुसमाडे यांनी लीलया पेलले आहे. स्पष्ट व तटस्थपणे विचारमांडणी यात त्यांचा हातखंडा आहे. प्रस्तुत पुस्तकात अनेक प्रभावी अर्थतज्ज्ञांचा उल्लेख आला आहे. या पुस्तकात एकूण १३ विचारवंतांचा समावेश आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील आर्थिक विचारांची जडणघडण, सी.डी.देशमुख, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. धनंजयराव गाडगीळ, प्रा. सी.एन.वकील, प्रा. ब्रह्मानंद, डॉ. व्ही.के.आर.व्ही. राव, प्रा. शेनॉय, प्रो.माल्कम अडीशेषय्या, डॉ. अमर्त्य सेन, पॉलसॅमुल्सन, पॉल क्रुगमन असे काही नोबेल पारितोषिक विजेत्या अर्थतज्ज्ञांचा समावेश लेखिकेने एकत्रितपणे केला आहे. या पुस्तकात विचारवंतांची माहिती, कार्य, भूमिका असून डॉ. मुसमाडे यांनी स्वत:चे स्पष्ट व तटस्थ विचारही व्यक्त केले आहेत. प्रस्तुत पुस्तक परिचयात प्रकरणवार आढावा घेण्यात आला आहे. ग्रंथाच्या पहिल्या टप्प्यात स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय आर्थिक विचारवंतांची जडणघडण मांडली आहे. त्यानंतर लेखिका भारतीय विचारवंतांची मांदियाळी मांडते, तिसऱ्या टप्प्यात नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ व त्यांचे विचार सविस्तर विवेचन शब्दबद्ध करते.

पहिल्या प्रकरणात प्राचीन ऐतिहासिक अर्थशास्त्राचा उल्लेख कोणकोणत्या ग्रंथात येतो याची सविस्तर माहिती लेखिका देते. रामायण, महाभारत तसेच पौराणिक ग्रंथात अर्थशास्त्राचा उगम भारतात कोणाकोणामुळे विस्तारित होत गेला, याचे प्रमाणशीर पुरावे यात अभ्यासपूर्णरीतीने व्यक्त केले आहेत. त्यानंतर चार्वाकसंहिता तसेच त्याचा भौतिकवाद त्यातला अर्थभाग विस्तृत पद्धतीने लेखिकेने वर्णिला आहे. यामुळे पौराणिक अर्थशास्त्रात जाणून घेण्याचा आनंद वाचताना वाढत जातो. पौराणिक अर्थकारण आणि आधुनिक अर्थशास्त्र याची सुंदर सांगड हे प्रकरण करते. पौराणिक काळ आणि सद्यस्थिती यांचा मेळ त्यांनी आपल्या लेखनशैलीतून साध्य केला आहे.

दुसऱ्या प्रकरणात 'स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय आर्थिक विचारांची जडणघडण' लेखिकेने व्यक्त केली आहे. यात भारतीय विचारांचे आर्थिक विचार हे विखुरलेल्या अवस्थेत असल्याचे नमूद करत त्याला एकप्रकारच्या सुसूत्रतेत एकसंध बांधण्यात आले आहे. यामध्ये लेखिका अठराव्या, एकोणविसाव्या शतकातील म्हणजेच ब्रिटिशपूर्व व ब्रिटिश कालखंड समाविष्ट करते. लेखिकेने दिलेल्या संदर्भानुसार काही धर्मग्रंथात अर्थशास्त्राची पाळेमुळे दिसतात. अर्थशास्त्राचे जाणकारही गोष्ट पूर्णपणे जाणतात; ही गोष्ट लेखिका आवर्जून नमूद करते. भारतीय आर्थिक विचारवंतांच्या मांदियाळीत दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, रमेश चंद्र दत्त यांच्या समाजवाद विचारात गुंफलेले आर्थिक विचार हीच भारतातील आर्थिक परिस्थिती उघड करते. शेतीवर आधारित भारताचे अर्थकारण हा त्या काळातील किती महत्त्वाचा विषय होता; हे उपलब्ध पाठपुराव्यातून लेखिकेने मांडले आहे. जागतिक मंदीच्या काळातील परकीय आर्थिक विचारांची धडपड आणि भारतातील स्वातंत्र्यपूर्व परिस्थिती यांचा अभ्यास केला तर भारताचे मौद्रिक धोरणावर अभ्यास करणारे सी.एन.वकील व एस.के. मुरंजन यांचे विचार, त्याचबरोबर १९२६ मधील हिल्टन यंग यांची समिती, RBI ची स्थापना या महत्त्वपूर्ण घडामोडी होत्या. अशा अनेक गोष्टी पुस्तकाचे महत्त्व आपसूक सांगून जातात. त्याचाच एक प्रत्यय म्हणून १९७६ साली दादाभाई नौरोजींनी उत्पन्नाची सर्वप्रथम मांडलेली आकडेवारी, धनंजय गाडगीळ यांचे औद्योगिक विकासावरील विचार, जहांगीर कोयागी

यांचे संरक्षणसंबंधीचे विचार, तसेच तत्त्वज्ञानावर दिलेला भर याचे सविस्तर विवेचन हे चतुस्त्र व्यक्तिमत्त्व असणारे, रॅमेन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित डॉ.सी.डी.देशमुख यांचे विचार लेखिकेने विषद केले आहेत.

लेखिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिचय आंतरराष्ट्रीय विचारवंत, निर्भय पत्रकार, शिक्षणतज्ज्ञ, राजकीय नेता, अभ्यासू व दखलपात्र अर्थतज्ज्ञ आणि मानवतावादी विचारवंत असा करून देतात. ज्यांनी संपूर्ण भारताला समता व न्याय याचे महत्त्व राज्यघटनेच्या लिखाणातून पटवून दिले. आंबेडकरांनी जनता व भारत हे दोन्ही घडविले असा गौरवोल्लेख लेखिका करते. त्यांच्या जीवनातले महत्त्वाचे प्रसंग व जडणघडण, साहित्य, भाषणे, संघर्ष, राजकीय कारकीर्द व सामाजिक सुधारणा यांवर लेखिका प्रकाश टाकते. या प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कुशल अर्थविचारांचा मागोवा घेत असताना त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा भारताला स्वातंत्र्योत्तर जडणघडणीत मोलाची मदत झाल्याचे लेखिकेने उल्लेख केला आहे. लेखिकेने डॉ. आंबेडकरांची वैयक्तिक जडणघडण, वैचारिक प्रगल्भता यांवर सम्यक दृष्टीक्षेप टाकला आहे. त्यांच्या आर्थिक विचारांत मौद्रिक धोरण, वित्तीय संघराज्य आणि भारतीय शेतीमधून औद्योगिक अर्थव्यवस्थेचे स्थितंतर अशा अनुषंगाने भारताचा उदयोन्मुख आर्थिक विकास आधारलेला आहे. ही व्यापकता मोजक्या आणि नेमक्या शब्दांत सांगून भारताला अपेक्षित असणारी चिरंतन विकासाची वाटचाल आंबेडकरांच्या विचारांवर आधारित आहेत, असे लेखिकेने विशद केले आहे.

स्वतंत्र भारताच्या वाटचालीत डॉ. धनंजय गाडगीळ यांच्या मौलिक विचारांचा आढावा हा पाचव्या प्रकरणात लेखिकेने घेतला आहे. भारतातील औद्योगिकीकरणाचे चालना देणारे आग्रही नेते म्हणजे डॉ. धनंजयराव गाडगीळ असे लेखिका नमूद करते. भारताच्या आर्थिक विकासाचे चित्र गाडगीळ यांनी त्यांच्या कृतीतून उतरवले आहे. इतकेच नव्हे तर या विचारांचा साम्यवाद, दृढनिश्चय, निर्णयक्षमता, प्रत्यक्ष परिणाम करता, स्वप्न बघण्याचे नव्हे तर सत्यात उतविण्याची ताकद असणारे परखड विचारवंत म्हणून स्वतंत्र ओळख डॉ. मुसमाडे यांनी करून दिली आहे. विकेंद्रीकरणावरील त्यांचे विचार आपल्या देशातील आर्थिक परिस्थितीला अनुकूल होते. सहकारी लोकराज्याची संकल्पना आणि सामुदायिक बचतीचे बीज गाडगीळांच्या विचारांत होते. आर्थिक नियोजनात त्यांचा मोलाचा सहभाग अशा विविधांगी विचार पैलूंचा अभ्यास लेखिकेने व्यक्त केला आहे.

बॉम्बे स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे नामांकित व्याख्याते, अभ्यासू प्राध्यापक अशी ओळख असणारे आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषदेचे पहिले भारतीय अध्यक्ष असलेले प्रा. सी.एन. वकील यांचेही कृतिशील विचार या पुस्तकात सहाव्या प्रकरणात विस्तृत स्वरूपात सादर करण्यात आले आहेत. त्यांच्या विचारांचे योगदान अभ्यासताना भारतीय अर्थशास्त्र अभ्यासकांना गणिती तंत्रे आणि प्रारूपे वापरण्याची सुरुवात करून दिली. महात्मा गांधीजींच्या 'यंग इंडिया' वृत्तपत्रातून गरिबी हटविण्याचे मौलिक विचार मांडले. प्रा. वकील यांचा आंतरराष्ट्रीय व्यापार, विनिमय दर, किंमत पातळी, फाळणीचे परिणाम, नियोजन, वेतन, वस्तू-प्रतिमान यासंदर्भातील महत्त्वपूर्ण विचार सविस्तरपणे लेखिकेने मांडले आहेत. राष्ट्र उभारणीच्या काळात योजनाबद्ध विकास आणि भाववाढीबद्दलचे त्यांचे मार्गदर्शन देशाला धोरण प्रक्रियेत मोलाचे ठरले आहे, याचे सविस्तर वर्णन लेखिकेने केले आहे.

मानवी कल्याणाचा विचार मांडणाऱ्या अर्थतज्ज्ञांपैकी एक, राष्ट्रवाद, उच्च नैतिक मूल्ये, प्रामाणिकपणा आणि निर्भय स्वतंत्र न्याय्यबुद्धी अशा

गुणांनी परिपूर्ण व्यक्तित्व म्हणजे प्रा. सी.एन. वकील यांचे शिष्य प्रा. ब्रह्मानंद हे निर्भीड व अन्नसुरक्षा या विषयावर विचार मांडणारे पहिले अर्थतज्ज्ञ होत. प्रा. ब्रह्मानंद हे ठाम विचाराचे होते. त्यामुळे त्यांनी मांडलेला विचार हा राष्ट्रवाद आणि कल्याणकारी धोरण यावर आधारलेला होता. प्रा. ब्रह्मानंद यांच्यावर इटालियन अर्थतज्ज्ञ स्राफा यांचा प्रभाव आहे हे नवसनातनवादी अर्थतज्ज्ञांच्या यादीतील एक! त्यांच्या लिखाणाचा एक मानाचा बिंदू म्हणजे त्यांनी केलेले नोबेल पुरस्काराचे परीक्षण. या लिखाणात त्यांनी अर्थशास्त्रातील नोबेल पुरस्काराच्या पद्धतीतील त्रुटी दाखवून दिल्या आहेत. अशाप्रकारचे एक निर्भीड विचारवंत म्हणून अर्थतज्ज्ञांच्या माळेत त्यांना अढळस्थान असल्याचे लेखिकेने तंतोतंत हेरले आहे.

प्रा.डॉ. व्ही. के. आर. व्ही.राव हे वैचारिक समृद्धी लाभलेले एक आदर्श भारतीय अर्थतज्ज्ञ होत. प्रा. सी.एन. वकील यांचे विद्यार्थी असल्याने त्यांनी आव्हानात्मक विषयांवर संशोधन केले. 'राष्ट्रीय उत्पन्न' सारख्या क्लिष्ट विषय संशोधनासाठी घेतला.

इतकेच नव्हे तर Indian Council of Social Science Research आणि Agro Economic Units या संस्था स्थापण्यात त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. भारतीय अर्थव्यवस्थेला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांवर सांगोपांग चर्चा घडवून आणल्या. खेड्यांचा विकास, गरिबी, औद्योगिकीकरण आणि भांडवल निर्मिती, तुटीचा अर्थभरणा तसेच आदर्श अर्थव्यवस्था घडविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व घटकांविषयी वैचारिक बैठक तयार केली आहे, याचा प्रत्यय लेखिकेने या प्रकरणातून दिला आहे.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये एम. एस्सी. झालेले बिगर गणिती अर्थतज्ज्ञ प्रा. शेणोय होत. त्यांना भारताचे ॲडम स्मिथ म्हणूनही ओळखले जाते; असे लेखिका नमूद करते. प्रा. शेणोय हे भारताला विकसित करण्यासाठी नियोजन, साम्यवाद, समाजवाद, हस्तक्षेप यांवर सतत प्रकाश टाकत राहिले. प्रा. शेणोय यांनी तुटीच्या अर्थभरण्याने होणारे दुष्परिणाम उघडकीस आणले. अशा विविध पैलूंवर शेणोय यांचे विचार भारतीय अर्थव्यवस्थेसाठी उपयुक्त आणि स्वीकाहार्य आहेत, असे प्रतिपादन लेखिकेने केले आहे.

शिक्षणतज्ज्ञ माल्कम आदिशेषय्याहे मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू आणि चिरंतन विकासाचे मार्गदर्शक आहेत, याचा प्रत्यय लेखिकेने त्यांचा अर्थशास्त्राच्या भरीव कार्याचा आढावा घेवून व्यक्त केला आहे. आदिशेषय्या यांनी शिक्षणविषयक, आर्थिक विचारांविषयक, पर्यावरणविषयक, नैसर्गिकमूल्य घटकविषयक, नियोजनविषयक आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे चिरंतन विकास विषयक मौलिक विचार मांडले आहेत. भारतीय आर्थिक विचारवंतांमध्ये त्यांचे नाव आदराने घेतले जाते. अर्थशास्त्राच्या External Economics या शाखेच्या व्याप्तीत त्यांनी भरीव काम केले आहे. आदिशेषय्या यांचे मोलाचे योगदान लेखिकेने आपल्याला रसपूर्ण व अभ्यासू पद्धतीने व्यक्त केले आहे.

दहाव्या प्रकरणात लेखिकेने सहज सोप्या भाषेत बुद्धिवंत नोबेल पारितोषिकाने सन्मानित डॉ.अमर्त्य सेन यांच्याविषयी सविस्तर आणि बोलके लिखाण केले आहे. यात लेखिका नमूद करतात की, 'सेन यांच्या वैचारिक योगदानातून अर्थशास्त्र आणि विकसनशील अर्थव्यवस्था यांच्या अभ्यासाला एक वेगळा पैलू लाभला.' पुढे त्या असेही सांगतात की, गरिबी विषयक विचार-मंथन करण्याची नवी 'मानवतावादी अर्थशास्त्र' अशी शाखाच त्यांच्या योगदानामुळे निर्माण झाली. अशाप्रकारे लेखिकेने सेन यांच्या विचारांची शिदोरी वाचकांसमोर नेमक्या शब्दांत मांडून संशोधक व अभ्यासकांना एक नवी दिशा

निश्चितच मिळेल.

पॉल सॅमुल्सन हे अमेरिकन अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांना १९७० मध्ये नोबेल पुरस्कार मिळाले. सॅमुल्सन यांनी आर्थिक विश्लेषण, उपभोक्त्यांचा सिद्धांत, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि रोजगारविषयक विचार मांडले. त्यांनी मांडलेला अभिव्यक्त पसंती सिद्धांत ते महत्त्वपूर्ण अर्थमिती विवेचन केले आहे. अपेक्षित उपयोगिता या संकल्पनेवर अनेक दशके वैचारिक मंथन केले. लेखिकेने सॅमुल्सनच्या विचारांवर आंतरराष्ट्रीय व्यापाराचेही विचार समाविष्ट केले आहेत. लेखिकेने सॅमुल्सन्सच्या विचारातील विविधता आणि व्याप्त विचारांची व्यापकता इत्यादी योगदानाची परंपरा सांभाळण्याची समृद्धता सिद्ध केली आहे.

पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित असणारे जगदीश भगवती हे गुजरातचे आहेत. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र आणि विकासाच्या अर्थशास्त्राचे विवेचन त्यांनी त्यांच्या वैचारिक भूमिकेतून मांडले. जगदीश भगवती यांच्या विचारांविषयी लेखिकेने अत्यंत विचारपूर्वक आणि पुस्तकांचा समावेश केला आहे. कोणत्याही परराष्ट्रांबद्दल विचार प्रकट करतानाचा त्यांचा परखडपणा लेखिकेने वेळोवेळा नमूद केला आहे. त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये नकळत त्या सांगून जातात. डॉ. भगवती यांचे १९८८ साली Protectionism या नावाचे पुस्तक एक ना दोन, चक्क अकरा भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. यावरून त्यांच्या योगदानाची कल्पना येते. डॉ. भगवती यांच्या बुद्धिवंताचे स्थलांतर आणि खुल्या आर्थिक धोरणाचे फायदे खुलवून सांगण्याचे धाडस लेखिकेने केले आहे.

जोसेफ स्टीग्लीटझ यांच्या विचारांची मांडणी करताना लेखिकेने त्यांची पार्श्वभूमी सांगितली आहे. ते आर्थिक प्रश्नांवर अभ्यास करणारे राष्ट्रवादी अर्थतज्ज्ञ आहेत. त्यांनी अर्थशास्त्राला आंतरराष्ट्रीय पातळीवर जागतिकीकरणाच्या बाबतीत सैद्धांतिक योगदान दिले आहे. माहिती अर्थशास्त्र, झिरप सिद्धांत (Trickle Down Theory), जागतिकीकरण आणि त्याचे फायदे, IMF आणि जागतिक बँकविषयक विचारांचा समावेश यात आहे. लोकचळवळीचा आधार असलेली Occupy Wall Street ही विषमतेची चळवळ स्टीग्लीट्झच्या विचाराचा मूळाधार आहे, असे सुस्पष्ट मत लेखिका व्यक्त करते.

आर्थिक भूगोल आणि व्यापाराचा नवा सिद्धांत मांडणारे अर्थतज्ज्ञ म्हणून पॉल क्रुगमन हे नावाजले जातात. सन २००८ मध्ये त्यांना याविषयीच्या योगदानाबद्दल नोबेल पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. क्रुगमन यांनी अमेरिकन जनमाणसात स्वत:चे वैचारिक स्थान मिळविले आहे. लेखिकेने क्रुगमन यांच्या वैचारिक कीर्तीचा आढावा घेतला आहे. इतकेच नव्हे तर त्यांनी मांडलेल्या 'दिखाऊ आंतरराष्ट्रीयवाद' ही संकल्पनाही आपल्याला आपल्या भाषेत समजावून सांगितली आहे. स्पर्धात्मकता, आर्थिक मंदी, चलनाचे अवमूल्यन, परस्परावलंबित्व, निष्काळजी गणितीय चुका अशा मुद्द्यांची भर घालत लेखिका क्रुगमनचे आर्थिक विचारांचे भरीव काम सर्वांसमोर ठेवतात.

लेखिकेने पुस्तकाचा शेवट 'उपसंहार' या शीर्षकाखाली 'भारतीय अर्थव्यवस्था, तिची वैशिष्ट्ये आणि सद्यस्थिती' याचे प्रत्यक्ष दर्शन घडविले आहे. अर्थशास्त्रासारख्या सामाजिक अध्ययनाच्या विषयाला सुसूत्रता कशी असावी, हे या पुस्तकातून कळते. या पुस्तकात प्रामुख्याने जागतिक आर्थिक प्रश्नांची मांडणी केली आहे. त्यात राष्ट्रीय उत्पन्न, दारिद्र्य आणि आंतरराष्ट्रीय व्यापार इत्यादींचा विस्तृत वैचारिक आढावा आहे. प्रत्यक्ष विचारवंत केंद्रस्थानी ठेवला आहे, त्यामुळे विचारवंतांची परिस्थिती, विचारांची बैठक, आर्थिक

सिद्धांत यांची सरळपणे सुटसुटीत मांडणी दिसते. पुस्तक प्रथमतः ब्रिटिशकालीन अर्थव्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करते. त्यानंतर लेखिका आपल्याला प्राचीन अर्थतज्ज्ञांना समजून घेण्यास भाग पाडते. ते समजले की, भारतीय विचारवंतांचा इतिहास उलगडायला हळूहळू मदत करते. पुढे हळुवारपणे सैद्धांतिक मांडणीच्या कलाकडे आपण वळतो. त्यानंतर स्वतंत्र्यानंतरच्या काळात राजकीय, आर्थिक, परिस्थिती समजावत लेखिका नियोजनाचे अर्थशास्त्र नकळत शिकवते. आपण एकाहून एक असे सरस असलेले आर्थिक विचारवंत समजून घेण्याचा प्रयत्न करतो. भारतीय विचारवंतांचे विचार समजावून सांगत सांगत लेखिका आपल्याला अलगद आंतरराष्ट्रीय आर्थिक विचारवंतांच्या प्रवासात कधी गुंतवते ते कळतही नाही. विचारवंतांचा अभ्यास आर्थिक प्रश्न, आणि त्यांची सोडवणूक यासाठी महत्त्वपूर्ण असतो हे जाणून घेण्यासाठी हे पुस्तक जरूर वाचायला हवे. संक्रमण अवस्थेत असलेल्या जागतिकी आणि संगणिकी युगात दुर्लक्षित असलेले आर्थिक-सामाजिक प्रश्न नव्याने मांडण्याची गरज सांगितली आहे.

**समारोप**

नव्याने अर्थशास्त्राचा अभ्यास करणारे विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक यांनी हे पुस्तक संदर्भ पुस्तक म्हणून वापरले पाहिजे असेच आहे. पुस्तकाच्या शेवटी दिलेली संदर्भसूची डॉ. मुसमाडे यांची सखोल अभ्यास पद्धती दर्शविते. या पुस्तकातून एक तटस्थ मांडणी समोर येते. हे पुस्तक अर्थशास्त्र समजावून सांगण्याची कला व आपल्याला चालू परिस्थितीचे सदैव भान किंबहुना जाणीव करून देण्यास मदत करते. असे असले तरीही, भारताच्या मौद्रिक धोरणात महत्त्वपूर्ण भूमिका असणारे बी.एन.आडारकर, आय.जी.पटेल, डॉ. मनमोहन सिंग, सी. रंगराजन, विमल जालन, रघुराम राजन आणि ऊर्जित पटेल अर्थतज्ज्ञांचा उल्लेख या पुस्तकात असायला हवा होता. याबरोबरच भारतातील इशर जज्ज अहलुवालिया, ईला पटनाईक, इंदिरा रामाराजन या महिला अर्थतज्ज्ञांचा समावेश झाला असता तर पुस्तक अधिक परिपूर्ण झाले असते.

बदलत्या काळानुसार अर्थशास्त्रात अनेक शाखांची भर पडत आहे. तरीही 'भारतीय आर्थिक विचारवंतांचा अभ्यास' हा विषय जेव्हा जेव्हा समोर येईल तेव्हा-तेव्हा 'मागोवा-अर्थविचारांचा' या पुस्तकाचा संदर्भ अभ्यासक, विद्यार्थी संशोधकांसाठी महत्त्वपूर्ण ठरेल, यात तीळमात्रही शंका नाही. आजच्या काळात विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राची गोडी निर्माण करण्यासाठी हे संदर्भ पुस्तक अतिशय उपयुक्त आहे, असेच म्हणावे लागेल.

■

---

भारत हा शहरात नसून खेडेगावात आहे

**- महात्मा गांधी**

---

अर्थ शब्दांची वाट पाहे...

# मराठी अर्थशास्त्र परिभाषेचे आर्त (भाष्य)

**शि. ना. माने** †

‘आर्त’ या ज्ञानदेवांच्या एका ओवीतील शब्दाचे पुढील निरनिराळे अर्थ आहेत. आक्रोश, साकडे व प्रबळ इच्छा. त्यांपैकी सदरच्या टिपणाच्या शीर्षकाला कोणता अर्थ जास्त लागू पडतो ते बघूच. त्यापूर्वी सर्वसाधारण मराठीत रूढ झालेल्या भाषाविज्ञानाच्या प्रमुख प्रवाहांचा ओझरता उल्लेख करू आणि नंतर मराठी अर्थशास्त्र परिभाषेच्या आर्ताकडे वळू.

मराठी भाषा वैज्ञानिकांच्या दृष्टिकोनातून पुढील प्रमुख तीन प्रवाह आहेत. तत्पूर्वी परिभाषा म्हणजे भाषेचा शास्त्रीय स्वरूपाचा उपयोग ही व्याख्या ध्यानात ठेवू. अस्मितावादी, भाषाशुद्धीकरणवादी आणि उपयोगितावादी (प्रतिमावादी) हे ते तीन प्रवाह आहेत. परिभाषेवर व विशेषत: अर्थशास्त्र परिभाषेवर या प्रवाहांचे कमी-जास्त प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. अस्मितावादी मराठी फलकांविषयी जास्त आक्रमक होतात. रूप व आकार (Form) यांवर त्यांची भिस्त असते. ‘Deshi Wine Shop’ ऐवजी ‘देशी दारूचे दुकान’ यावर ते खूश. दुकानातील विदेशी मद्यांकडे त्यांचे क्वचितच लक्ष जाते. भाषेविषयीचा त्यांचा दृष्टिकोन निव्वळ आकारिक व पोशाखी (Formal) नव्हे काय? वरून कीर्तन व आतून तमाशा. असा सारा प्रकार. भाषाशुद्धीकरणवादी नावाप्रमाणेच भाषेच्या सोवळेपणाला जरा जास्तच जपतात. त्यांना परभाषेच्या आक्रमणाची चिंता वाटते. बी.टी. कॉटनचा (Latin Bacillus Thuringiensis, English – soil – dwelling toxin or poison that is harmful to insects but harmless to humans) अल्पाक्षरयुक्त, सोवळा मराठी पर्याय घडविण्यात जरूर अडसर आहेत. म्हणून बी.टी.प्रजातीचा विचारच सोडून द्यावयाचा? उपयोगितावादी नावाप्रमाणेच शब्दाचा अर्थ तेवढा (रसनातृप्ती किंवा उपयोगिता) घेतात व शब्द फेकून देतात. ज्वारीच्या उपयोगितेच्या पलीकडील पोषक मूल्य (Nutrient value) त्यांच्या ध्यानी-मनी नसते. शब्द संस्कृतीचे वाहक असतात असे सर्वश्री प्र. ना. परांजपे, अशोक केळकर, गणेश देवी, एस. नागराजन, आदी भाषा वैज्ञानिक सांगतात. उपयोगितावाद्यांना त्यांचे देणे-घेणे नसते. पाण्याच्या तुलनेत जलधर खडक (Aqifer, water-bearing rock) त्यांना दुय्यम वाटतो. पाणी वापरासाठी असते. परिणाम? पाणीबाणीचे संकट. आज प्रतिमावादी अशी त्यांची ओळख आहे. जलधर खडक संस्कृतिविषयी ते उदासीन असतात. त्याचा जास्त खुलासा पुढे योग्य ठिकाणी केला आहे.

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा. आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

मराठी अर्थशास्त्र परिभाषा समृद्धी ही एक बिकट वाट, वहिवाट आहे. ती विनासायास सिद्ध होणे नाही. सुपीक जमिनीप्रमाणे ती वहिवाटीत यावी लागते. शब्द, संज्ञा रूढ कराव्या लागतात. चलनाप्रमाणे त्यांचे निरंतरपणे परिचलन (Circulation) अपरिहार्य असते. आज आपणाकडून अपेक्षेप्रमाणे तसे घडत नाही.

एका बाजूला ही उदासीनता तर दुसऱ्या बाजूला २१ व्या शतकातील इंटरनेट-मोबाईल यांचा परिभाषेवरील वाढता प्रभाव. परिणामी मराठी अर्थशास्त्र परिभाषेचा अनुशेष (Back-log) निर्माण होत आहे. आणि आजची 'अंगठेछाप' (Mobilegeek) पिढी त्या अनुशेषात भर टाकत आहे आणि हे नमूद करताना खेद होतो.

सुरुवातीला उल्लेख केलेल्या व आताच कबूल केल्याप्रमाणे उपयोगितावादी किंवा प्रतिमावादी प्रवाहाला आज 'इमोजी' (लोकसत्ता, १९ मे, २०१८) या आधुनिक उपाधीने ओळखले जाते. ती प्रत्यक्षाला (संज्ञेला) दुय्यम व प्रतिमेला सरस लेखते. 'निजबिंबी एकवटले। प्रतिबिंब जैसे।।' (बिंबात प्रतिबिंब एकवटणे) ला ती नाकारते. प्रतिबिंब (प्रतिमा) नेहमीच बिंबापेक्षा (प्रत्यक्षापेक्षा) उजवे भासते. त्याचप्रमाणे संज्ञा व संस्कृती यांच्यामध्ये 'इमोजी' चा उठ-बस वावर वाढल्यामुळे संज्ञा व संस्कृती यांचा संबंध तुटतो. संज्ञा केवळ अर्थासाठी उरते. तिचा अन्वयार्थ दुर्लक्षित राहतो. ज्ञानदेव म्हणतात त्या कोरड्या संज्ञेच्या किंवा शब्दाच्या पलीकडील त्याची व्याप्ती अनुभविता ('.... शब्दाची व्याप्ति तेणें पाडें। अनुभवावी।।') येत नाही. नव्या संकल्पना गोठतात. भाषा कुंडीतील वनस्पतीप्रमाणे (Bonsai) खुरटते.

स्पष्टीकरणासाठी 'ज्या गावच्या बाभळी, त्याच गावच्या बोरी' या वाक्प्रचाराचा विचार करू. बाभळी व बोरी वृक्षांच्या वाच्यार्थापलीकडे गावगाड्यातील लोककारण दडलेले असते. दादासाहेबांची गल्ली विरुद्ध बाबासाहेबांची गल्ली. दोन्हीकडील लोक सारखेच. भानगडबाज, इर्षेबाज व 'सांगे वडिलांची कीर्ति' छापाचे. विशेष म्हणजे दोन्ही लोकसमूहांना एकमेकांची गुपिते चांगलीच माहीत. अगदी बाभळींना बोरींची बोरींना बाभळींची प्रमाणे. लोककरणातील हे पैलू एका वाक्प्रचारात व्यक्त होतात. प्रसंगी संघर्ष तर लगेच एकोपा. हीच त्यांची रहाटी. ज्ञानदेव सांगतात ती शब्दापलीकडील त्याची व्याप्ती अशी आहे.

टिपणाला पूर्ण विराम देण्यापूर्वी दोन शब्द. परिभाषा हे एक स्वतंत्र शास्त्र आहे. म्हणून ते प्रयोगसिद्ध व अभ्यासनीय आहे. परत ज्ञानदेव सांगतात, ''... कर्माचे डोळे ज्ञान। ते निर्दोष होतावे।।'' त्याप्रमाणे आपण आपले अर्थशास्त्र परिभाषेचे (अप) कर्माचे डोळे जे ज्ञान ते घासून-पुसून निर्दोष म्हणजे कालसापेक्ष ठेवू या. त्या अपचा हा जसा आक्रोश (आर्त) आहे. तशीच त्याची ही प्रबळ इच्छा (आर्त) देखील आहे.

■

---

गोरगरिबांना दारिद्र्याच्या खाईतून बाहेर काढून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा मार्ग म्हणजे सूत-कताई.

**- महात्मा गांधी**

---

# क्रोनी कॅपिटलिझम = भावकीची भांडवलशाही

## जे. एफ. पाटील †

### १. क्रोनी कॅपिटलिझम = भावकीची भांडवलशाही

Crony Capitalism ही अलीकडे मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी शब्दरचना आहे. भांडवल प्रधान उत्पादन घटक मानणारी अर्थव्यवस्था म्हणजे भांडवशाही (Capitalism). ज्या समाजव्यवस्थेत खाजगी मालमत्तेचे हक्क, वारसा हक्क व करार स्वातंत्र्य असते व बाजार खुला मुक्त असतो (उपभोग, उत्पादन, बचत स्वातंत्र्य) ती अर्थव्यवस्था भांडवलशाही (Capitalism) मानण्याची परंपरा आहे.

विसाव्या शतकाच्या दुसऱ्या अर्धामध्ये व विशेषत: एकविसाव्या शतकात सत्ताधारी व भांडवलदार यांच्या जवळीकेमुळे, विशेषत: नातेसंबंध व स्नेहसंबंध यातून आर्थिक व्यवस्थापन (भांडवलाचा वापर, करदेयता किमानीकरण, मत्ता-मालकीचे आभासी विकेंद्रीकरण इ.) अधिक किफायतशीर करण्यासाठी ज्या अनेक आर्थिक संस्थांची प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, उघड वा प्रच्छन्न साखळी तयार होते, त्या व्यवस्थेला क्रोनी कॅपिटॅलिझम, म्हणजे मराठीत 'भावकीची भांडवलशाही' असा शब्दप्रयोग करता येईल. भांडवलशाहीची ही भावकी राजकीय व आर्थिक हितसंबंधांच्या गुंतागुंतीतून तयार होते.

### 2) Leisure Class - खुशालचेंडू वर्ग :

थॉर्नस्टीन व्हेब्लेन यांनी अमेरिकन संपन्न भांडवलदार वर्गाच्या जीवन शैलीतून निर्माण होणाऱ्या आर्थिक प्रभाव रचना व उपभोग वैशिष्ट्ये व विचित्रपणा यांचे वर्णन, विवेचन करणाऱ्या आपल्या प्रसिद्ध ग्रंथाला "The Economics of Leisure Class" असे नाव दिले. Leisure म्हणजे ज्या वेळेत काम करण्याची आवश्यकता नाही अशी वेळ. साध्या शब्दात मोकळा वेळ. अर्थात बेरोजगाराचा मोकळा वेळ, नाइलाजाचा मोकळा वेळ असतो. पण श्रीमंतांचा, भांडवलदारांचा मोकळा वेळ, काम करण्याची गरज, आवश्यकता, अपरिहार्यता नसण्यातून निर्माण होतो. हा सगळा खंडदार वर्ग असतो.

श्रीमंताच्या भांडवली, आर्थिक संचित क्षमतेमुळे विनार्जित उत्पन्नाचा मोठा ओघ निर्माण होतो. वेळेचा वापर उत्पादक कामासाठी करण्याची आवश्यकता नसल्यामुळे अशा वर्गातील लोकांच्या उपभोग रचनेत एक प्रकारचे नाविण्य तथा वैचित्र्य सतत निर्माण होत राहते. जुगार अड्डे, सौंदर्य स्पर्धा, वेलिंग, पंचतारांकित हॉटेल्स, चैनीचा प्रवास, वाहनांचे विचित्र महागडे प्रकार, कपड्याच्या फॅशन्स, महागडी इलेक्ट्रॉनिक उपकरणे, अनावश्यक दाग-दागिने, करमणुकीचे ओंगळ प्रकार ही या कार्यमुक्त समाजाची लक्षणे असतात. प्रदर्शनी, अतिरिक्त, अनाकलनीय उपभोग खर्च ही त्याची अभिव्यक्ती असते. म्हणूनच अशा समाजाचं चित्रात्मक वर्णन करण्यासाठी 'खुशाल चेंडू वर्ग' हा शब्दप्रयोग बरोबर वाटतो. *(**टीप** : यापूर्वी अर्थसंवादच्या जुलै-सप्टेंबर २०१७ च्या (खंड ४१, अंक २, पृष्ठ १८४) अंकात याच शब्दाचा शि. ना. माने यांनी त्यांना अभिप्रेत असलेला (क्रोनी कॅपिटलिझम - पारिवारिक भांडवलशाही) असा अर्थ दिलेला आहे याची वाचकांनी नोंद घ्यावी.* ◆

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२, ई-मेल : jfpatil@rediffmail.com

# डॉ. सुधा मोकाशी उपक्रमांतर्गत विशेष व्याख्यान

## अहवाल

मराठी अर्थशास्त्र परिषद व अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे, न्यू आर्टस कॉमर्स अॅण्ड सायन्स महाविद्यालय, अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी डॉ. सुधा मोकाशी उपक्रमांतर्गत 'जल साक्षरता व मत्स्य व्यवसाय' या विषयावर मा. पोपटराव पवार, सरपंच हिवरे बाजार यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे, उपप्राचार्य व विभाग प्रमुख प्राध्यापक, आर. जी. कोल्हे, महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

आज जगातील जवळपास १०० देश पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करीत आहेत. भविष्यात मानवाने समुद्राला बरोबर घेतले नाही तर पाणी प्रश्न कधीच सुटणार नाही. मात्र यासाठी प्रत्येकाने पाणी आणि पाण्याचे अर्थशास्त्र समजून घेतले पाहिजे असे मत आदर्श ग्रामसमिती महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष व हिवरे बाजारचे सरपंच मा. पोपटराव पवार यांनी न्यू आर्टस् महाविद्यालयात मराठी अर्थशास्त्र परिषद व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या डॉ. सुधा मोकाशी उपक्रमांतर्गत जल साक्षरता व मत्स्य व्यवसाय' या विषयावरील विशेष व्याख्यानाप्रसंगी मत व्यक्त केले. या विशेष व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव मा. श्री. जी.डी. खानदेशे होते.

या प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष मा. रामचंद्रजी दरे साहेब, विश्वस्त मा. सितारामजी खिलारी, माजी प्राचार्य के. एच. शितोळे व मराठी अर्थशास्त्र परिषदेचे स्थानिक कार्यवाह डॉ. आर. बी, भांडवलकर, परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. रामचंद्र रसाळ, कार्यकारणीचे सदस्य डॉ. माधवराव शिंदे, सारडा कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. आर. वाय. शिंदे, अर्थशास्त्र अभ्यासमंडळाचे सदस्य डॉ. संभाजी काळे, प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे, उपप्राचार्य व विभागप्रमुख प्रा.आर. जी. कोल्हे, महाविद्यालयातील प्राध्यापक हे मान्यवर उपस्थित होते.

सध्या माणसे श्रीमंत होण्याच्या नादात नैसर्गिक साधन सामुग्रीकडे दुर्लक्ष करीत आहेत तसेच अन्न, पाणी, चारा अशा सर्व सेवा घरपोच मिळाल्या पाहिजेत अशा अपेक्षा करीत आहेत. सरकारच्या काही फुकटच्या योजनांमुळे समाज पंगू बनत चालला आहे आणि हे सर्व पुढील पिढीला घातक ठरणार आहे. त्यामुळे आजच्या तरुणाईने फेसबुक, वॉट्सअप, मोबाईलचा वापर जलसाक्षरतेसाठी केला तर ते एक सर्वोतम कार्य ठरेल असे मत मा. पोपटराव पवार यांनी यावेळी व्यक्त केले.

अलीकडील काळात पाणी हा अतिशय भावनिक विषय बनल्यामुळे पाण्याबाबत होणारा अन्याय ही भावना कमालीची स्फोटक बनली आहे कारण इसिसने इराक मधील प्रमुख धरणांचा ताबा घेऊन इतर शस्त्रांपेक्षा पाणी हे प्रभावी अस्त्र असल्याचे दाखवून दिले आहे. इराकप्रमाणेच इजिप्त, इस्त्राइल या देशातील संघर्षात पाणी हे अस्त्र वापरले गेले आहे असे विचार मा. जी. डी. खानदेशे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यक्त केले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याची व वर्षभरात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध उपकमांची, पुस्तक प्रकाशनाची व गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांची माहिती यावेळी प्रमुख पाहूणे या नात्याने परिषदेचे कार्यवाह मा. डॉ. आर.बी.

भांडवलकर यांनी दिली. महाविद्यालयाने मराठी अर्थशास्त्र परिषदेतंर्गत विशेष व्याख्यान आयोजित करून मा. पोपटराव पवार यांचे विचार ऐकण्याची संधी विद्यार्थी व आपणा सर्वांना उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी स्वतः परिषदेच्या वतीने महाविद्यालयाचे मनापासून अभिनंदन करतो व आभारही मानतो.

महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या उपक्रमाबाबतची सविस्तर माहिती व व्याख्यान, आयोजनाचा हेतू तसेच मान्यवरांचे स्वागत महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. आर. जी. कोल्हे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. बी. पी. ठाकूर व मान्यवरांचे आभारप्रदर्शन डॉ. बी. डी. उंदरे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. एस. एम. वाघमारे, प्रा. काळे एस.व्ही., डॉ. खोसे पी. एन. व विभागातील विद्यार्थी यांनी कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमास विविध विषयांचे विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. ■


## 'अर्थसंवाद' या त्रैमासिकाच्या स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन

### (फॉर्म ४, नियम ८ नुसार)

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा/आर. बी. भांडवलकर गजानननगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ |
| २. | नियतकाल | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रकाचे नाव | : | आर. बी. भांडवलकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | गजानननगर, पिंपळगाव रोड, यवतमाळ - ४४५ ००१ |
| ४. | मुद्रण स्थळ | : | भारती मुद्रणालय, ८३२ ई, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर ४१६ ००१ फोन : (०२३१) २६५४३२९ |
| ५. | प्रकाशकाचे नाव | : | बाब क्र. ३ प्रमाणे |
| ६. | संपादकाचे नाव | : | राहुल शंकरराव म्होपरे |
| ७. | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | विद्यापीठ क्वार्टर्स, डी ३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर, पिन : ४१६ ००४ |
| ८. | मालकाचे नाव | : | मराठी अर्थशास्त्र परिषद, द्वारा : सेंटर फॉर दी स्टडी ऑफ सोशल चेन्ज, एम.एन. रॉय ह्यूमन डेव्हलपमेन्ट कॅम्पस, प्लॉट क्र. ६, एफ् ब्लॉक, कार्डिनल ग्रेशियस स्कूलजवळ, सरकारी वसाहत इमारत क्र. ३२३ समोर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१ |

मी आर. बी. भांडवलकर असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती आणि समजुतीनुसार खरा आहे.

**आर. बी. भांडवलकर**
मुद्रक व प्रकाशक

# अर्थसंवाद
# (खंड ४२, २०१८-१९)

## अ) लेख सूची


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | संपादकीय | ३-४ |
| २. | मंदीमुक्त भांडवलशाही असू शकेल का? | ५-१२ |
| ३. | मानव कल्याण का राजकीय सत्ता / मत्ता? | १३-३२ |
| ४. | शेती विकासाचे दोन उपाय-आधार किंमती व घटक अनुदान | ३३-३९ |
| ५. | भारतातील बँकींग उद्योग व बॅसल आव्हाने | ४०-५३ |
| ६. | दुसऱ्या हरितक्रांतीच्या उंबरठ्यावर भारतीय शेतकऱ्यांचा आक्रोश | ५४-६० |
| ७. | सर्वेऽपि सुखिनः सन्तु की सधनः सन्तु? | ६१-७० |
| ८. | अर्थशास्त्रातील संशोधनपर लेखन : काही पथ्ये | ७१-८८ |
| ९. | महाराष्ट्राच्या शेतीचे अर्थशास्त्र | ८९-१०४ |
| १०. | सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपुढील आर्थिक संकट : खासगीकरणाची चर्चा ! | १०५-११० |
| ११. | ग्रंथ परिक्षण : प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स | १११-११५ |
| १२. | अर्थ शब्दांची वाट पाहे : डिझास्टर मायोपिआ | ११६ |
| १३. | वित्तीय निराकरण आणि ठेव विमा (FRDI) विधेयक वाद प्रश्न आणि ध्वनितार्थ | १२१-१२४ |
| १४. | ई-बँकिंग सेवांमधील ग्राहक समाधान मापनासाठी इ-बँकक्वॉल साधन | १२५-१३५ |
| १५. | नगदरहित अर्थव्यवहार : वास्तव समजून घेण्याची गरज... | १३६-१४१ |
| १६. | भारताची लोकसंख्या आणि विकासातील निवडक प्रवाह | १४२-१४८ |
| १७. | डॉ. बी.आर.आंबेडकरांचे जलधोरण | १४९-१५८ |
| १८. | कृषिप्रधान भारतातील शेतकरी आत्महत्या : एक शोकांतिका | १५९-१६६ |
| १९. | महात्मा गांधींचे अर्थशास्त्र : एक अन्वयार्थ | १६७-१७५ |
| २०. | मानव विकास निर्देशांक : कोल्हापूर शहरातील बांधकाम कामगारांचा एक अभ्यास | १७६-१८४ |
| २१. | पुस्तक परिचय : अ वर्ल्ड ऑफ थ्री झीरोज | १८५-१८९ |
| २२. | अर्थ शब्दांची वाट पाहे : नज, डेटाबँक | १९०-१९२ |
| २३. | अर्थ शब्दांची वाट पाहे : मनी लाँड्रींग, वेस्टेज, मॅन्यूफॅक्चरिंग | १९३-१९४ |
| २४. | प्रतिक्रिया | १९५-१९६ |
| २५. | मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व अध्यक्षीय भाषणे | १९७-१९८ |
| २६. | मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध उपक्रम २०१७-१८ | १९९ |

| | | |
|---|---|---|
| २७. | अर्थशास्त्र नोबेल २०१८- एक चिकित्सक दृष्टीक्षेप | २०३-२११ |
| २८. | भारतातील वस्तू आणि सेवा कर : एक बहुआयामी विश्लेषण | २१२-२२० |
| २९. | महाराष्ट्रातील सूक्ष्म सिंचन योजनेंतर्गत क्षेत्राचा आढावा व सद्य:स्थिती | २२१-२३४ |
| ३०. | सौरशेतीची भारतातील प्रगती व भविष्यकाळ | २३५-२४८ |
| ३१. | महाराष्ट्रातील मानव विकासाचा सापेक्ष स्तर | २४९-२५५ |
| ३२. | हवामान बदल आणि शेतीचा चिरस्थायी विकास | २५६-२६३ |
| ३३. | भारताच्या विकास प्रक्रियेतील समावेशनाचे वास्तव | २६४-२८० |
| ३४. | जलयुक्त शिवार अभियान- एक जन चळवळ | २८१-२८८ |
| ३५. | उपासमारीसाठी सार्वजनिक कृती - अमर्त्य सेन | २८९-२९४ |
| ३६. | राष्ट्रीय उत्पन्न वृद्धीदर- आकडेवारचा खेळ (खंडोबा) | २९५-२९७ |
| ३७. | अर्थ शब्दांची वाट पाहे : डीरिझर्वेशन | २९८-२९९ |
| ३९. | कार्यवाह अहवाल | ३०० |
| ४०. | सेवा क्षेत्र आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ | ३०६-३१६ |
| ४१. | महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या; २००१-२०१८: मराठवाडा आणि विदर्भातील आत्महत्यांचे जिल्हानिहाय संख्यात्म, स्थलवास्तव, नियोजन व संकल्पनात्मक परिप्रेक्ष्य विश्लेषण | ३२७-३५२ |
| ४२. | पाण्याचे दर व मूल्य | ३५३-३५५ |
| ४३. | कृषी खर्च आणि मूल्य आयोगाच्या किंमत धोरणाची चिकित्सा | ३५६-३६३ |
| ४४. | गुड एम्प्लॉईज लिव बॅड मॅनेजर, नॉट कंपनी | ३६४-३६९ |
| ४५. | भारतीय रुपयाचा इतिहास व त्याच्या अवमूल्यनाने बदललेली अर्थव्यवस्था | ३७०-३७६ |
| ४६. | ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील स्त्री शेतमजुरांचे योगदान व त्यांच्या समस्या- एक अध्ययन | ३७७-३८६ |
| ४७. | पुस्तक परिचय - मागोवा अर्थविचारांचा | ३८७-३९२ |
| ४८. | अर्थ शब्दांची वाट पाहे - मराठी अर्थशास्त्र परिभाषेचे आर्त (भाष्य) | ३९३-३९४ |
| ४९. | अर्थ शब्दांची वाट पाहे - क्रोनी कॅपिटलिझम = भावकीची भांडवलशाही | ३९५ |
| ५०. | डॉ. सुधा मोकाशी उपक्रमातंर्गत विशेष व्याख्यान अहवाल | ३९६ |


भारत अत्यंत गरीब लोकांमध्ये रहात असलेला श्रीमंत देश आहे.

**- मनमोहन सिंग**

# अर्थसंवाद
# (खंड ४२, २०१८-१९)

**ब) लेखक सूची**


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | राहुल शं. म्होपरे | ३-४ |
| २. | श्रीनिवास खांदेवाले | ५-२२ |
| ३. | जे. एफ. पाटील | २३-३२ |
| ४. | अनिल पडोशी | ३३-३९ |
| ५. | संतोष दास्ताने | ४०-५३ |
| ६. | एम. एन. शिंदे | ५४-६० |
| ७. | विनायक श्रीधर देशपांडे | ६१-७० |
| ८. | आ. गो. पुजारी | ७१-८८ |
| ९. | रामचंद्र रसाळ | ८९-१०४ |
| १०. | चारुदत्त गोखले | १०५-११० |
| ११. | शिवाजीराव मुरलीधर भोसले | १११-११५ |
| १२. | शि. ना. माने | ११६ |
| १३. | धनश्री महाजन | १२१-१२४ |
| १४. | विजय मा. कुंभार | १२५-१३५ |
| १५. | मारोती वीरभद्र तेगमपुरे | १३६-१४१ |
| १६. | अविनाश कुलकर्णी | १४२-१४८ |
| १७. | प्रशांत हरमकर | १४९-१५८ |
| १८. | दीपक विठ्ठल भुसारे | १५९-१६६ |
| १९. | पुष्पा सुभाष तायडे | १६७-१७५ |
| २०. | चंद्रकांत रामचंद्र जाधव | १७६-१८४ |
| २१. | मंजुषा मुसमाडे | १८५-१८९ |
| २२. | शि. ना. माने | १९०-१९२ |
| २३. | ज.फा.पाटील | १९३-१९४ |
| २४. | संतोष दास्ताने | १९५-१९६ |
| २५. | मंजुषा मुसमाडे | २०३-२११ |
| २६. | पी. एस. कांबळे | २१२-२२० |

| | | |
|---|---|---|
| २७. | एम. एस देशमुख, ज्ञानदेव तळुले | २२१-२३४ |
| २८. | संतोष कदम | २३५-२४८ |
| २९. | विकास विनायकराव सुकाळे | २४९-२५५ |
| ३०. | दत्तात्रय सीताराम बागडे | २५६-२६३ |
| ३१. | धीरज सुभाषराव कदम | २६४-२८० |
| ३२. | जयश्री पंढरीनाथ जाधव | २८१-२८८ |
| ३३. | पुष्पा तायडे | २८९-२९४ |
| ३४. | जे. एफ. पाटील | २९५-२९७ |
| ३५. | शि. ना. माने | २९८-२९९ |
| ३६. | आर. बी. भांडवलकर | ३०० |
| ३७. | चारूदत्त श्रीधर गोखले | ३०६-३२६ |
| ३८. | ज्ञानदेव तळुले | ३२७-३५२ |
| ३९. | माधव चितळे | ३५३-३५५ |
| ४०. | एम. एच. शिंदे | ३५६-३६३ |
| ४१. | विजय कुंभार | ३६४-३६९ |
| ४२. | सुरेखा तु. रोंगटे | ३७०-३७६ |
| ४३. | नीता सुधाकर वाणी | ३७७-३८६ |
| ४४. | माधुरी ओंकार वर्तले | ३८७-३९२ |
| ४५. | शि. ना. माने | ३९३-३९४ |
| ४६. | जे. एफ. पाटील | ३९५ |


## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ ग्रंथालये यांच्यासाठी त्रैवार्षिक वर्गणी रु. १०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. १५००/- आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 094720110000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.


**डॉ. राहुल शं. म्होपरे**

विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०


**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# अर्थसंवाद


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १. | प्रेषित अर्थशास्त्री : कार्ल मार्क्स | १११-११५ |
| २. | अ वर्ल्ड ऑफ थ्री झीरोज | १८५-१८९ |
| ३. | मागोवा - अर्थविचारांचा | ३८७-३९२ |
| | **ग्रंथ परीक्षण** | |
| १. | शिवाजीराव मुरलीधर भोसले, सातारा | १११-११५ |
| २. | मंजुषा मुसमाडे, पुणे | १८५-१८९ |
| ३. | माधुरी ओंकार वर्तले, कोल्हापूर | ३८७-३९२ |


**अर्थसंवाद अंकाचा तपशील : खंड - ४१**

| क्र. | अंक | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| १. | एप्रिल-जून २०१८ | ११८ |
| २. | जुलै-सप्टेंबर २०१८ | ८१ |
| ३. | ऑक्टोबर-डिसेंबर २०१८ | १०४ |
| ४. | जानेवारी-मार्च २०१८ | १०० |

## पत्रपंडित पां. वा. गाडगीळ व्याख्यानमाला

मराठी अर्थशास्त्र परिषद आणि नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाचे कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य महिला महाविद्यालय, नाशिकरोड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रातील ख्यातनाम पत्रकार, लोकमान्यचे संपादक पत्रपंडित पां. वा. गाडगीळ स्मृती व्याख्यानाचे आयोजन दि. ०५ मार्च, २०१९ रोजी करण्यात आले. व्याख्यानप्रसंगी 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल' या विषयावर डॉ. विनायकजी गोविलकर यांचे भारतीय अर्थव्यवस्थेची प्राप्तीपासून आजतागायतची वाटचाल उलगडून दाखविली. कंट्रोल ॲण्ड कमांड इकॉनॉमी ते ग्लोबल इकॉनॉमीपर्यंतची वाटचाल आणि अर्थव्यवस्थेच्या विकासातील विविध टप्पे, तत्कालीन सरकारांनी घेतलेले निर्णय, त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचे विवेचन करीत असताना सरकारने कल्याणकारी योजना राबविल्या परंतु हे करीत असताना समग्र विकासाच्या योजनांवर मात्र खर्च कमी झाला. परिणामी देशाच्या विकास प्रक्रियेला त्यामुळे अडथळा आल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल अपेक्षित गतीने विकासपथावर येण्यास उशीर झाला असे प्रतिपादन केले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख मा. डॉ.ए.बी. देवगिरीकर हे उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. लीना पांढरे या अध्यक्षस्थानी होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. जीवन सोळंके यांनी केले. प्रमुख वक्त्यांचे स्वागत मा. डॉ. लीना पांढरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे नवनिर्वाचित कार्यकारिणी प्रतिनिधी मा. डॉ. माधव शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.

व्याख्यानासाठी नाशिक शहरातील विविध महाविद्यालयातून प्राध्यापक, शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गोरखनाथ वाकळे यांनी केले तर आभार प्रा. प्रवीण वाचकर यांनी मानले.

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## ४३ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन, सोलापूर

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४३ वे वार्षिक अधिवेशन अभिजित कदम इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड सोशल सायन्सेस, सोलापूर येथे दिनांक ३१ ऑक्टोबर व १ आणि २ नोव्हेंबर २०१९ रोजी आयोजित करण्याचे ठरले आहे. सदर अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. आर. वाय. माहोरे, नागपूर हे आहेत. या अधिवेशनातील चर्चासत्राचे विषय पुढीलप्रमाणे निश्चित केले आहेत.

१) महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचाराची समर्पकता

२) भारतीय शेतीसंबंधी पारीत करण्यात आलेल्या कायद्याचे पुनर्रावलोकन

३) महाराष्ट्राच्या जडणघडणीत छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान

**डॉ. आर.बी.भांडवलकर**

कार्यवाह-खजिनदार

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने आजीव सदस्यांकरीता विविध पारितोषिके वर्षभरातील उपक्रमास अधिवेशन काळात देण्यात येतात. या पारितोषिकांकरीता प्रत्येकाने प्रयत्न करावा अशी परिषदेची अपेक्षा आहे.

**१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक**

(१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीतील मराठी अर्थशास्त्रीय ग्रंथास)

**२) मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक**

(१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत मराठीतून प्रकाशित अर्थशास्त्रीय ग्रंथ महिला सदस्यांकरीता)

**३) डॉ. सौ. अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार**

(१ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत फक्त वर्तमानपत्रातून मराठीत प्रकाशित झालेल्या आर्थिक लेखास)

**४) डॉ. शंकर मोडक पुरस्कार**

(रस्ते, रेल्वे, हवाई वाहतूक, जलवाहतूक (अंतर्गत व समुद्री), धरणे, कालवे, नागरीकरण, पोस्ट ऑफीसचे अर्थशास्त्र, संरचनात्मक अर्थशास्त्र विषयावर १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१८ या कालावधीत प्रकाशित लेख व ग्रंथ)

आपले उपरोक्त उपक्रमासंबंधी लेख व ग्रंथ चार प्रतिमध्ये अर्जासह कार्यवाह-खजिनदार यांचेकडे दि. ३१ ऑगस्ट २०१९ पूर्वी पाठवावेत.

**डॉ. आर.बी.भांडवलकर**

कार्यवाह-खजिनदार

गजानन नगर, पिंपळगांव रोड, यवतमाळ- ४४५००१

मोबा. : ९४२३१३४६८६

## डॉ. शंकर मोडक पुरस्कृत व्याख्यान

# नागरीकरण हा बहुआयामी विषय

### डॉ दि.व्यं.जहागीरदार

नागरीकरण हा केवळ लोकसंख्या वा अर्थशास्त्राचा विषय नसून समाजशास्त्र ,राज्यशास्त्र भौगोलिक संरचना, मानसशास्त्र, संस्कृती अशा अनेक आयामांनी या विषयाला समजून घ्यावे लागेल.

नागरीकरणाने विकास आणि विकासाने नागरीकरण असा हा अंतर्संबंध असून त्याचे सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही परिणाम अभ्यासणे आवश्यक आहे. असे विचार कोल्हापूरचे माजी उच्चशिक्षण संचालक डॉ. दि.व्यं. जहागीरदार यांनी व्यक्त केले.

शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोकमान्य टिळक महाविद्यालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात अर्थशास्त्र परिषदेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित , डॉ. शंकर मोडक पुरस्कृत व्याख्यानात, नागरीकरणाचे स्वरूप आणि समस्या या विषयावर ते निरूपण करीत होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अरुंधती निनावे तर प्रमुख उपस्थिती रूपात मंडळाचे सहसचिव अशोक सोनटक्के आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह खजिनदार राजेंद्र भांडवलकर उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. भांडवलकर यांनी अर्थशास्त्र परिषदेची भूमिका, कार्य, उपक्रम इत्यादींची ओळख करून दिली.

अशोक सोनटक्के यांनी अर्थशास्त्र परिषदेचे आयोजन महाविद्यालयात व्हावे अशा शुभकामना दिल्या.

१८०४ मध्ये केवळ एक अब्ज असणारी जगाची लोकसंख्या आज ७ अब्ज च्या पुढे गेली असून त्यातून नागरीकरणाचा प्रचंड वेग पहावयास मिळत आहे. केवळ खेड्यातून शहराकडे च नव्हे तर लहान शहरातून मोठ्या शहरांकडे वाढणाऱ्या या समस्येचे चिंतन अनिवार्य आहे.

व्यवस्थापनाची, प्रशासनाची भीषण समस्या , प्रदूषण, गुन्हेगारी, मूलभूत सुविधांचा अभाव अशा अनेक समस्या यातून उत्पन्न होत असल्या तरी रोजगाराची नवनवीन माध्यमे, वेळेचे महत्व, शिस्तबद्धता, विकासांच्या नवनवीन परिमाणां मुळे येणारी स्पर्धा या सकारात्मक बाबी देखील आहेत असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. अरुंधती निनावे यांनी अर्थशास्त्र परिषदेने टिकवलेल्या गौरवशाली वारशाचा सन्मानपूर्वक उल्लेख केला.

याप्रसंगी चंद्रपूर ,वरोरा इथूनसुद्धा परिषदेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. करमसिंग राजपूत यांनी केले.

महाविद्यालयाच्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह अर्थशास्त्रांच्या विद्यार्थ्यां व्यतिरिक्त इतर विषयाच्या विद्यार्थ्यांनीही या व्याख्यान संधीचा लाभ घेतला.

# 'अर्थसंवाद'च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (2335) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२. **शोधनिबंधाची प्रत अथवा सीडी पोष्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाइल व त्याचीच PDF केलेली फाइल) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** पेपरबरोबर संपादकांना शोधनिबंध पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. शोधनिबंध पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. शोधनिबंध खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. शोधनिबंधात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा शक्यतो उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत:जवळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पुढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, (२०१०). (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

# अर्थसंवाद

ISSN 0973-8452

## जाहिरातीचे दर

| | कृष्णधवल (B/W) | रंगीत |
|---|---|---|
| १) समोरचे आतील पृष्ठ | रु. ५,०००/- | रु. ११,०००/- |
| २) मागील (आतील) पृष्ठ | रु. ५,०००/- | रु. ११,०००/- |
| ३) मागील शेवटचे पृष्ठ | रु. ६,०००/- | रु. १५,०००/- |

आपला मजकूर - डिझाईन (1/5 = 150 x 210 mm) आणि सोबत वरील रकमेचा ड्राफ्ट खालील पत्त्यावर पाठवावा. ड्राफ्ट मराठी अर्थशास्त्र परिषद या नावानेच काढावा. जाहिरात प्रसिद्ध होताच अर्थसंवादचा अंक आपणास मिळेल. आपल्या सहकार्याबद्दल धन्यवाद !

**चारुदत्त गोखले**
अध्यक्ष
प्लॉट नं. १०, प्रोफेसर कॉलनी,
जिल्हा उद्योग केंद्राच्या मागे,
जळगाव, जिल्हा जळगाव- ४२५००१
भ्रमणध्वनी:९४२२६१८४१०

**कैलास के. पाटील**
कार्याध्यक्ष
''सप्तश्रृंगी'' पार्वती मंगल कार्यालजवळ,
त्रिमूर्ती नगर, परभणी-४३१४०१.
भ्रमणध्वनी : ९४२३१०२८६३

**आर. बी. भांडवलकर**
कार्यवाह खजिनदार
गजाननगर, पिंपळगाव रोड,
यवतमाळ - ४४५ ००१
भ्रमणध्वनी - ९४२३१३४६८६

**राहूल शं. म्होपरे**
प्रमुख संपादक
विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर,
जि. कोल्हापूर. भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

BHARATI MUDRANALAY, KOP I 0231-2654329